December 2014

DECEMBER 31

तसे काही नाही -- खरे तर हा अनेकांच्या मनांत येऊ शकणारा विचार आहे -- मी मांडला इतकेच --

" सांगण्यासारखे म्हणजे, या माध्यमाने मला एक मुलगी मिळवून दिली, जिच्या जगण्यातल्या प्रश्नांत मी सामील असणार आणि एक नात मिळवून दिली जिच्या ब्रेकपच्या काळातही मी तिच्याबरोबर होतो आणि त्याच वेळी तिची परीक्षाही होती ! शिवाय मी स्खलनशील आहेच, चुकाही होतातच -- " -- हे याच्या आधीचे स्टेटस --

न सांगण्यासारखे ? -- मी ज्यांना प्रेयसी समजतो अशा पाचपन्नास आहेत -- पण फक्त माझ्या मनात -- वयाचा प्रश्न नसतो यात -- त्याही जमेतच ना !

होय -- आहे --

नाटकाबाहेरचा खरा फोटो ! अशाच मजेत राहा !

' प्रेमात पडलेला तिरसट खलनायक ' -- हा तर मानवी जगण्याचा सारांशच !

होय --

करमणूकप्रधान धर्म आणि मादक द्रव्ये यांमुळे कुणाचीही एक्सपायरी डेट लौकर येते !

खिडकी वडा हा मात्र कल्याणचा मानबिंदू आहे !

-- होय -- तीच --

-- शिवाय, खरे तर तो दीर्घांक आहे -- काटछाट होती --

You commented on Prachi Dublay's photo.

"'Comfort zone is a nice place but nothing ever grows there!'"

तुझ्या पोस्टमधले सत्य समजून जगणारी तू एक ग्रेट स्त्री आहेस ! स्तुती नव्हे, एक डेंजरस सत्य !

दोन मैत्रिणींमधले खुले-गुप्त बोलणे ऐकू आले तरी त्यात भाग न घेणेच बरे !

काहींना हा शेवट वाटू शकतो -- मी इथे ' तर काय ? ' हा प्रश्न स्वतःला विचारतो --

yes ! बाकी सगळ्या फालतू गप्पा आहेत !

समावेशकतेच्या गप्पा मारत संकुचित जगणे -- हे त्यातले परम फायनल !

The goose is out ! -- हे एका झेन कोनचे उत्तर आहे ! तेच इथे !

हिंदुस्तान की हिंदुस्थान -- गुजरात की गुजराथ -- माझा नेहमी घोटाळा होतो -- या निमित्ताने, कुणी स्पष्ट करावे – हिंदुस्तान आणि गुजरात असेच बरोबर दिसतेय नेटप्रमाणे.

-- होय -- माहिती बरोबर आहे --

सध्याचा आपल्या जगण्याचा सार्वत्रिक हलकट माहोल पाहता एक डाऊट असा येतो की हिंदू आणि हिंदूविरोधी एकमेकांना सामील तर नसतील ?

राजकीय विचार पुरोगामी पण नैतिक विचार प्रतिगामी -- ही कदाचित, खांडेकरांच्या पुढची स्टेप असावी --

माझ्या ' जोडपी ' नावाच्या एकांकिकेत र म्हणता न येणारे एक स्त्री-पात्र आहे.

मुळात ख्या वर अनुस्वार नको आहे -- अल्पसंख्याक -- असा शब्द आहे -- शब्दकोशात त्याचा अर्थ ' थोडे ' असा दिलेला आहे. बहुसंख्याक नसलेले.

-- अब्जावधी लोकांच्या जगण्यातली कोणती तरी पोकळी धर्म ही गोष्ट खोटा माल भरून, भरून काढते, असे जरी म्हटले तरी ती पोकळी भरायला आज दुसरे काय आहे ? बौद्धिक / वैचारिक पद्धतीने होत राहणाऱ्या सुधारणा ? दुःख, एकाकीपणा, जगण्याचा हेतू, सुखाची हाव, वर्चस्वाची इच्छा -- यांवर कोणते शहाणे प्रयत्न शक्य आहेत ?

३-४ वर्षे जळगाव जिल्ह्यात होतो -- तिकडे बागायत म्हणजे केळी -- ते पाहिलेले इथे प्रतिमारूप झाले असावे --

त्यासाठीच त्यांनी ' निर्वाण ' ही कल्पना वगळली का ?

डॉ. आंबेडकरांनी स्वीकारलेला बौद्ध धर्म इहवादी आहे का ?

जगणे समजून घेण्याची आपली प्रक्रिया, आपल्याबरोबर जगणाऱ्या इतरांनाही सांगावीशी वाटणे -- हे एक मला व्हॅलिड कारण वाटते.

एखादा माणूस सरळ शांतपणे चाललेला असला तरी " काय गडबड ? " असे कोल्हापुरात विचारतात ! तो “ निवांताय -- " म्हणतो !

आपण न पिता गेलो आहोत, असेच समजायचे पण गाणे हे म्हणायचे -- " जमाना समझा के हम पीके आये –
पीके आये -- "

अमर, तसे नाहीय -- कूणीही कमी-अधिक नाहीय -- शेवटी नेमका प्रश्न सगळ्यांसमोर येणे महत्त्वाचे --

म्हणूनच आपणही जबाबदार असतोच -- ही सगळी रचना एकत्र जगते -- ते, तिकडे, ते जबाबदार -- हे पूर्ण सत्य नसतेच --

व्यक्तिगत वैचारिक हल्ल्याची शक्यता, आपल्या व्यक्तिगत प्रतिमेची मोडतोड होण्याची शक्यता, यांबाबत आपण कितपत भीती बाळगतो, यावर ते ठरणार ! पण, हा प्रश्न अनेकांना पडतो याचा अर्थच एक समाज म्हणून आपण अभिव्यक्तिस्वातंत्र्य न माणारेच आहोत -- ते घटनेने दिलेले असले तरी !

चायनीज सामोसे महाग असतील -- त्यांत पाली, झुरळे आणि साप असणार ! भाव किती वाढलेत यांचे !

माणूस गंभीरपणे, प्रेमाने, संवेदनशीलतेने, व्यापक भानाने जे जे करतो ते ते सर्व मौल्यवान असते ! मानवी जगण्यातल्या क्रौर्याला ते आव्हान असते !

-- निरनिराळ्या वयांतून सगळेच जगत येतात-जातात. आपापले जगताना कुणी सारखी समर्थनेही देत बसत नाही. तरीही, वातावरणात काही चुकीची हेटाळणी जाणवत असेल तर प्रतिक्रिया अनाठायी नसते !

नाही रे अजून दुरुस्त झालेले --

तुझा शेवटचा शब्द काय आहे ? ( इथला, टाईप केलेला म्हणतोय -- बाकी तुझ्याकडे फक्त शेवटचा शब्दच असतो ! )

-- होय -- ते सगळे मला मित्रच वाटतात -- माझी नाटके पाहणारेही माझे मित्रच असतात -- मी व्यक्तिशः कुठे ओळखतो सर्वांना ?

नाही, गोपूंचे आणि माझे काही नाते नाही --

-- लिहिणार हो -- मनात आलेला एक विचार, एवढेच !

यस सर ! बहुत साल मिलते रहेंगे !

व्यूह म्हणजे डावपेचाची रचना -- कारस्थान -- विचार म्हणजे बऱ्याचदा हेच असते !

सदगुरू म्हणजे मनाची पूर्णता -- अखंडता -- ती नसेल तर प्रत्येक गोष्ट आणि सगळेच -- अपुरे / अर्धवटच असणार -- हा अर्थ -- ( असावा, असे वाटते. )

ही पोस्ट सरळमार्गीच असावी, बहुतेक !

-- ही तुम्हाला तात्त्विक चर्चा वाटते ? अहो, तुमचे-माझे जगणे आहे हे !

काही अपरिहार्यता असेल, काही महत्त्वाचा फोन असेल --- असले बौद्धिक धागेदोरे काढण्याचा उपयोग नाही -- मोबाईलशी चाळे करत बसणे, त्यातच डोके घालणे ही अनेकांची सवय होते आहे -- साधी एकमेकांतली बेसिक सभ्यता मातीत घालणारी -- त्या बाबतची ही पोस्ट आहे --

शेवटून दुसऱ्या ओळीत ' मिळो याच -- ' असे हवे का ? त्या दोन शब्दांत स्पेस हवी --

महाप्रचंड पाताळयंत्र !

मानसशास्त्र, जनुकशास्त्र यांचा ओझरताही स्पर्श नसलेले नैतिक कर्मठ खूप असतात जे पुरोगामी म्हणून हिंडत असतात ! शिव्यांचा मुबलक वापर आणि आपण खूप बोल्ड असल्याचे सारखे प्रदर्शन करणे -- हेच त्यांचे पुरोगामित्व असते !

समोर आलेले उपाय -- १ स्वतःकडे तटस्थपणे पाहणे २ काळाबरोबर बदलणारी पायाभूत व्यवस्था घडवणे ३ स्वतंत्र असूनही स्वैर नसणे ४ स्वतः विकारी असल्याचे जाणणे ५ गुणदोषांसह स्वतःला स्वीकारणे ६ स्वतःच्या निर्णयांच्या परिणामांना तयार राहणे ७ होईल हळूहळू जैसे थे या समजुतीने जगणे.

बायोगॅसवर चालणाऱ्या गाडीची आजच बातमी होती --

त्यांची फी वगैरे परवडण्याचाही प्रश्न येईल -- माझ्या मते कीर्तनकारांना त्यातले प्रथमोपचार शिकवावेत --

विश्वास, अविश्वास, प्रतारणा या क्षेत्राने कलाविश्वाला प्रचंड माल पुरवलेला आहे !

जनुक चाचणीद्वारे पितृत्व चाचणी सुलभ होण्याचे जगात काय काय परिणाम झाले -- काही नवे कायदे अस्तित्वात आले का -- काही नवे विचार येताहेत का -- हे सर्व दुर्लक्षून आपले कर्मठ नैतिक श्रेष्ठत्व रेटत राहणे केव्हाही चांगलेच ! नाही तरी जगाला प्रकाश दाखवण्याची जबाबदारी भारताचीच आहे !

मनाची नैसर्गिक अवस्था -- असे काही असू शकत नाही --

मनाची अवस्था म्हणाल तर द्विधा असणे -- हीच !

प्रामाणिकपणा हा मनाचा गुण असतो की भीती आणि दबाव यांचा परिणाम असतो ? दुसरे खरे असेल तर तो निव्वळ साध्यसाधकपणा असतो ! तसे नसते तर प्रामाणिकपणाचे सुख कुणीच नाकारले नसते !

Human mind never acts totally -- it is divided. But, ok --

I agree -- some illusions are most beautiful !

To see the fact is not cynicism -- human mind is always divided ! Why avoid to see it and remain in illusion ?

दरोडा घालायला जाताना देवीला नमस्कार करून जाणारे मराठी सिनेमातले धार्मिक दरोडेखोर !

ही टोलेजंग सिक्सर आहे ! बॉल स्टेडियमच्या बाहेर !

अश्लीलतेबाबतचा भारतातला कायदाही साहित्य, कला, शास्त्र आणि शिक्षण यांचे अपवाद करतो -- हे लक्षात घ्या !

इथे तुला पूर्ण लेक्चर देणे तर शक्य नाही -- ही चर्चा वाचत राहा --

मन हे नेहमी द्विधा पद्धतीने काम करते -- त्याचा हा परिणाम --

मी कुणाचाही भक्त वा अनुयायी नाही --

ज्यांच्या अशा गोड चुकांना तशाच गोड चुकांचे प्रतिसाद मिळतात ते भाग्यवान ! पुढे मग मालिका कितीही लांबोत !

मानवी मनोव्यापारांच्या प्रक्रियांची समज असलेल्या माणसाने, अनुभवसिद्ध आाडाख्यांच्या आधारे, प्रत्येक वेळी नव्या रचना -- नवी कॉंबिनेशन्स वाचण्याचे हे शास्त्र आहे. पूर्णपणे वैज्ञानिक शिस्तीत हे येणार नाही. म्हणून खोटे आणि टाकाऊ ?

एका खोट्या नोटेच्या बदल्यात त्याने दोनदा खरी किंमत दिली !

समजा त्याच्याकडे सुटे पैसे असते तर त्याने २०० चा माल अधिक ८०० असे त्या बाईला दिले असते -- त्या खोट्या नोटेच्या बदल्यात. म्हणजे तो पूर्ण तोटाच. शिवाय त्याच नोटेच्या बदल्यात १००० शेजाऱ्याला द्यावे लागले !

आणि त्या गिऱ्हाईकाला २०० चा माल आणि ८०० दिले ते ?

फिरसे सोचो !

एखाद्याच्या मनात उपस्थित असणाऱ्या अनेक प्रभावांचे आणि त्यांचे संबंध वाचता येण्याचे हे शास्त्र आहे -- एकासारखा तसाच दुसरा माणूसही नसतो आणि दुसरा हातही नसतो. त्यामुळे, शास्त्रीय निकषांत हे बसवून दाखवणे अवघड जात असावे. याचा अर्थ यातली सर्व निरीक्षणे, संशोधने फोल आहेत, असे नाही.

कुंडलीशास्त्रात मी पूर्ण अज्ञानी आहे -- पण एक चिनी म्हण आहे की इकडे फुलपाखराने पंख फडफडवले की पाच हजार किमी वरच्या नदीला पूर येतो !

एकाच अपघातात मरणाऱ्या अनेक व्यक्तींच्या हातांवर तेच एक समान अपघाती मरणाचे चिन्ह असते का -- हा तुमचा प्रश्न आहे. याचे उत्तर कुणीही दिल्याचे मला माहीत नाही. स्वतःच्या मनाची वैशिष्ट्ये आणि गुणदोष यांमुळे घडणाऱ्या गोष्टीच फक्त हस्तरेषांवरून दिसत असाव्यात. पण ही अपूर्णता आहे म्हणून सगळेच नाकारता येईल का, हा प्रश्न आहे.

एक म्हणजे, मला यातून कोणतीही संधी साधायची नाहीय. दुसरे म्हणजे, मी याचा अभ्यास बंद करून काही वर्षे झाली. तिसरे म्हणजे घटनांना महत्त्व देऊन जगणे, स्वतःचे यशापयश, सुखदुःखे यांनाच महत्त्व देत जगणे हे वैज्ञानिक असले तरी अध्यात्मात त्याला शून्य किंमत असते. वैज्ञानिक निकषांवर अध्यात्माचे काय होईल ? ' तुका म्हणे हरिच्या दासा । शुभकाळ सर्व दिशा ।। -- हे कोणत्या विज्ञानात टिकेल ? ध्यान हे आता मोठमोठे डॉक्टर्सही सांगतात -- मन एकात्म होणे -- हे वैज्ञानिक आहे ? नुसते विज्ञान हे एकच मूल्य मानणे हे फुकट मरायचे लक्षण आहे. मानवी संबंधांतले कोणतेही प्रश्न विज्ञानाने सुटत नाहीत. पण हस्तरेषाशास्त्र ही एक भौतिक गोष्ट आहे, हे लक्षात घेऊन नीट विचार व्हायला हवा.

कुंडली शास्त्रातले मला काहीही माहिती नाही -- ही पोस्ट फक्त हस्तरेषा शास्त्राबद्दल आहे. जगण्याचा समग्रतेने विचार करणाऱ्यांना याची गरजच नसते कारण ते घटनांचे जगणे असे पाहातच नाहीत. यावर अवलंबून राहावे का, याने कर्तृत्व मारले जाते का, फक्त कमकुवत लोकच याच्या नादी लागतात का -- हे वेगळे प्रश्न आहेत. याचा खूप अभ्यास असलेल्यांनी

भूतकाळातल्या आणि भविष्यातल्या घटना अचूक सांगितल्याच्या अनेक नोंदी आहेत. माझा अभ्यास तसा नगण्य म्हणावा लागेल -- तरीही, यात तथ्य आहे, हे मात्र मला निश्चितपणे दिसून आलेले आहे. काही सिद्ध वगैरे करण्या इतकी माझी योग्यता नाही पण, हे फेटाळून लावण्यासारखे नाहीय, एवढेच म्हणतोय. त्या अमुक मंत्री राष्ट्रपती होतील का, हे सांगण्याबाबतचा माझा संशय मी व्यक्त केलेलाच आहे.

जी गोष्ट निरर्थक नाही तिला निरर्थक म्हणू नये -- मानवी जगणे समजून घेण्याची मी म्हणतो तीच आणि तेवढीच पद्धत शक्य आहे, असेही म्हणू नये --

चेहरा, पाय, वगैरे असे अंगलक्षणे हे एक एकूण प्रकरण आहे -- त्याबद्दल मला माहिती नाही --

याचा दुरुपयोग, याबद्दलची मते, यामुळे लोक दैववादी होतील का -- हे वेगळे मुद्दे आहेत --

ही चित्रे काढताना तुम्हाला जो आनंद मिळत असेल तोच आम्हाला ती पाहताना मिळतो ! सगळे मिळून असे मजेत जगत राहू !

१००० ची एक खोटी नोट घेऊन दोन ठिकाणी त्याने खरे एकेक हजार दिले -- म्हणजे उत्तर -- २०००/-

आपल्याकडे असे काही वाचायची उत्सुकता आहे कुणाला ?

मला तर इतिहासाची ॲलर्जीच असल्याने मी तो चवीलाही खात नाही --

मिलिंद, स्वाती म्हणताहेत की आधी समोरची व्यक्ती ऐकण्याच्या मनःस्थितीत तर येऊ द्या -- ते योग्य वाटते -- मी स्वतः ध्यानाचे महत्त्व जाणतो -- एक प्रसंग असा आला होता की तोल सावरण्यासाठी मला बाह्य मदतच लागली !

तुमचे बोलणे सर्वांनीच नीट विचारात घ्यायला हवे --

पण मित्रांनो, आपण अशा गोष्टींवर बोलत नाही फारसे -- इथे आपण एकमेकांच्या आकलनाचा लाभ घेऊ शकतो -- तो घेऊ या --

प्रत्येक केस वेगळी असणार -- याला एकच ठोक उत्तर असू शकत नाही, हेही खरे आहे --

' पुस्तक ' च्या ऐवजी ' दगड ' म्हणायलाही हरकत नाही -- समजा प्रमाण भाषा असे काही नकोच -- ठीक -- मग असावे काय ? बिनचूक संपर्कासाठी काहीतरी शिस्त लागेलच ना ! ती कोणती ? वापराने भाषा बदलत / घडत जाते, हे खरे असले तरी पूर्ण बेशिस्त भाषा म्हणजे मौन -- असे होईल ! त्यामुळे कोणती शिस्त आवश्यक आहे, याचाही विचार हवा --

अनेक नोबेल विजेते साहित्यिकही या एकांताबद्दल बोललेले आहेत.

चांगली समीक्षा कलेची समज वाढवते -- उदा माधव आचवलांचे ' जास्वंद ' --

तो जाणवण्याचा / समजण्याचा / समीक्षेचा प्रांत असतो, असे म्हणता येईल -- अमुकला नोबेल का दिले, हा प्रश्न जरी चार शब्दांचा असला तरी याचे उत्तर चारशे पानांचे असू शकते --

स्वतःच्या जगण्यातून न येता ' केलेली ' --

तीव्र सेक्स असूनही सेक्सच्या पलीकडचे बोलणाऱ्या अशा कविता मराठीत फारशा नाहीत !

मी मालाडला होतो, हे बरोबर -- मी मालाड पश्चिम आणि खानोलकर मालाड पूर्व ! आमची छान दोस्ती होती ! अनेकदा भेटी होत -- एकमेकांच्या घरीही जाणेयेणे होई.

मी तिथे असताना पु शि रेगे एलफिन्स्टन कॉलेजचे प्राचार्य होते. त्यांची आणि माझी फक्त एकदाच भेट झाली होती. त्यांच्या कवितेचा संस्कार नक्कीच आहे, प्रश्नच नाही. त्यांनी त्यांच्या एका जाहीर भाषणात असे म्हटले होते की ' दाखवेगिरी ' चा दोष नसलेले मराठीतले दोन चांगले कवी म्हणजे -- प्रभा गणोरकर आणि मी. आणखीही अनेक संस्कार आहेतच -- ते सगळे मिळूनच काही घडत असणार. अशा प्रकारच्या ' कमी भावनिक ' कवितालेखनात कोणते असावेत संस्कार ते सांगत होतो. त्या कॉलेजसारखा परिसर कुठेच नसणार, हे खरेच आहे ! दुर्दैवाने माझा तो काळ सदोदित आजारी पडण्याचा काळ होता. त्यामुळे, एवढे सुंदर वातावरण असूनही प्रेमबीम कुठे जमले नाही !

सगळीकडचे सगळ्या धर्मांचे लोक डेंजरस आहेत !

त्यांच्या विरोधी पक्षाने खोटी एडस सर्टिफिकेटस देण्याचे कार्यक्रम राबवावे -- ते दाखवले की कुणी रगत मागणार नाही --

आपण सगळे एकत्र जगतो -- हाच तर जगण्याचा आनंद !

माझ्या खालील वेबसाईटवर सगळे फ्री उपलब्ध आहे --

www.champralekhan.com

खरे सांगू ? -- खूप प्रसिद्ध असलेल्या किंवा नट्या वगैरे माझ्या स्वप्नांत कधी आल्या नाहीत पण माझ्या साध्या जगण्यात मला छान वाटलेल्या असंख्य स्त्रियांना माझ्या स्वप्नांचे दरवाजे नेहमी खुलेच राहिले -- मी उदार अंतःकरणाचा एक साधा माणूस आहे --

मी कुणाचीही लुबाडणूक न करता जगणे, म्हणजे काय -- हा प्रश्न आयुष्यात कधीतरी पडायला हवा --

आस्तिक असण्याचे वा नास्तिक असण्याचे प्रोग्रॅमिंग स्वीकारून चालणाऱ्या लोकांत काहीही फरक असण्याची शक्यता नाही -- दोघेही बोंबलण्याची शक्यता निश्चित !

मी आता विदीर्णता येऊ नये म्हणून आश्वस्तता / ठेहेराव / बांधीलपण अवलंबणार आहे -- हे विदीर्ण मनच ठरवते --

ती शक्यता रद्द -- कारण विदीर्ण मन आणि शहाणपण हे एकत्र असणे शक्य नाही --

वेडे होण्याची शक्यता दोघांनाही सारखीच --

नुसते देव ' मानणारे ' असे घेतले तर आस्तिक व नास्तिक -- दोघेही भ्रमिष्टच !

माझ्या मते नास्तिक म्हणजे मनाची विदीर्णता जो अटळ धरून चालतो -- त्याव्यतिरिक्त जगणेच शक्य नाही असा निष्कर्ष स्वीकारून जगतो तो -- आस्तिक हा देव मानतो म्हणजे, माझ्या आकलनाप्रमाणे, मनाची एकात्मता शक्य आहे, असे मानतो -- तुकाराम ज्याला ' एकविध मन ' म्हणतो तोच देव --

मानसिक रचना रिपीट होत असते -- घटना वेगवेगळ्या घडतात -- मानसिक रचना समजून घेणे महत्त्वाचे --

माझ्या एका नाटकातला संवाद -- " द्रौपदीकडे तुम्ही इतक्या अँगल्सनी बघताय राव -- आमच्याकडे एका अँगलमधून तरी बघा ना ! "

एक मुलगा प्रत्येक शब्दातली शेवटची दोन अक्षरे इकडचे तिकडे अशी करत असे म्हणजे खिडकीला खिकडी म्हणे -- पण तो बटाटा हा शब्द नीट म्हणतोय असे सगळ्यांना वाटे ! त्यातही दोन्ही टा त्याने इकडचे तिकडे केलेले आहेत, हे त्यांना कळत नसे !

एक बसकंडक्टर ' क ' च्या ऐवजी ' त ' म्हणायचा -- एका प्रवासी बाईशी झालेल्या भांडणात तो काय म्हणून गेला, ते इथे सांगण्यासारखे नाहीय ! ( चूक कुणाची यावर तो संवाद होता ! )

A poem is never finished, only abandoned.
Paul Valery

An artist never really finishes his work, he merely abandons it.
Paul Valery

वा ! जंगी झालेला दिसतोय कार्यक्रम ! कवितेला इतके श्रोते ! आनंद वाटला !

माझी नात आहेस ना ? काय चाललाय चावटपणा ? कान धरू का तुझा ?

फ्रेंडस, यातून एकच निष्कर्ष निघावा, असा माझा हेतूच नसतो -- या विषयाचे अनेक कंगोरे, परिमाणे समोर येणे, हे महत्त्वाचे !

संवेदनशीलता म्हणजे सुख मिळवण्याचा हेतू नसलेले भान -- असे म्हणावे का ?

आता प्रश्न नीट लक्षात आला आहे -- फायरफॉक्स मराठी घेतेय पण फोनेटिक घेत नाहीय -- जिथे दोनतीन कीज दाबून एक अक्षर होते -- तिथेच प्रॉब्लेम येतोय -- तरीही एखाद्या तज्ञाकडून वरील सूचनांप्रमाणेही करून पाहीनच-- सर्वांना धन्यवाद !

कवी लोक संवेदनशील असल्याने व्यवहारी जगात मार खातात -- अपयशी होतात -- असे म्हटले जाते -- इथे काय अर्थ संवेदनशीलतेचा ?

हिंदी सिनेमातल्या व्हिलनचे त्याच्या मुलीवर प्रेम असते म्हणजे तिच्या बाबतीत तो संवेदनशील असतो आणि इतर सर्व ' चांगल्या ' लोकांच्या बाबतीत तो कट्टर असतो, असे म्हणावे का ?

संवेदनीलता आणि हळवेपणा यांत काय फ़रक आहे ?

संवेदनशीलता ही प्रतिक्रियेची एक पद्धत, असेच समजले जाते -- त्यामुळे, या शब्दाचा तुम्ही म्हणताहात तोच अर्थ -- मऊ/ गोंधळलेले/ हतबल -- असाच समजला जातो -- त्यासाठी तर ही पोस्ट --

तुम्ही ही कथा वाचलीत का ? मला असे वाटते की या कथेत, हे अमुक विचार, असे काही सांगितलेले नाही. तिच्या आशयाचा आवाका आपल्याला चिंतनप्रवृत्त करतो. ही चिंतनात्मकता अनेकांची अनेक प्रकारची असू शकते.

पोस्ट कशासाठी आहे, त्यात कोणते मुद्दे आहेत हे न पाहता " शिव्या द्यायला हिंमत लागते " -- हेच जर म्हटले जात असेल तर बोलणेच खुंटते !

काहीजणांना मान्य असलेल्या खालील समजुतींवर प्रश्नचिन्ह उमटवण्यासाठी ही पोस्ट आहे –
१ शिव्या देत रागाने बोलणाऱ्यांना इतरांपेक्षा फारच जास्त काही कळत असते आणि इतरांच्या अज्ञानाचा, ढोंगीपणाचा राग येत असल्यामुळे ते तसे बोलत असतात.
२ शिव्या आणि संतापयुक्त बोलणारे सत्यवादी, निर्भीड, परखड आणि निर्भय असतात.
३ असल्या आक्रमक व्यक्तीशी वाद टाळणारे सगळे षंढ आणि वैचारिक कमकुवत असतात.
४ शिव्या आणि संताप हे सांस्कृतिक उन्नयनाचे माध्यम असते.
५ शिव्या आणि संताप यांनी युक्त बोलणाऱ्यांना इतरांनी त्याच भाषेत उत्तर दिले तर चर्चेची वैचारिक पातळी खालावते.
६ मूलभूत विचार सुचणे, समजणे आणि अभिव्यक्त करता येणे – हे शिव्यांशिवाय होऊ शकत नाही.

माझी पोस्ट जातीय संदर्भाची नाहीय -- तसे इथे कुणी करूही नये, ही नम्र विनंती आहे -- फ्रेंडस ऐकतील असा विश्वास आहे --

चकित होणे, आनंद होणे हे मान्यच आहे -- इथेच कलेची कृती संपत नाही -- एवढेच म्हटले आहे --

पुन्हा सांगतो, ओघात शिव्या येऊही शकतात -- अभिव्यक्तीची तीव्रता म्हणू -- पण शिव्यांना घाबरणे आता खूप कमी होत चाललेले आहे -- घाबरवण्यासाठी शिव्या हा काळ संपत आलेला आहे --

शिव्या देणे न देणे हा नुसता विषय नाहीय -- प्रत्येकजणच आपला निर्भीडपणा दाखवण्यासाठी आणि दहशत निर्माण करण्यासाठी शिव्यांचे हत्यार वापरू लागला तर ते बोथट होऊन त्याची भीती नष्ट होते -- असे मांडायचे आहे -- तसे झालेले आहे --

कीर्तनास नर हो तुम्ही जा, गा ।
कीर्तनास नर हो तुम्ही जागा ।।

नवचित्रकारांना लोक हसत -- अजूनही हसतात -- ते चित्रकार त्याला शून्य किंमत देतात !

खरे तर हा विषय गंभीर चर्चेचा आहे. आपण ज्याला गद्य म्हणतो तशा भाषेत हजारो कविता -- कविताच -- इथे आणि जगभरात लिहिल्या गेलेल्या आहेत.

कवितेची मूलभूत काही वैशिष्ट्ये सापडतात का ते पाहायला हवे. भाषा कशी हवी, प्रतिमा कशा हव्यात, ओळी कशा हव्यात -- असले काही कालौघात टिकणारे नाही -- त्यातले बरेचसे नष्ट झालेलेही आहे. डॉ वाळिंबे म्हणत या नव्या कथाकारांना, कवींना साहित्यातून केरासारखे झाडूने काढून टाकले पाहिजे ! कलेच्या क्षेत्रात अशा घट्ट कल्पना बाळगणारे आणि हेकट मनोवृत्ती असलेले यांना फारसे महत्त्व राहात नाही. सर्जकतेचा प्रवास असली हेकटता लाथाडतो !

ध्वनी, संगीत, मात्राबद्धता -- ही कोणतीही कवितेची व्यवच्छेदक लक्षणे नाहीत.

वृत्तबद्ध मजकूर गद्य असू शकतो आणि गद्य दिसणारा मजकूर काव्यमय असू शकतो.

गद्य आणि पद्य या कल्पना कधीच कालबाह्य झालेल्या आहेत -- काव्याचीच लक्षणे पाहावी --

शब्द, भाषा ही वापरात जिवंत असणारी / राहणारी गोष्ट असेल तर शब्दांची अशी विश्लेषणाने खांडोळी करणे योग्य आहे का, हा एक महत्त्वाचा प्रश्न वाटतो.

You commented on Ravee Lakhe's note.
आहे मनोहर तरी गमते मज उदास ( रणांगण दिवाळी २०१४ अंकात प्रसिद्ध)
आहे मनोहर तरी गमते मज उदास
( रणांगण दिवाळी २०१४ अंकात प्रसिद्ध)
...
पूर्ण लेख नीट वाचला. चांगला झाला आहे.
' जगणे समजण्यासाठी कला ' असे वाटणारे लोकच सादरकर्त्यांत आणि
प्रेक्षकांतही अत्यल्प असल्याने हे सगळे प्रश्न आहेत.
आता तर पैसा आणि तंत्रज्ञान यांचेच एक वेड तयार झाल्यामुळे
सगळे अधिकच अवघड झाले आहे, हे तुमचे म्हणणे पटण्यासारखेच आहे.
प्रायोगिक, आशय, कविता -- या शब्दांबाबतही तुमचे विवेचन चांगले
झालेले आहे. एक उत्तम लेख लिहिलात !

शिक्षणाची परंपरा नसलेल्या वस्त्यांमध्ये जाऊन तिथल्या मुलांना तयार करण्याचे कामही आयसरमधले विद्यार्थी ' दिशा ' या उपक्रमांतर्गत करतात, असे समजले !

स्पेशलायझेशन हा काळाचाच महिमा आहे -- डॉक्टर, इंजिनियर, खेळ, कला, संशोधन -- अशी वेगवेगळी क्षेत्रे राहणारच -- ज्याला जिकडे जायचे तिकडे तो जाईल -- शंभरांतल्या नव्वदांना समजा संगणक अभियंताच व्हायचे आहे -- तशी सोय कुठे आहे ?

मला ती गाणी खूप आवडतात -- मी एक म्यूझियम मधला माणूस आहे, असे कुणी म्हटले तरी चालेल !
आणखी नावे सांगा -- भेजा फ्राय, जाने भी दो यारो -- हे मला माहीत आहेत -- शिवाय ?

परवा मुकेश अंबानींनी असाच मोदींच्या खांद्यावर हात ठेवणे, पाठीवर हात ठेवणे -- असे केले -- तेही अनेकांना खटकले --

बालपणातले माझे दहातले नऊ मित्र कन्नड होते ! याच गावात !

" पण तुझे कपडे इतके स्वच्छ कसे ? "

" अरे, आता काळजीच नको -- हा घे नवा आपद्धर्म बार ! हा सगळे डाग धुवून काढतो ! "

अरे वा ! तिकडे कधी जाऊन आलास ? माझ्या बालपणीची पहिली दहा वर्षे याच गावात गेली !

मेंदूच्या उपयुक्ततेखेरीज, तुकाराम ज्याला ' रिकामीक ' म्हणतात किंवा सार्त्र ' नथिंगनेस ' म्हणतो -- असे एक जगणे आहे ज्याकडे माणसाचा कल असतो -- ते जगणे फक्त मेंदूच्या उपयुक्त कृतीचे जगणे नसते -- ते मारून टाकणे सदोदित घडत असते -- त्यामुळे हा वेगळेपणा आला आहे --

कलावंताकडून असणारी दुसरी एक अपेक्षा म्हणजे तो खूप निराश आणि दुःखाने फाटलेला असला पाहिजे !

मराठीत बोलतानासुद्धा ' मंत्र ' ऐवजी ' मंत्रा ' म्हणायचे !

ढोकळा आणि उसाचा रस हे काँबिनेशन तब्येतीला बरे नाही !

' मराठी शब्दरत्नाकर ' -- वा. गो. आपटे आणि ' वरदा मराठी शब्दकोश ' -- ह. अ. भावे.

गरिमा हा शब्द कोशात पुल्लिंगी दिला आहे !

एखाद्या मोठ्या उद्योगाचा प्रमुख अधिकारी होण्यासाठी काही कुवत, अनुभव, परिपक्वता -- या गोष्टी लागतात -- तसे इथे काही असते की नसते ?

आपल्याला काय म्हणायचे आहे हे नीट सांगता न आल्याने सगळ्या उपयुक्त जगांत खूप गोंधळ होत असतात -- वेळ आणि शक्ती वाया जात असतात ! ते टाळता येणे, हा एक उपयोग सांगता येईल !

प्रचाराची भाषणेही बरीचशी जाहिरातींसारखीच तर असतात ! आणि या सगळ्या गोष्टींचा उघड वा छुपा वापर चालूच असलेला दिसतो !

याच प्रकारचे काहीसे लेखन मी माझ्या ' वेषांतर ' या एकांकिकेच्या शेवटच्या भागात केले होते.

होय -- सॉरी -- मी म्हणतोय तो सिनेमा -- ' हीररांझा ' --

राजकुमार आणि प्रिया ना ?

मला एक सुचतोय मार्ग -- मार्गांबाबतच ! सगळे मार्ग पुलांचे करायचे -- खालचा सगळा भाग उत्सवांसाठी कायमचा राखीव ठेवायचा ! दुकानांसाठीही मोठमोठ्या इमारती बांधायच्या -- त्यामुळे उपलब्ध होणारी जागाही उत्सवांनाच द्यायची ! जनतेची जर इतकी इच्छा आणि मागणीच असेल तर ती पूर्ण करायचा प्रयत्न तर करायलाच हवा ! एकदा हे झाले की मधे मधे ज्या गॅप्स राहतील त्यांत आणखीही नवे उत्सव सुरू करता येतील ! हा आनंदी, उत्साही लोकांचा देश आहे -- त्याला तसे जगू दिलेच पाहिजे !

मतदानाला अंगठा दाखवलेलेही काही असणार --

तो विचारात बुडालेला फोटो मतदानाच्या आधीचा आहे की नंतरचा ? ( काय करून बसलो, या अर्थी )

कुसुमाग्रजांची कविता आठवा आणि प्रेम / मतदान कुणालाही करा !

मत कुणालाही द्यावे -- चिखलातल्या कमळाला द्यावे, रुळांवरच्या इंजिनला द्यावे, स्थिर काट्यांच्या घड्याळाला द्यावे, माणसाच्या पंजाला द्यावे, बाणाच्या टोकावर द्यावे ! -- वगैरे !

अशा वेळी खुणेचे चिन्ह कोणते आवडतेय ते पाहायलाही हरकत नाही !

या निवडणुकीच्या विंचवाला उतारा !

मोरारजी देसाईनाही पंतप्रधान झाल्याझाल्या एक आठवड्याच्या आत जगातल्या सगळ्या स्त्रियांची माफी मागायची वेळ आली होती ! " सत्ता मिळाली तर स्त्री फार क्रूर होते ! " असे काही विधान त्यांनी केले होते !

माझ्या मते, एकूणच हिंदी सिनेमात कायमच नंबर एकवर विराजमान असलेला एक संवाद आहे -- ' मि अँड मि ५५ ' मधला -- " तुम यहीं रुको, मैं पांच मिनिटमें शादी करके आती हूँ ! " तो आठवला !

शारीरिकला कमी दर्जा देण्याचे खरे तर काही कारण वाटत नाही -- ओढ -- शारीरिक, मानसिक, बौद्धिक -- कोणतीही असो -- ती स्वतःला काही ' मिळवण्या ' चीच ओढ असते ! निरपेक्ष ओढ असू शकत नाही ! आणि शारीरिक वखवखही मुळात मानसिक असतेच ना !

" व्यवस्थेमध्ये राहूनच व्यवस्था बदलली पाहिजे " -- या वाक्याची आठवण झाली !

आपले पुढारी जेव्हा ' सामान्य माणूस ' ही संज्ञा वापरतात तेव्हा तिचा अर्थ -- शेतकरी, कामगार, मजूर, गरीब वर्ग आणि कदाचित छोटेमोठे नोकरदार -- असा असतो, असे वाटते. शिवाय छोटे दुकानदार, छोटे कारखानदारही असतील.

मला नेहमीच एक प्रश्न पडतो -- सामान्य माणूस कुणाला म्हणावे ? तुम्हाला ते माहीत असावेसे दिसतेय, म्हणून विचारतोय --

भूमिका घ्या आणि ती बदलत राहा !

You commented on Sanjay Patil's photo.

Sanjay Patil's photo.

तुम्ही दिग्दर्शित केलेले माझे ' दिनकर पुरोहितचा खून ' हे नाटक ! अविस्मरणीय होता प्रयोग ! मनःपूर्वक शुभेच्छा !

' मी खीर खाल्ली तर बुड घागरी ' ही गोष्ट आहे ना लक्षात ?

यासाठी खूप अपक्ष निवडून यावे लागतील -- मग घोडेबाजार करता येईल ना -- लोकशाहीच्या हितासाठी आणि रक्षणासाठी !

ज्या दिल्या होत्या ' त्याच ' नोटा तुम्ही एकमेकींना मागत नाही, हेच तुमचे दोघींचेही भाग्य !

" असं संयमी राहून राहून माझ्या मेंदूतली एखादी शीर तुटली म्हणजे ? " अशा प्रकारचा एक संवाद ( बहुतेक ) माझ्या

' समतोल ' या नाटकात आहे !

आशयनिष्ठ मूल्यात्मकता असे काही असते का ? आणि त्याचे स्पष्टीकरण काय आहे ?

''काल्पनिक अथवा वास्तवाधारित घटनाक्रम, पात्रांचे चिंतनशील संज्ञाप्रवाह आणि प्रोटॅगोनिस्ट अथवा निवेदकाच्या च्या मुखातून केलेले जग आणि जगणे याविषयीचे मौलिक भाष्य हे तीन घटक जेव्हा एकत्रित स्वरूपात दीर्घ अशा गद्य लेखनातून मांडले जातात अणि या तीन घटकातून मौलिक अर्थव्यूह निर्माण होतो तेव्हा कादंबरी आकारास येते.'' -- ही वैशिष्ट्ये योग्यच वाटतात -- फक्त, यांच्या समतोलाचा आग्रह संशयास्पद वाटतो.

मी त्या वाघाच्या मनाबद्दल विचार करतोय -- दहा मिनिटे त्याने त्या मुलाची मान का पकडली नसेल ? -- मला वाटते की भीती आणि हिंसा एकच असणार -- तो मुलगा पूर्ण घाबरला तेव्हा त्या वाघाने त्याला मारायचे ठरवले असावे --

सौंदर्य आणि दरारा !

Existence precedes essence -- असे अस्तित्ववाद म्हणतो. अस्तित्व हे स्वातंत्र्य -- त्या स्वातंत्र्यातून निवड म्हणजे इसेन्स -- जगण्याचा ऐवज घडत जाणे ! पण ते ज्याला अस्तित्व म्हणतात त्या स्वातंत्र्यातून जगणे आहे का चालू -- हे ज्याचे त्यालाच कळणार !

अनेक कारणांनी आपली प्रतिक्रिया देण्याची रचना ठरत जात असल्याने, आपल्याकडून निवड केली जाते -- असे म्हणता येईल. पण मग, निवडीचे स्वातंत्र्यच नसेल तर तिला आपली निवड तरी का म्हणावे, असा प्रश्न येईल ! याला कुणी ' नियतीवाद ' म्हणून फेटाळूनही लावतील ! -- ही चर्चा फक्त निवडणुकीपुरतीच नसून एकूण जगण्यालाही लागू आहेच !

उदा. ' चंप्रंची कविता ' या कंपनीचा शेयर बाजारात १०० चा ५२८ ला गेला पाहिजे !

औषधाच्या ! पिस्तूलातून घालायच्या नव्हे !

मुंबईत ट्राम होती -- मी तीतून प्रवास केलेला आहे --

लोकशाही नुसती हिताचीच नाही तर फायद्याचीही आहे !

' पुरोगामी ' हा शब्द वापरायचा असेल तर त्याचा अर्थ त्याच भाषणात एकदा तरी सांगावा लागेल -- आणि गेल्या २५ वर्षांत त्या अर्थात काही बदल झालेत का, तेही सांगावे लागेल --

बाहेर पडलात की पश्चिमेला पंधरा पावले जा -- तिथे आठवेल !

वाचे बरवे कवित्व ।कवित्वी रसिकत्व ।
रसिकत्वी परतत्व ।स्पर्शू जैसा ।अध्याय १८ श्लोक ३४७

रूपारेल कॉलेज पूर्वीपासून अशा खजिन्यासाठी प्रसिद्धच आहे !

मनाला थकवणे, सुखाचा वा दुःखाचा अतिरेक करणे, मादक द्रव्यांच्या धुंदीत राहणे, कलेच्या वा भक्तीच्या वा श्रद्धेच्या धुंदीत राहणे, आदर्शांसाठी तनमन पणाला लावणे -- या सगळ्या शोधांमुळे आळसाचाही शोध लागला असावा !

कुप्रसिद्ध -- अप्रसिद्ध -- प्रसिद्ध -- सुप्रसिद्ध !

कोणत्याही क्षेत्रातले अनुभव, माहिती, इतिहास, व्यवहार-पद्धती -- हे सगळे आता माध्यमक्रांतीमुळे सहज उपलब्ध आहे -- राहील. याला यापुढे कलेत कितपत महत्त्व असावे ? उदाहरणार्थ -- कादंबरी ही त्या काळाचा एक दस्तावेज म्हणूनही महत्त्वाची असावी, अशी एक अपेक्षा व्यक्त केली जाते. दस्तावेजीकरण तर आता हजार प्रकारांनी होते आहे. कलेनेही तेच काम करायची आहे गरज ?

त्या भांबावलेपणातूनच लिहिली असेल कविता तर ती फारच खाजगी राहील -- त्या भांबावलेपणातून बाहेर पडणारी असेल तर ती असंख्यांना आपापले भांबावलेपण समजण्याची प्रक्रिया देईल !

छत्री आणि पोषाख छान रंगीबेरंगी !

सगळे धर्मभेद हे वेगवेगळ्या कर्मकांडांमुळेच असतात. धर्माचे एस्सेन्स -- मूलसत्य -- वेगवेगळे असू शकत नाही. मृत मनांनी यंत्रवत पाळली जाणारी निरर्थक कर्मकांडे हेच सर्व संघर्षाचे मूळ आहे. अमुक धर्मातली माणसे, असे नव्हे, एकूण माणूसच भित्रा असतो म्हणूनच त्याला अशी स्वतःची ओळख वेगळ्या कर्मकांडांतून पक्की करत राहावेसे वाटते आणि

आपापल्या समूहांमुळे त्याला सुरक्षित वाटते ! या सुरक्षित वाटण्याच्या मानसिक भिकारडेपणामुळेच तो असुरक्षित होतो. भयाच्या जगात जगणे स्वीकारतो !

You commented on Arun Prabhune's photo.
'आनंदाची बातमी : पुण्याच्या पद्मगंधा प्रकाशनने १५ जून २०१४ ला प्रकाशित केलेल्या आमच्या 'उत्तर ध्रुवाजवळील अलास्क्र लोककथा' या अनुवादात्मक पुस्तकाला The Federation of Indian Publisher, Delhi या संस्थेचे राष्ट्रीय पातळीवरचे 'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती'चे - 'AWARD FOR EXCELLENCE IN BOOK PRODUCTION 2014' पारितोषिक प्राप्त झाले आहे. प्रकाशकांसाठी सन्मानाचे असलेले हे पारितोषिक एका दिमाखदार सोहळ्यात दिल्ली येथे शुक्रवार, २९ ऑगस्ट २०१४ रोजी वितारीत केले गेले.'
अभिनंदन ! या पुस्तकावर मी इथे लिहिले होते, हे फ्रेंडसना आठवत असेलच !

सवय ! मुंबईत रेल्वे लाईनच्या कडेला असणाऱ्या घरांतून रोज झोपतात असे लोक !

" ' सवाई माधवरावांचा मृत्यू ' या नावाचे नाटक खाडिलकरांनी लिहिलेले नाही --' सवाई माधवराव यांचा मृत्यू ' या नाटकाबद्दल हा प्रश्न असेल तर त्याचे उत्तर खालीलप्रमाणे -- " -- असे परीक्षेत लिहिणारे हे महाशय ! ( अशोक शहाणे ).

काफ्काच्या ट्रायलवरचा सिनेमा पाहिला -- तो काही जेम्स बाँडच्या सिनेमासारखा धंदा करणे शक्यच नव्हते -- असे आपण का म्हणतो ?

Ravee Lakhe -- यांनी खरोखरच माझी तीन नाटके तशी दिग्दर्शित केली होती ! कळणे, न कळणे घडत होते पण पूर्ण प्रयोग अत्यंत इंटरेस्टिंगच होत असे -- एक तर अभिप्राय असा आला की कळले नाही नीट पण आवडले खूप !

मी माझे राग, लोभ, प्रतिक्रिया, हेतू यांतून लिहिणे हे मर्यादित आणि तुकडेबाज --fragmentary -- लिहिणे असते -- जगण्याच्या प्रक्रियेचे, स्वतःची मते न लादता, भान घेणे -- ती प्रक्रिया पूर्णतेने पाहणे -- ही समग्रता – उदा. मी कोणत्याही परिवर्तनाच्या हेतूने लिहीत नाही --

अरे वा ! असे सर्वांच्या हिताचे पण ' बिन-पैशाचे ' असणारे कामही केले पाहिजे, असे वाटणारा तू माझा एक जिगरी दोस्त आहेस, याचा आनंद वाटला ! अभिनंदन ! सर्व संबंधितांचे अभिनंदन !

तसेच एखादा चित्रकारही असू शकतो. त्याला रंगांचे, रचनेचे बऱ्यापैकी भान असते. तोही, साधे, सामान्य विषय घेऊन सौंदर्यनिर्मिती करत राहतो -- त्याला त्यासाठी दादही मिळत राहते. पण, जगण्याच्या प्रक्रियेबाबतच्या चिंतनाची जोड नसल्याने त्या कामाची तीच मर्यादा राहते. मग तोही कडवट होऊ शकतो -- कसले इयाटाचे चिंतन, कसली इयाटाची डेप्थ -- असले बोलू लागतो. आपल्याला जे समजत, झेपत नाही त्याला असली विशेषणे वापरण्याची एक पद्धतच आहे !

' उद्देश ' वा ' हेतू ' हा विषय घेऊ. उदा एखाद्या कवीला थोडी भाषा अवगत असते, त्याचे थोडे वाचनही असते -- त्या सामग्रीवर काही साध्या, सामान्य विषयांवर तो ' सुंदर ' कविता लिहितो -- एका समूहात त्या आवडतात. त्याला तेवढेच ' हवे ' असते. वापरलेले मटेरियल सामान्य वा असामान्य नसते -- त्याला मानवी जगण्याच्या चिंतनाची जोड असेल तर जे आहे ते असामान्य होते. तेवढे काही नसते त्या कवितेत. पण त्याला त्याच्या कलाकृतींना खूप ' मौल्यवान ' असेही म्हटले जावे असे वाटायला लागते तेव्हा गोची होते. वैतागून मग तो ' गहन ', ' चिंतन ' या शब्दांचीच टर उडवायला सुरुवात करतो. त्यावरून, ओळखणारे काय ते ओळखतात --

कलावंताची भाषा, अनुभव, त्याच्या कलाकृतीचा एकूणच कच्चा माल या गोष्टी त्याच्या व्यक्तिगत मर्यादेतल्याच असणार. वाचकही त्याच्या व्यक्तिगततेतूनच वाचतो. या दोघांच्याही व्यक्तिगत मर्यादांना आव्हान देणारी कलाकृती असू शकते का ? -- असा प्रश्न इथे उपस्थित होतो. हे शक्य असल्याचे अनेक ' मोठ्या ' कलाकृती जाणवून देतातच. कोणत्या प्रक्रियेने हे घडत असावे ?

याहून सोप्या भाषेत, विद्वत्तेच्या जार्गनशिवाय आणि समजून घेण्याच्या मैत्रीपूर्ण वातावरणात झालेली या विषयावरची चर्चा तुम्हाला इतरत्र कुठेही सापडायची शक्यता नाही. हेही तुम्हाला जड वाटत असेल तर तुम्हाला यात इंटरेस्ट आहे का पुरेसे, हे तुमचे तुम्ही तपासावे, हे बरे.

सादरकर्त्याच्या उद्देशाच्या मर्यादेतच कोणतीही कलाकृती असेलच, असे नाही --

मला हेच विचारायचे आहे की नुसते हे एक व्यक्तिगत कंडिशनिंगचेच क्षेत्र म्हणावे का ?

' थिल्लरपणा ' ने आपण अधिक मोठ्या समुदायाशी एकरूप होतो -- अशा फॅशनला बळी न पडता बोलू या --

' सामान्य विषयावर गहन चर्चा ' यात अर्थातच उपरोध आहे -- पण तुमचे आकलन जरा अधिक स्पष्ट करा --

तुम्हाला माहीतच असेल की इथे अनेकांना कांटाळवाण्या वाटणाऱ्या ' वेटिंग फॉर गोदो ' चा पहिला प्रयोग तुरुंगातल्या कैद्यांपुढे झाला होता आणि त्यांना तो प्रचंड आवडला होता -- नंतर ते नाटक अधिक विचक्षण म्हटल्या जाणाऱ्यांना आवडले तरीही --

तर, करमणुकीची नुसती भूकच नव्हे तर हाव -- ही वस्तुस्थिती आहे --

एक अश्लील म्हणून नाव झालेली दाक्षिणात्य फिल्म होती -- टुरिंग टॉकीजच्या फिल्म्स आमच्यामार्फतच येत -- ती रिसीट सोडवून घ्यायला आलेल्या मालकाला मी म्हटले, मी येणार आहे -- तिकीट एक रुपया -- मला अर्थात माफ -- तर तो सिनेमा चालू व्हायची वेळ आली तरी मी गेलो नव्हतो -- घरी माणूस आला विचारायला -- म्हटले, अरे, आजच असे नाही, येईन --

मी एका खेड्यात शाखाप्रबंधक होतो -- तिथे अस्सल गावरान तमाशा आला होता -- म्हटले, मला यायचेय -- साहेब, तुम्ही ? ! -- लोक म्हणाले. म्हटले, भाईयों, ( तिथे कुठे और बहनो म्हणायला कुणी असणार ) काम संपल्यावर मी तुमच्यापैकीच एक -- काळजी करू नका --

मित्रांनो, मी इतका नाट्यवेडा आहे की पाच रुपये तिकिटावर इथून रांगेतून जा आणि तिकडून बाहेर पडा -- मधल्या वेळात स्तन हलवत नाचणाऱ्या स्त्रिया पाहता येतील -- हेही मी पाहिलेले आहे --

आता वरच्याच उदाहरणात -- कधीही कुणाला पैसे उसने देऊ नयेत, हे घेण्यासारखे की लोक कसेही वागोत, आपण चांगलेच वागावे -- हे घेण्यासारखे ?

त्या त्या संबंधित समूहात रंजन झाले -- संपला विषय -- असे जरी कुणी म्हणाले तरी विषय संपत नाही -- ' घेण्यासारखे ' हा शब्द विशेषतः सामान्य म्हटल्या जाणाऱ्यांत अधिक वापरात आहे. काय आहे याचा अर्थ ?

होय -- त्याचबरोबर, हेही खरे आहे की लिहिता लिहिता त्या लेखकालाच ते टाकाऊ वाटू शकते --

कामगार कल्याण केंद्राच्या नाट्यस्पर्धा असतात. त्यातले एक नाटक बघायला गेलो होतो. घरचे लोक नको म्हणत असताना कुटुंबप्रमुखाने त्याच्या एका मित्राला काही हजार कर्जाऊ दिले होते आणि आता तो ते परत देत नव्हता -- हा विषय. थोड्या

वेळाने मला प्रचंड कंटाळा यायला लागला. पण प्रेक्षकांत बरेच कामगार होते -- ते सगळे स्पेल-बाउंड होऊन ते नाटक पाहात होते. याचा अर्थ, माझा कंटाळा मी अंतिम मानणे चुकीचे आहे !

काहीजण धर्मवादी असतात, काहीजण धर्म नाकारणारेच असतात तर काहीजण धर्मनिरपेक्षतावादी पण जातीयतावादी असतात ( धर्मवादापेक्षा जातीयतावाद श्रेष्ठ कसा, हे त्या गाढवांना कदापि सांगता येत नाही ! ). गुरुकिल्ली कुणाकडेच नसते. काळाच्या ओघात क्रिया-प्रतिक्रियांच्या प्रवाहात कधी ते, कधी हे, जिंकत राहतात, इतकेच ! भूतकाळातून आलेली प्रतिक्रिया म्हणून मनात विशिष्ट धर्मीयांबद्दल द्वेष बाळगणारे प्रतिगामी पण तसाच द्वेष एखाद्या जातीबद्दल बाळगणारे म्हणजे पुरोगामी -- असल्या निरर्थक, गधड्या विचारसरण्या बाळगत सगळ्यांचे संसार चालू असतात !

धर्म मानणारे आणि न मानणारे या विभागणीत फारसा अर्थ नाही -- कारण दोघेही वैचारिक क्षेत्रातलेच बोलत असतात आणि धर्माचा क्षण कोणता हे दोघांनाही समजत नसते. एकात्म मन म्हणजेच देव असे तुकाराम म्हणतो -- जेके इंटेग्रेटेड माईंड म्हणतात -- ते काहीही न समजून घेता इथे लोक ' देवाला रिटायर करा ' म्हणून भाषणे देत सांस्कृतिक आघाडीवर महत्कार्य करत असल्यासारखे वर्षानुवर्षे चमकत आणि गाजत राहतात !

सार्त्रचे ' फ्लाईज ' हे नाटक वाचा -- ते आहे ' पश्चात्ताप ' या संकल्पनेवर पण तुमच्यासमोरच्या या प्रश्नाबद्दलही क्लॅरिटी येईल --

तुम्ही डिसेंबरमध्ये जिवंत असून उपयोग नसतो -- लाईफ सर्टिफिकेट नोव्हेंबरचेच हवे --

वर्तमानपत्रातून लिंक देण्याचा पहिलाच प्रयत्न आहे -- जमलाय का, ते बघा --

भुली हुई यादों मुझे इतना न सताओ...

सखी जिवाची जिथे नांदते तीच एक पेठ ।
देव असो वा नसो दाविते मोक्षाची वाट ।। -- गदिमा.

-- आणि -- यांची एकी राहील का, त्यांची होईल का -- हा एक जिवाभावाचा विषय !

आपल्या मानसिक सवयीतले सगळे आजूबाजूला असले की माणसाला सुरक्षित वाटत असावे !

' सामाजिक तेढ मनातही नसणे ' असा एक अर्थ ' पुरोगामी ' या शब्दात असेल तर इथे एकही पुरोगामी उपलब्ध नाही, हे समजून पुढे चलावे !

फूट, तुकडे पडणे, विभक्त होणे, अभिमान, शत्रुत्व ही माणसाची गुणवैशिष्ट्ये आहेत -- हे सर्वांनाच मान्य असल्याने, जातीय विचारांबद्दल फार टची असून उपयोग नाही !

In the country of the Blind या नावाची एच जी वेल्स या लेखकाची एक दीर्घकथा आहे. त्या कथेत अंधळ्यांच्या देशात चुकून आलेल्या डोळसाची तपासणी करून डोळे ही त्याची विकृती असल्याचे निदान केले जाते !

मराठीत देतो, जमेल तसे -- प्रतिजैविक औषधांचा उपयोग फक्त जिवाणूंमुळे होणाऱ्या आजारांवर होतो, विषाणूंमुळे होणाऱ्या आजारांवर नाही. सामान्यतः विषाणूंमुळे होणारे आजार म्हणजे सर्दी आणि फ्लू हे आरोग्य चांगले असणाऱ्यांच्या बाबतीत मुदतीचे आजार असतात. याचाच अर्थ असा की विषाणू-संसार्गामुळे होणारे जे आजार आहेत ते काही मर्यादित काळापुरते असतात आणि तुमच्या शरीराच्या प्रतिकारशक्तीने त्यांच्यावर आक्रमण केल्यावर त्यांचे निराकरण होते आणि त्यांची लक्षणे नाहीशी होतात म्हणजेच तुम्ही बरे होता.

मराठीत व्हायरस म्हणजे विषाणू आणि बॅक्टेरिया म्हणजे जिवाणू -- हे बरोबर आहे ना ?

ते बाकीचे काहीही असो -- तुम्ही नोकरी करत असल्यास कामाच्या वेळात कोणतेही कर्मकांड असुंदरच !

ज्यांना इंग्लिश वाचणे अवघड वाटत असेल त्यांनी मी केलेले या कादंबरीचे ( Trial ) नाट्यरूपांतर वाचावे -- माझ्या --
www.champralekhan.com --
या वेबसाईटवर उपलब्ध.

मला महत्त्वाचे वाटणारे एक कारण म्हणजे संक्षिप्तता ! इथे थोडक्यात मुद्याचे बोलावे लागते ! खूप मोठे लेख लिहिण्या-वाचण्यापेक्षा आजच्या गतिशील काळाला हे फारच अनुकूल !

आरती प्रभूंची गाणी लोकांना पाठ असतीलही पण कविता सगळ्या पाठ असण्याची शक्यता नाही -- म्हणजे त्या कमी दर्जाच्या ! ?
मी तुमच्या पद्धतीने विचार नाही करत -- आणि तुम्ही तुमचे म्हणणे देवनागरी लिपीतून मांडा ना --

आशयाविना कवितेचे निकष ! त्यांचे त्यांना लखलाभ !

त्याच्या प्रतिमा जुन्याच आहेत, आजच्या नाही वाटत त्या कविता, लय नाहीय, वर्षाला फक्त दोनच कविता लिहितोय -- सर्जकता नाहीय, वर्षाला पाचशे कविता लिहितंय ते येडं, आणि मुख्य म्हणजे सामाजिक बांधिलकीच नाहीय -- काय इंग्याटाच्या कविता लिहिणार ! -- असे सगळे ऐकत जगावे लागते ! कवितेचा आशय समजून घ्यायचा प्रयत्न करणारे कमी !

सध्या मीही तीच अपराधी भावना पक्क होण्याची वाट पाहतोय !

माझ्या ' इराक ' या नाटकात लूइन्स्कीची भूमिका इरावतीने केली होती ! -- ती आठवण झाली !

तुका म्हणे उरला देव । गेला भेव ते काळी ।। -- म्हणजे भीती जाणे आणि ' कळणे ' एकच !

म्हणजे आधी शूर व्हा -- धाडसी व्हा -- आणि मगच हे समजून घ्या ! म्हणजे मी भित्रा आहे तर आधी शूर होतो -- असे ! म्हणजे जेके ज्याला बिकमिंगचा -- अमुक एक ' होण्याचा ' रोग -- म्हणतात, त्या रोगाचेच हे प्रचारक म्हणायचे !

मी स्वतः ते उद्योग काही करत नाही पण ज्यांना उपयोग करायचा असेल त्यांना काही सोप्या गोष्टी सांगतो -- धातूची मूर्ती बसवावी ( शेवटी घरातच पातेल्यात विसर्जन करून ती पुसून ठेवून देता येते ) -- ॐ नमोजी आद्या ही ज्ञानेश्वरांची ओवी २१ वेळा म्हणावी की झाली प्राणप्रतिष्ठापना -- मग पूजा, नैवेद्य करून दासबोधातले गणेशस्तवन वाचावे -- मग आरती ! हो गया !

awareness -- जगण्याच्या प्रक्रियेचे भान -- हे मी कलेचे सर्वोच्च मूल्य समजतो --
नेटवर सर्च द्या -- chinese poems of 21st century.

Vidyadhar Joshi -- विजय केंकरेच्या नेतृत्वाखाली तुम्ही सर्वांनी ते नाटक म्हणजे अनेकांना एक अमूल्य ठेवा वाटावा, असे केले होते !

मेंदू बधीर करणारे काही असेल तर बोला !

तो -- पुढचंच महत्त्वाचं आहे -- सात जन्म आम्हाला अडकवून ठेवण्याचं व्रत आहे तुमच्याकडे -- पण ' आता पुन्हा नको ' असं आमच्याकडे कुठाय ?

You commented on Ina de Graaf's post.
" My mind is the witness for truth or falsity -- I do not care for the opinion of majority. " -- St. Tukaram -- the great Marathi Poet.

मेटॅफिजिकल कवींमधला महान कवी !

एखाद्या कलाकृतीत आलेली जाण वा जगण्याचे भान -- त्या कलावंतात नसूनही वाचकाला / प्रेक्षकाला मिळू शकते --

वेडे, गुन्हेगार, व्यसनी, प्रचंड मानसिक गोंधळात असलेले -- अशांकडूनही जगण्याची ' जाण ' देणारी कलाकृती निर्माण होऊ शकते --

सहजता म्हणजे मनात येईल तसे वागत जाणे ?

माणसाच्या मनाच्या सवयीतले असेल तर ती नुसती विविधता -- सवयीबाहेरचे असेल तर नवा आशय !

माझ्या वॉलवरही असे एक सज्जन वारंवार येत आणि विषय कोणताही असला तरी ब्राम्हण कसे नीच, हलकट आहेत ते लिहीत. अहो, म्हटले, ठीक आहे, तुमचे हे सगळे वाचून सिद्धच झालेय ना आता ते ! आता चालू विषयावर बोला ना ! असे अनेकदा झाले. एकदा ते म्हणाले, भरल्या पोटी कविता करणे वांझोटेपणाचे आहे ! मग मात्र, आधी अनेकदा विनंती करून झालेली असल्याने त्यांना ब्लॉक करून टाकले ! मला असे करावे लागलेली अशी ही पहिलीच केस !

जागतिक शांतता हवी, असे सगळे एकमुखाने म्हणतात आणि अशांतता निर्माण करत राहतात ! भ्रष्टाचार वाईट हे आख्खा देश मान्य करतो पण तो भ्रष्टाचारी असतो !

जोरकस प्रतिमांचा मूलाघाती उपरोध !

एकापेक्षा एक भारी कविता वाचायला मिळताहेत हल्ली खूपजणांकडून --

होय -- पटतेय -- मला एक सुचवावेसे वाटते की समानतेबरोरच ' स्त्रीच्या वेगळेपणाचा योग्य सन्मान ' हे तत्त्वही जोरकसपणे मांडले जायला हवे --

बघायला हरकत नाही -- गुन्हेगारी जगत -- ठीक आहे -- पण प्रामाणिकपणे बोलायचे तर नेमकी काय कथा आहे ते मला कळले नाही ! शेवटचा सीन मी माझ्या नजरेने ' ॲब्सर्ड ' म्हणून पाहिला ! इन्स्पेक्टर शर्मांनी ९९ जणांचे एनकाउंटर केले होते -- आता एकच कमी होता सेंच्यूरीला म्हणून रेगेला उडवणे ! बेश्ट ! ( रेगे )

आपले इथले मित्र मिलिंद शिंत्रे यांनी या बाबतीत लिम्का विक्रम केलेला आहे ! ' प ' पासून !

तुम्हाला अनेकदा सांगूनही तुमचे हे भुक्कड उद्योग चालूच राहिल्याने तुम्हाला मी ब्लॉक करत आहे. अशी मला ही तुमची पहिलीच केस करावी लागत आहे ! दिलगीर आहे ! तुमच्याशी मैत्री चालू ठेवण्याचे माझे प्रयत्न मातीत गेलेले आहेत ! मनात राग नाही पण इथे मी माझ्या दृष्टीने काही गंभीरपणे लिहीत असतो, ते तुम्हाला वांझोटे वाटते -- त्यामुळे, नाइलाज आहे ! नमस्कार !

' पुनर्जन्म ' आणि ' अवतार ' या कल्पना अमर राहाव्यात म्हणून !

आनंदाचे इंजेक्षन !

चलो, नव्या जोमाने चर्चा करू आणि आपले वाचणाऱ्यांना पळवून लावू !

पुण्यामुंबईत आणखीही प्रयोग होणार आहेत -- तारखा कळल्यावर सांगेनच --

You commented on Mandar Phanse's post.
शुभेच्छा !

You commented on Sanjay Bhaskar Joshi's photo.
'अखेर प्रतीक्षा संपली.... !!

मी पुस्तक न वाचताही पुस्तकाबद्दल बोलेन ! प्रॉमीस !

लोकशाही म्हणजे हजार प्रकारचे आंतरविरोध ! त्यामुळे, अल्पसंख्यकांनीही बोलत राहावेच !

फारच वेगळ्या प्रकारचे आणि कल्पनेपलिकडचेही जीवन ! अत्युच्च सुखसोयींचे आणि असंख्य गैरसोयींचे आणि त्याचबरोबर असंख्य सुखदुःखांनी भरलेले जीवन ! शेवटी एकांतात आणि निसर्गसान्निध्यात जगण्याचा अर्थ गवसणे ! सगळेच अपवादात्मक ! हे सर्व वाचल्यावर कुणाचेही मन विनम्र भावांनी भरून तर येईलच पण कोणत्याही प्रकारच्या संकटांवर मात करून त्या सर्वापलिकडचा आनंद सापडू शकतो, याचा विश्वासही या मुलाखतीतून मिळेल ! अशी व्यक्ती आपल्या मित्रपरिवारात असणे ही आपल्या जगण्यातली समृद्धी आहे ! ग्रेट !

कुत्रे पाळायचा सल्लाही दिला जातो.

अज्ञान मुलांना तरी ' मर्द ' पणाची सक्ती नको ! सज्ञान मर्द कितीही मरू द्यात या वेडेपणात !

माझ्या आयुष्यातली पहिली दहा वर्षे ! ते कन्नड मित्र कधीतरी भेटावेसे वाटते !

'इसाक मुजावरजी के तांगेमें बैठकर पूरा बीजापुर देख लिया । पर इ पता नही के हमने शहर देखा के साला पुरे शहर ने हमे देखा !'
अजून टांगे आहेत तिकडे ? माझे बालपण विजापूरमध्ये गेलेले आहे -- मला मराठीपेक्षा कानडी चांगली येत होती ! आता अर्थात विसरलोय !

-- आणि मग तासंतास विरंगुळाच चालू राहतो -- त्याचीच चटक लागते !

डॉ. नारळीकर, आरती प्रभू यांच्या कामांचे कौतुक असते, मोठेपणाही कळतो पण ते ग्लॅमर नव्हे ! आपला कमकुवतपणा पोसणाऱ्यालाच आपण ग्लॅमर देतो. ग्लॅमर घेताना मग घेणाराही उदात्त बोलतो -- " लोक थकलेले असतात ! त्यांना विरंगुळा देणे, हेच माझे काम आहे ! "

नटनट्या आणि खेळाडू यांना ग्लॅमर मिळते -- शास्त्रज्ञ, डॉक्टर, शिक्षक, ग्रामसेवक, शेतकरी, कामगार यांना का मिळत नाही ?

सत्ताबदल झाला याचा अर्थ हा देश आता तडजोडी, आपद्धर्म आणि भ्रष्टाचार यांपासून मुक्त झाला आहे, असे मुळीच नाही. या महाकाय देशात सत्तेवर येऊ शकणे याचा अर्थच लोकांच्या याही ' आशा-आकांक्षांना ' वाव ठेवणे ! कोई नही बचेगा !

देशद्रोही वगैरे मुळीच नाही -- पुन्हा तात्त्विक प्रश्नच येतो -- सर्वच माणसे तुकड्यांचे -- विदीर्ण जिणे जगत आहेत -- हा प्रश्न कसा सोडवणार ?

कला निर्मितीच्या प्रत्यक्ष प्रक्रियेत कलावंताची सर्जकता कृतिशील असते -- तशी ती सतत -- कायम असेलच, असे नाही --

पंतप्रधान असणे वा नसणे ही फार दुय्यम गोष्ट आहे ! -- हेही खरे आहे मग ! कामावरून प्रतिष्ठा देण्याच्या पूर्ण रोगाबद्दल बोला ना -- फक्त कलावंत कशाला ?

It is the struggle to repeat and perpetuate pleasure which turns it into pain. Watch it in yourself. The very demand for the repetition of pleasure brings about pain, because it is not the same, as it was yesterday. You struggle to achieve the same delight, not only to your aesthetic sense but the same inward quality of the mind, and you are hurt and disappointed because it is denied to you. --- हे जेकेंचे एक वाक्य आहे. यात कितपत तथ्य आहे, ही ज्याची त्याने तपासण्याची गोष्ट आहे.

अहो, ते मी माझा जुना मित्र विद्याधरला म्हणालोय -- त्याची थोडी चेष्टा, गंमत चालते --

Vidyadhar Joshi --खूप आणि गंभीर बोललास !

मी तुम्हाला विनंती करतोय -- तुमचा अप्रस्तुत मजकूर इथे टाकत जाऊ नका -- प्लीज --

या बाबतीत मी खरेच दिलगीर आहे -- कार्तिकेयला का मागे पाडण्यात आले, हे मला माहिती नाही. नुसते हेच नव्हे, एकूणच देवादिकांतच मला इंटरेस्ट नाही. तुमचा अभ्यास दिसतोय -- तुम्हीच काढा शोधून. आणि समजा कार्तिकेयला

महत्त्व द्यायला हवे, असे तुम्हाला वाटत असेल तर तो एक पंधरा दिवसांचा सार्वजनिक कार्तिकेय उत्सव सुरू करा. माझे म्हणाल तर मला हे सगळे हानिकारक वाटते. गणेशोत्सव बंद करावा असे बहुमताने ठरले तर उत्तमच !

ते ब्राम्हणही गधडे होते, त्यांचे ऐकणारेही गधडे होते आणि हातात सत्ता आल्यावर सगळे तेच करतात -- हे न समजणारेही गधडेच असतात !

एखादा माणूस समजतो की त्याने फार अक्कल-हुशारीने त्याची विचारसरणी निवडलेली आहे, परंतु, असे एक संशोधन आहे की माणसाची विचारसरणी ठरण्यात त्याच्या जनुक नकाशाचे फार मोठे योगदान असते !

प्रसिद्ध अमेरिकन कवी पीटर शेल्डाल याच्या काही ओळींचा मीच केलेला अनुवाद --

माझे आयुष्य राहत आलेले आहे कंटाळवाणे
गोंधळलेले आणि कधीकधी अत्यंत घृणास्पद
आणि उद्रेकमय
परंतु मी कधीच काहीच उच्चारलेले नाही मुद्दाम
अतिशय प्रामाणिकपणाशिवाय

माझे स्वतःशीच असणारे मतभेद म्हणजे
असतात गैरसमज
एका बधिर आशावादाने पेललेले

बहुधा मी बाळगत नाही माझी मते
काही तासांहून अधिक काळ

धर्म ही गोष्ट जेव्हापासून सुरू झाली तेव्हापासूनची अधार्मिक जगणे ही आपली परंपरा आहे, त्यामुळे, त्यांचे म्हणणे बरोबर आहे !

तीन लाखांचा थकबाकीदार म्हणतो -- आधी पंचवीस लाखवाल्यांचे करा वसूल, मग मला विचारा !

बापाला धाडसीपणा आवडतो म्हणून पोराचा प्राण पणाला लावायचा !

देशाचे भावी नेतृत्व तयार करणारी भूमी आहे ही -- हे सगळे ओंगळ सण ! तुम्ही स्वतः नेते होत नाही, दुसऱ्यांनीही होऊ नये म्हणता -- मग हा देश चालवायचा कुणी ?

मरू देत हो ते सगळे ! या सणांतूनच देशाचे भावी नेतृत्व तयार होते -- मिळत राहते -- हीच खरी कृष्णकृपा ! ( इथे कृष्ण म्हणजे -- काळी ! )

बेलिफ असेल ! बेलिफ्या म्हणायच्या ऐवजी लाडाने बेलिया म्हणत असेल !

बोधप्रद, परिवर्तनवादी, भूमिका घेऊन लिहिणारे, स्वतःला बरोबर-चूक समजते अशी समजूत असलेले, मानवी जगण्याचे आपण न्यायाधीश आहोत असा आव आणणारे -- अशांच्या बाबतीत या आंतरविरोधाचे प्रश्न येतात. जो लेखक जगण्याचे परिपूर्ण भान घेतो -- त्या भानातच सर्व मानवी प्रश्नांचे सूत्र सापडेल, असे सुचवतो त्याच्या बाबतीत हे प्रश्न गैरलागू ठरतात. ' फलाशा न धरता कर्म करा ' असे काही तो तुम्हाला सांगतच बसत नाहीय तर तुम्ही एखादे तत्त्व मानता म्हणून त्याला कसे लावणार ? आणि बौद्धिक पद्धतीने एकरेषीय मूल्यमापन ही फारच मर्यादित गोष्ट आहे. प्रत्येक गोष्टीला हजारो -- लाखो कारणे असतात. माणसाचे मूल्यमापन ही गोष्ट अशी सोपी नाही.

माझे म्हणाल तर मी समाधान वा दुःख व्यक्त करण्यासाठी कविता लिहीत नाही -- मानवी मनाच्या अवस्था समजून घेत -- जगणे पाहणे असते --

ब्लॅक ऍन्ड व्हाईटचा सुरेल जमाना !

मी नकारात्मक वा सकारात्मक लिहीत नाही -- ' आहे त्याचे ' भान घेणारे असते --

सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वता एवढे ।। -- हा निराशावाद नव्हे -- वर्णन आहे. शांतता हवी -- हा विचार सगळ्यांना पटतो -- शांततेची बोलणी करत युद्धाची तयारी चालू असते !

पर्यावरण नाश, वर्चस्ववाद, डावपेच, युद्धे, छळ, अत्याचार -- यांनी युक्त आहे माणसाचे जगणे ! याला आशावाद म्हणा की निराशावाद ! सर्व तऱ्हेच्या विचारांची माणसे असूनही असे आहे ! नुसते विचार बदलून जगण्यातली ही भंगार वैशिष्ट्ये जातील ?

तुम्हाला ताप आला, याला लाईक कसे करणार ? बरे व्हा लौकर !

विदीर्ण मन हा माणसाचा सततचा प्रश्न आहे -- असंख्य युद्धे, प्रदूषण, पर्यावरणनाश -- हे सगळे पाहिलेच पाहिजे --

" मन वापरण्याची दुसरी एखादी पद्धत उपलब्ध आहे का ? " -- असे विचारून, " असे तर होणारच ! " -- असेही मी म्हणतो !

माकडछाप काळी टूथपावडर आणि डालडा !

मी जगण्यातला काही भाग लेखक असतो.

तो माझा एक उत्तम मित्र होता ! माझ्या ' डावेदार ' या नाटकात त्याने एक भूमिका साकारली होती. माझे ' इराक ' हे नाटक त्याने दिग्दर्शित केले होते . लौकर गेला !

मानवी मनाचे रेजिमेंटेशन होऊ नये, असे आपण का म्हणतो ?

संवेदनशीलता मारली जाणे आणि अलगतेच्या जगण्याला प्रचंड बढावा मिळणे -- हेही मुद्दे दिसतात ! ' जगण्याची सार्थकता जगणाऱ्याला वाटणे ' हे फारच धोक्याचे मूल्य आहे ! तथाकथित धर्माच्या पायावर सत्ता स्थापन व्हावी यासाठी असंवेदनशील होणे यात एखाद्याला ' सार्थक ' वाटू शकते ! कवितेचा उपयोग काय, हे विचारणारे लोक असल्या मेहनतीचा उपयोग काय, हे का विचारत नसावेत ? करमणूक होते -- हेच कारण ! एक केंद्रीभूत महत्त्वाकांक्षा ठेवून बाकीचे सगळे नगण्य समजत जगणे -- हा एकूण माणसाच्या जगण्यातला प्रॉब्लेम नाही ? -- हे मुद्देही विचारार्ह नाहीत ?

मिलिंद, शेवटी निकाल ज्याचा तो लावेल -- दोन्ही बाजूंचे मुद्दे येऊ द्यावे --

भराभर निष्कर्ष जे सुचतात त्यांची यथार्थता तपासण्यासाठीच आपण चर्चा करतो आहे -- सगळ्यांचीच वाट लागत असते -- तसे होणारच -- तसे व्हायलाच हवे -- ही चर्चा नव्हे --

पर्फॉर्मन्स वा कामगिरी -- ही झाली याची एक बाजू -- दुसरी बाजू आहे शरीर आणि मन एका चाकोरीत फिट करून टाकण्याची -- तीबद्दलही बोलले जावे --

सोप्पे आहे -- पक्षी घराकडे परत चाललेले असतील तर तो फोटो सूर्यास्ताचा !

हे लोक हिंदी पिक्चर बघत नसावेत, त्यामुळे स्मृतिभ्रंशाचे किरकोळ प्रॉब्लेम यांना अवघड होऊन बसतात ! कशा प्रकारच्या अपघातामुळे स्मृती गेली ? तसाच अपघात पुन्हा घडवून आणायचा, की झाले ! स्मृती इन टॅक्ट परत येते !

नगर जिल्ह्यात एका गावाचे नाव ' थूगाव ' होते ते बदलून नंतर ' सुगाव ' करण्यात आले !

कादंबरी लेखनाची प्रक्रियाही समांतरपणे देत जाण्याचा हा उपक्रम निश्चितच अनेकांना उपयोगी ठरेल. कशा प्रकारचे प्रश्न येऊ शकतात, त्यांबाबत कसा शोध घेतला जाऊ शकतो -- हे नक्कीच मौल्यवान आहे. शक्य तर कादंबरीसोबतच हेही यावे.

ऑस्कर वाईल्डला कोटेशन्सचा बादशहाच म्हटले पाहिजे !

मनाच्या प्रतिक्रिया अमुक अशा असायला हव्यात -- असे ठरवून होऊ शकत नाही -- अन्यथा, ' फलाशा न धरता कर्म करावे ' हे सगळ्यांना पाठ असते पण ' आपोआप ' तसे कुणीच जगत नाही !

मन हे भ्रममूलकच असते -- असे वा तसे -- आणि भ्रम हे अंतिमतः हिंसकच असणार --

सकारात्मक मन म्हणजे काय ? स्वसंरक्षण, भीती, निराशा -- यांव्यतिरिक्त मन ?

मन हाच एक शेवटचा आणि सर्वंकष टप्पा आहे असा निष्कर्ष आधीच मान्य केला तर माणसाच्या जगण्याची उडणारी सगळी धूळधाण अटळ आहे, असे स्वीकारणे होते !

कुणीही काहीही सांगितले तरी त्याचा उपयोग होणार नाही -- शंकाकुशंकांचे रान उठत राहील -- स्वतः निरीक्षण करणे -- पाहणे -- हा एकच मार्ग !

साहित्याचे मटेरियल / कच्चा माल / अनुभवक्षेत्र -- हे समान असणे -- हे एक समकालीनतेचे लक्षण म्हणता येईल का ?

मन द्वंद्वात्मक पद्धतीने चालते -- द्वंद्वात्मकता गेली तर द्वंद्वात्मक प्रेमही जाणार --

मी खेड्यात असताना ऐकलेला उपाय -- घरात वेखंड जाळणे ( घरात साप येऊ नये, यासाठी ).

फ्रेंडस, कवितेतला ' मी ' म्हणजे मीच असेन, असे नाही.

प्रवेश -- निर्गमन. उपोद्घात मधे घात असल्याने तो शेवटी असावा, असा उगीचच समज होतो -- तो शब्द नकोच -- माझ्या एका नाटकातले एक पात्र म्हणते " शेवटचा उपोद्घात मी आधी लिहिणार ! "

Sharad Bhuthadia -- धन्यवाद मित्रवर्य ! ' किंग लियर ' आणि ' आईन्स्टीन ' नंतर तसे काही घेऊन पुन्हा या ! शुभेच्छा !

अति-व्यवधानांमुळे येणारा हा कंटाळा आहे की एकूणच ही एक समावेशक निराशा आहे ?

-- किंवा दोन्ही खोटे असण्याची शक्यता !

उत्तराधुनिकता एकदा मूल्यव्यवस्थाच नाकारते म्हटल्यावर ती याला महत्त्व देते, त्याला महत्त्व देते -- ही भाषा गोंधळात पाडणारी आहे.

अहो, एक साधी युक्ती करायची -- झांजीबारबद्दल तुम्हाला काही माहिती आहे ? -- नाही -- बरे, तुम्हाला ? -- नाही -- तुम्हाला ? -- नाही -- असे झाले की म्हणायचे -- ठीक मग ! मला आहे माहिती -- ऐका !

क्रमाने, अगदी थोडक्यात यांतले मुख्य फरक असे दिसतात -- (१) स्थलकालनिरपेक्ष वैश्विक सत्य वा मूल्य असते (२) तसे काही नसते (३) दोन्हींच्या समन्वयात मानवी जगणे चालते. ---- सखोल अभ्यासकांनी यावर अधिक प्रकाश टाकावा.

अरे ! माझी दोन नाटके -- ' एक गगनभदी किंचाळी ' आणि ' नाणेफेक ' त्यांच्या नेतृत्वाखाली पीडीए ने सादर केली होती ! त्यांच्या स्मृतीस आदरपूर्वक अभिवादन ! ( शशिकांत कुलकर्णी )

क्षणोक्षणी चमत्कार दिसणे -- जाणवणे हे अत्यंत जिवंत माणसाचे लक्षण ! सगळे सवयीचे होऊन त्यात गाडले जाणे -- हाच मृत्यू !

सर्जनशील साहित्यातली संदिग्धता म्हणजे अंदाधुंद, बेशिस्त भाषा नव्हे.

बोलतानाही घोटाळे होतात -- " असे मानणारा मी एक माणूस आहे " या वाक्यात ' असे मानणारा ' वर थोडा जोर येतो -- त्या ऐवजी ' माणूस ' वर स्ट्रेस दिला तर ' गाढव नाही ' हे मुख्य सांगण्यासारखे होते !

अचूक अर्थ पोचवायचा असेल तर शिस्त लागणारच -- अन्यथा गोंधळ माजतील !

विरुद्ध अर्थांचे शब्द असतात पण विरुद्ध अर्थांच्या वस्तुस्थिती सापडणे मुश्किल ! पूर्ण चांगली वा पूर्ण वाईट अशी माणसे कुठे असतात ? लाईट दिसणारी पण गंभीर पोस्ट !

चाललाच आहे गोंधळ तर अजून कुठेही न दिसलेला हा एक मुद्दा --
सगळ्याच जातींतल्या स्त्रिया अनुसूचित यादीत असायला नकोत का ?
( सबलीकरण हेच तत्त्व पायाभूत धरून ).

शिक्षण क्षेत्रातले आरक्षण खुल्यांना जाचक वाटू शकते पण नोकऱ्यांमधल्या आरक्षणाची कोण कितपत फिकीर करेल ?

मधू बाला चावला -- हे बरोबर होते ! -- मधू नामक मुलगा त्याच्या बापाला चावला !

हस्तरेषाशास्त्राचा अभ्यास करताना मला सदोदित स्वतःचा हात उपलब्ध असायचा !

मीही क्वचितच शंभरी गाठतो ! मराठीत ५०० चा कवितासंग्रह १० वर्षांत खपतो समजा -- म्हणजे वर्षाला ५० पडतात -- त्यापेक्षा इथला ताबडतोबीचा मामला खूप बेश्ट !

संस्कृती म्हणजे काय थोडक्यात ? -- शहाणपण ! ते तर स्वतःकडे पाहूनही येऊ शकते !

लैंगिक प्रेम असा सरळ विषय घेतला तर काय ?

साध्या साध्या नैसर्गिक भाव-भावना सतत शेकडो वर्षे दडपून टाकत आलेला जर हा समाज असेल तर त्यामुळे काहीच मानसिक विकृती तयार झाल्या नसतील ? की हे सगळे संत, स्थितप्रज्ञ लोक आहेत ?

सत्य-असत्यासी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमत ।। -- यावर फुले वाहणारे लोक स्वतः तसे जगत नाहीत, कुणाला तसे जगूही देत नाहीत -- बहुमताने दबवतातच !

तुम्ही म्हणताय ते योग्यच आहे. पण, पुरुष लेखकही खरोखर स्वतंत्र आहे का, हा प्रश्नच आहे. शेजारी, नातेवाईक, मित्र काय म्हणतील, हे प्रश्न असतातच. मिडियात आपली निंदा आली, घरावर मोर्चा आला तर काय होईल, हे मनात असतेच. आता तर अधिकाधिक कठीण होत चाललेले आहे. बहुमताचा आणि संघटनांचा जोर वाढत चाललेला दिसतोच. आणि जे लेखन करायचे ते स्वतःच्या भरवशावरच करणे योग्य असते !

स्त्रियांना साक्षर करायला या देशाने फार उशीर केला त्यामुळे एक प्रकारच्या करंटेपणातच गेले आयुष्य -- असे म्हणावे काय ?

आपल्याकडचे मोठे बहुतेक सदोदित परिस्थितीने गांजलेले आणि ' नीतीमान ' च होते ! त्यामुळे असले उद्योग त्यांना सुचले नसावेत ! की प्रेयस्यांना एकूणात लिहितावाचताच येत नव्हते, हा होता प्रॉब्लेम ? " दादा, माजं हे एक यवडं पत्र वाचून दाखिवता काय ? " -- असा मामला असल्यावर प्रेमपत्र लिहिण्यात पॉइंटच राहिला नसेल !

कोणतीही व्याख्या सर्वसमावेशक नसते -- हे तर जागतिक सत्य आहे ! आणखी व्याख्या जरूर याव्यात !

जायफळ घालून रोज एक पक्वान्न करायचे -- गोडीत प्रश्न मिटेल !

त्या दोन घटना पाहणारा एक स्थिर बिंदू हवा, असे काही आहे का विज्ञानात ?

मी नेटवर थोडेफार पाहिले त्यावरून हा विषय इतरत्रही चर्चेत असतो, असे दिसले. स्त्रियांच्या पुस्तकांना कमी लेखणे, असे स्वरूप दिसते. आवडी-निवडी आणि जगण्याच्या पद्धतींतले काही भाग शरीर-रचना, मेंदूरचना यांमुळे आहेत, अशी माहिती मिळते. पण मुख्यतः स्त्रीमुक्तीचा अभाव हे सामाजिक कारणच अधिक प्रभावी असावे, असे दिसते. व्यक्तिशः वा सामान्यतः स्त्री जितकी अधिक बंधमुक्त असेल तशी तितकी तिच्या भानाची व्यापकता वाढत असावी. पण यावर नीट अभ्यासपूर्वक लिहिले जायला हवे, असे वाटले.

स्त्री आणि पुरुष यांच्या मेंदू-रचनांमधले फरक आणि त्यांचे परिणाम यांबद्दलही खूप मटेरियल आहे नेटवर --

तसे नाही माझे म्हणणे -- स्त्रिया मोठ्या संख्येने बोलल्या तर तुम्ही म्हणता तसे याला एका सर्व्हेचेही रूप येऊ शकेल --

अंक चांगले आहेत -- उपक्रम चांगला आहे -- छपाईच्या बिनचूकपणाकडे लक्ष द्यायला हवे.

तन्मयता हा अभिवाचनाचा प्राण असणे -- हे महत्त्वाचे लिहिले आहे !

देव ही काहीतरी एक वेगळी बाह्य शक्ती असून ती सगळे घडवते / वा तसे काही नसते. हे ठीक. तुकाराम म्हणतो ' एकविध मन ' हाच देव. जेकेही integrated mind बद्दल बोलतात. मला हे महत्त्वाचे वाटते.

गडद निराशावादी आणि उत्तरआधुनिक लेखक यांच्यावरही या पोस्टचा रोख आहे, त्याबद्दलही बोलावे.

एकमकांवर कुरघोड्या करणे, वर्चस्वाची हाव बाळगणे, एकमेकांचा छळ करणे -- यांशिवाय माणसाला जगता येणे म्हणजे ' श्रेयस ' असे थोडक्यात म्हणता येईल.

मारुती शिवरामपंत कांबळी ! कोणतीही परिभाषा न वापरता, माणसाचे मन आणि एकूणच जगणे यांवर असा प्रकाश टाकणारा -- महाप्रचंड महत्त्वाचे काम केलेला -- अलिकडच्या काळात दुसरा माणूस नाही ! ही क्लॅरिटी पाहून अचंबित व्हावे !

प्रख्यात डॉक्टर सांगताहेत की ८५ टक्के रोग मनामुळे होतात !

जगभर ध्यानाचे केवढे प्रचंड महत्त्व वाढते आहे -- पाहा ना --

उगीचच स्वतःच्या अँग्रीपणाचे स्तोम माजवणे आणि लोकांना धाकात ठेवणे, हे उडवून लावायची गरज आहे !

मीही अर्थातच ही कविता मनात घोळवत ठेवली होती. शिवाय अनेक फ्रेंडसमुळे प्रोत्साहन मिळाल्यासारखेही झाले. आता मला काही ' अर्थ ' सुचू लागला आहे – तो असा – जमीन नांगरलेली आहे म्हणजे सृजनप्रक्रियेसाठी तयार आहे. अजून तिथे काही उगवलेले तर नाही. त्यामुळे, गवत समजून त्या ऐवजी अंधार चरण्याशिवाय गत्यंतर नाही. इथे हेही सूचित केले जाते की सर्जकता हे जगण्याला आवश्यक असे अन्न आहे. आणि ते उजेडरूपात असणार. सध्या असर्जक जगणे चालू आहे. जगण्याची क्लॅरिटी नसलेले व्यक्तित्व म्हणजे अंधाराचाच म्हणजे असर्जकतेचाच अधिक संपृक्त भाग. त्याचे ढेकूळ त्या रात्रीत विरघळून एकूण आसमंत अधिकच गढूळ करते. पण त्याच वेळी त्याला चंद्रदर्शन होते आणि त्याचे डोळे म्हणजे दृष्टीही उजळते. स्वतःच्या सावलीवर मुग्ध झालेले खेचर तो स्वतःलाच म्हणतो आहे. घोडा म्हणजे अति-तडफदारही नाही आणि गाढव म्हणजे अति-डलही नाही, अशी ही खेचर अवस्था. स्वतःची सावली त्याला दिसू शकतेय तीच मुळी चंद्रप्रकाशामुळे – सर्जकतेच्या आगमनामुळे. आता यापुढे अक्षर आणि ओळ हे शब्द येतात. त्यामुळे, ही कविता निर्मितीची प्रक्रिया असावी हे लक्षात येते. गळक्या ढेकळाचा आसमंत अजूनही गढूळच आहे. आता माळाचा विषय चालला आहे तर इथे मधेच पाणी कुठून आले, असा प्रश्न येतो – जेव्हा आपण ' पाण्यात चांदण्याने रडलेलं अक्षर ' ही ओळ वाचतो. म्हणजेच आतापर्यंत जे चाललेले आहे ते भाषेत व्यक्त होणे आहे – कविता त्या प्रत्यक्ष माळावर घडणारी घटना नाहीय – हे कळते. गढूळतेमुळे सर्जकतेला वाव मिळत नाहीय म्हणून पाण्यात चांदण्याने रडलेलं अक्षर. ते अक्षर मासोळीची लाटभर, म्हणजे छोटीशी ओळ होऊन, त्या गढूळ आसमंतात पोहतंय. – अशी ही वेळ आहे. सर्जकतेच्या आगमनाचे चिन्ह दर्शवणारी. आणि हे खेचर आता मात्र गवत समजून अंधारा ऐवजी स्वतःच्या सावलीचं चांदणं चरतंय. चांदण्यामुळेच, थोडी सर्जकता आल्यामुळेच खरे तर सावली दिसतेय – त्यामुळे सावलीचं खेचर – आता अंधारा ऐवजी चांदणं चरू लागले आहे ! हा मोठा बदल आहे ! आता कवीची माती म्हणजे त्याचे प्रदूषण करणारे व्यक्तित्व अंधाराच्या तळाला जाऊन बसते आणि ती अलौकिक घटना घडते ! मासोळीच्या सुळकांडीची लाट पकडण्यासाठी प्रत्यक्ष अवकाशाचा गळ अवतीर्ण होतो ! आता कवी चंद्राच्या दृष्टीने पाहू शकतोय – त्या मुग्ध खेचराचं चरणारं चांदणं ! आता सर्जकतेनेच ताबा घेतलेला आहे – तीच आता चरू लागली आहे ! स्वतः चंद्र झाल्यावरच सर्जकतेच्या चांदण्याचे अन्न मिळणे ! अशी ही सृजनाची प्रक्रिया इथे पूर्ण होते ! म्हणजे आधी प्राणिमात्राने गवत समजून अंधार चरणे, मग खेचराने चांदणं चरणे आणि शेवटी सगळे चांदण्यानेच चरायला लागणे ! अशी ही सृजनाची – कविता निर्मितीची प्रक्रिया ही कविता तीन टप्प्यांत मांडते ! हे सर्व, असे बौद्धिक विचार करत न जाताही, आहे त्या प्रतिमांच्या भाषेतही जाणवून घेत जाणे शक्य आहे ! – एकूणात ही एक वेगळी आणि चांगली कविता आहे. मला या कवितेची एक ' कमी ' वाटणारी बाजू अशी की ही घटनात्मक टप्पे सांगण्यातच सार्थक मानते. असे झाले, मग तसे झाले ! या ऐवजी मधल्या प्रक्रियेकडे पूर्ण लक्ष दिले असते तर ही एक ग्रेट

कविता झाली असती आणि मुख्य म्हणजे तशा लेखनात ती इतकी प्रतिमाबंबाळही झाली नसती ! पण आहे अशीही ही कविता वारंवार वाचणे होऊ शकते !

अप्रतिम चर्चा ! हा खडक फुटणेच शक्य नाही, असे वाटत असताना, आता आपण ही कविता नक्कीच आत्मसात करत चाललो आहोत !

नेमाड्यांच्या म्हाणण्याबाबत एक प्रश्न डोक्यात आहेच -- शब्दकळेचा अतिव्यय करणारा कवी भाषेला कवितेच्या सार्वभौमत्वाचे भान कसे काय देऊ शकेल ? चांगले लिहायचे हे अर्थातच आधी ठरवलेले असणार !

" या नवकवींना – नवलेखकांना झाडू घेऊन साहित्यक्षेत्रातून काढून टाकले पाहिजे " – असे काही संतापून बोलणे वा जे जे आपल्याला समजत नाही त्याच्या टिंगल-टवाळ्या करत चार आणखी तशाच लोकांनी जमून हसत बसणे – याला मराठीत एक परंपराच आहे ! पण आपल्याकडे कुणी फारसे लक्ष देत नाही आणि कलेचा प्रवाह आपल्या पद्धतीने चालू राहतो, हे समजत गेल्यावर ती परंपरा लोप पावत गेली. तरीही, त्या परंपरेचे तुरळक भक्त क्वचित आजही दिसतातच ! कलेच्या क्षेत्रात होणारे बदल वा घडणारे सगळेच स्वागतार्ह असते, असे नाही – पण, ' मला समजत नाही ' या निकषावर ते सगळे नाकारताही येत नाही. त्यामुळेच, आणि दिलीप चित्र्यांसारखा कवी असेल तर, त्यांची कविता फेटाळण्याची घाई करण्यात अर्थ नसतो. कलेच्या क्षेत्रात आधी समजून घेण्याची नम्रताच ज्याच्याकडे नाही, तो चुकून इकडे आलेला आहे, हे समजणारे समजून घेतात. सारांश, ही कविता समजून घेण्याचे प्रयत्न आपण करायला हवेत, असे वाटते. चित्र्यांच्या कवितेबद्दल नेमाडे आणखी म्हणतात, " स्वचे अव्यक्तीकरण करून संवेदनांचे सरळ भाषांकन करणे " हे ही कविता करते. ' कविता समजणे ' हे आपण ज्या अर्थाने अपेक्षितो त्यापेक्षा हे काही वेगळे असू शकते. या दृष्टीनेही या कवितेकडे पाहायला हवे. ' चरित्र ' नावाच्या त्यांच्या कवितेची शेवटची ओळ आहे – " लोळण घेत भाषेच्या रंगमय होळीत " – हेही चित्र्यांचे वैशिष्ट्य असल्याचे नेमाड्यांच्या प्रस्तावनेवरून दिसतेच. याही अंगाने या कवितेकडे पाहायला हवे.

नक्कीच हळूहळू ही कविता ' जाणवेल ' असे वाटतेय !

वाह ! फारच छान ! ' न समजणाऱ्या ' कवितेवर संतापण्यापेक्षा हे खूपच मौल्यवान आहे ! नक्कीच काही शोधणारे आहे ! एखाद्याने, त्याला समजत नाही म्हणून चिडून दिलीप चित्र्यांची कविता नष्ट करावी, हा कवीच नको वगैरे पोरकट बडबड करावी, असा हा कवी नक्कीच नाही ! तांब्यांनी त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाबद्दल लिहिलेले लक्षात घ्यायला हवेच.! चांगली सुरुवात करून दिलीत ! धन्यवाद !

प्रतिमा म्हणजे आणखीही बरेच काही म्हणता येईल -- पण वर दिलेल्या नेमाडेप्रणीत मार्गाने कुणाला काही सापडू शकेल --

तीनचारजणांना विचारायचे -- तुम्हाला झांजीबारबद्दल काही माहिती आहे ? कुणालाच माहिती नाही अशी खात्री झाल्यावर मग म्हणायचे, मग, मला आहे माहिती, मी सांगतो ! तशी तरी संधी कुणीतरी घ्यावी, हीच इच्छा !

नेमाडे म्हणतात की चित्र्यांनी भाषेला सतत कवितेच्या सार्वभौमत्वाचे भान दिले -- हा क्लू उपयोगी पडतो का, तेही पाहावे. शिवाय ते असेही म्हणतात की " शब्दकळेचा अतिव्यय हे त्यांचे जगण्याचा उत्सव साजरा करण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. " -- याचाही विचार व्हावा.

नेटचे प्रश्न होतात, सेव्ह करायची इथे सोय नाही, त्यामुळे, आधी भराभर टाईप करून पोस्ट केले आणि मग एडिट केले. ( अर्थात आधी दुसरीकडे करून घेता आले असते म्हणा -- )

आपले काही मतभेद असू द्यात पण तुम्ही ज्या सविस्तरपणे हे सगळे मांडताहात त्याबद्दल मनापासून धन्यवाद !

कोणतेही शब्द कोणत्याही क्रमाने टाकून केलेली एक निरर्थक रचना म्हणजे कविता, असे म्हणायचे नाहीच आहे. कोणत्याही चांगल्या कलाकृती या त्या त्या कलावंताच्या चिंतनशीलतेतूनच येतात आणि तो त्याच्या क्लॅरिटीतूनच निर्मिती करत असतो. गद्याची भाषा ही एकरेषीय असते तशी कलेची / कवितेची नसते. कलाकृती ही तिच्या निर्मितीप्रक्रियेत आजूबाजूच्या अनेक अर्थवत्ता समाविष्ट करत जाते -- व्यापक भानाच्या कलावंतांच्या कलाकृती अधिक समृद्ध होतात ते त्यामुळे.

नासिरुद्दिन शहा ' वेटिंग फॉर गोदो ' चे प्रयोग तीस वर्षे करतो आहे -- प्रत्येक वेळी मला हे नाटक नव्याने कळते, असे तो म्हणतो. ही अर्थसमृद्धी की अनेकार्थता की कल्पनाविस्तार ? एखाद्या चित्राचाही एकच एक अर्थ सगळ्यांना दिसला पाहिजे अशी अपेक्षा फक्त फोटोग्राफिक कलाच स्वीकारू शकेल ! कवितेसह एकूणच कलांच्या शक्यता अमुकच मर्यादेत असायला हव्यात असे म्हणता येणार नाही.

अहो, कविताच काय, काफ्काची ' ट्रायल ' कादंबरी घ्या ! तिच्याही अनेकार्थतेच्या आवया जगभर आहेत ! चांगल्या कलाकृती एकदा ' कळून ' संपत नाहीत !

तुमच्याच सडेतोड मैत्रीपूर्ण पद्धतीने इथे सांगावे लागेल की कविता म्हणजे एस्टीचे टाईमटेबल नसते. तिच्यातून अनेक अर्थवलये निघत असतात. तिचा गाभा सखोल असेल तर ती खोली राखूनही ती असंख्य प्रकारे जाणवू शकते. कवितेचा

एकच एक अर्थ अपेक्षिणे म्हणजे कविता नाकारणेच होय ! ' शंभर कँडल पॉवरची तंग कच्ची फळे ' असे या जगात कुठेच काही तुम्हाला सापडू शकणार नाही -- तेव्हा काय करणार ? कवितेला ' खोटी ' म्हणणार ?

हे माझे सर -- प्रा. शंकर वैद्य ! यांच्याकडून खूप शिकलो ! कॉलेजचे तास संपल्यावर आम्हा विद्यार्थ्यांना घेऊन ते मर्ढेकरांच्या ' सौंदर्य आणि साहित्य ' वर आमच्याशी चर्चा करत ! त्या आठवणी सतत राहणारच ! सरांना मनःपूर्वक शुभेच्छा !

' आध्यात्मिक ' या शब्दाची काहींना ॲलर्जी असू शकते -- त्या ऐवजी जगण्यातले मूलभूत प्रश्न असे म्हणू. मौल्यवान कलाकृती अशा प्रश्नांचे भान व्यक्त करतात. याचा अर्थ त्या सर्व कलाकृती आध्यात्मिक गुरू वापरतात, असे नाही !

वास, करंगळी, नाक , दिवे या सगळ्या प्रतिमा तर आहेतच पण ही पूर्ण कविताच एका सखोल प्रश्नाची प्रतिमा होते, असे जाणवते !

अबोध मन – दुःस्वप्न – भयस्वप्न – या अंगाने ही कविता पाहावी, असे मला वाटते. कुजल्याचा वास हा अस्तित्वाला एक धोकाच असतो, तो टाळण्यासाठी कवी रुमाल काढायला जातो तर त्याची करंगळी खाली पडते – ती तो दुसऱ्या हाताने उचलून घेतो ! तो रुमाल नाकावर धरायला जातो तर नाकच निसटून रुमालात येते ! करंगळी पडणे आणि नाकच निघून येणे या अस्तित्वाला अधिकाधिक धोक्याच्या घटना आहेत. पण त्यांबाबत अकांडतांडव काहीच नाही – जणू हे अपेक्षितच होते. एक उदासीनता आहे पण त्याचबरोबर अस्तित्व जपण्याची धडपडही आहे. त्या ‘ वस्तू ‘ जपल्या जाताहेत ! अशा स्वप्नात मनच भयप्रद घटना घडवते आणि तेच त्यांतून सुटता येईल असेही समजत राहते. निसटलेले नाक रुमालात गुंडाळून खिशात ठेवले जाते. तरीही अजून त्या कुजल्याच्या वासाचीच चिंता ! वास येतोच आहे आणि सवयीने खिशातल्या खिशात ते तुटलेले निर्जीव नाकही मुरडले जात आहे ! ही एकूण औदासीन्याची आणि तरीही सवयीच्या आत्मरक्षणाची हास्यास्पद कृती ठरते. हे सगळे सहन करतही जगत राहण्याची आस आहे ! हे अत्यंत कारुण्यपूर्ण आहे. सगळ्यात महाभयानक शक्यता म्हणजे त्या तुटलेल्या करंगळीत सडून आळ्या तर झाल्या नसतील -- त्याचा तर हा वास नसेल ? – ही शंका येणे ! म्हणजे बाहेरच्या वासाची शंका आता स्वतः सडलेले असण्याच्या शक्यतेवर येते ! हे पाहणे हे खरे तर जगण्यातले सर्वात मोठे आव्हान ! पण मन कचरते. ते दिवे घालवण्याची युक्ती करते ! इथे कळते की हे भयस्वप्न तर म्हटले तर जागेपणीचेच आहे ! स्वतः सडत चालल्याचे पाहायचे नाकारणे आणि तरीही ‘ नॉर्मल ‘ जगण्याची इच्छा बाळगणे ! बाहेरच्या गोष्टींपासून स्वतःच्या रक्षणाचे ठीक पण स्वतःच स्वतःला धोका, असे असेल तर ? मला ही एका सखोल अध्यात्मिक प्रश्नाची कविता वाटते.

तुम्ही तुमचे या कवितेवरचे लिहिलेत तर बरे होईल -- कविता समजून घेण्याचा हा उपक्रम आणखी वेगळी परिमाणे घेईल --

तुमचे वास्तववादी विवेचन इतरांनाही उपयोगी पडू शकते ! धन्यवाद !

आता, या सगळ्या गोष्टी कवी विचार करून घडवत नसतो -- त्याच्या समग्र आकलनातून ते सगळे आपोआप व्यक्त होते.

दिलीप चित्रे यांनी कोलटकरांच्या ' शंभर कॅंडल पॉवरची तंग कच्ची फळे ' या कवितेवर एक सविस्तर लेख लिहिलेला मी वाचला होता.

गिरीश, ते नाटक म्हणजे आयनेस्कोचे ' ऍमिडी '.

बरे, मला वाटणारी एक आऊटलाईन ( याला बाह्यरेषा म्हणावे की बाह्यसीमा म्हणावे ) देतो -- १. हा काही वास्तवातला घटनाक्रम नाही -- हे अबोध मनातून आलेले आहे. २. भीती आणि किळस या भावनांनी युक्त आहे. ३. भयानक गोष्टी या एक साधे रूटीन असल्याप्रमाणे सांगितलेल्या आहेत. ४. कवितेच्या क्लायमॅक्सला ( उच्चबिंदू, शिखरबिंदू ) जगण्याचा एक सहज भाग असल्याप्रमाणे दिवे जाताहेत. ५. अशा भयानक गोष्टींशी जमवून घेत जगावे लागण्यातले कारुण्यही जाणवते. ६. एवढ्या भयानक गोष्टी सहज सांगत जाण्यामध्ये विनोदही आहे. ( खिशातल्या खिशात नाक मुरडलं -- हे तर विनोदीच आहे. ) ७. भीती, किळस, कारुण्य आणि विनोद यांचे मिश्रण असलेली ही एक अद्वितीय, अजब कविता आहे. ---------- चला, आता, पुढे बोला ---

ही कविता सर्वांनी मिळून समजून घेणे, असे करू या. मी थोडा वेळ गप्प बसतो, नाहीतर एकाच दिशेने जाईल सगळे -- समजण्याच्या सर्व शक्यता पुढे याव्यात.

तुमचे-माझेच काय कुणाचेही, अगदी ' मोठ्या ' माणसाचेही, चरित्र मला महत्त्वाचे वाटत नाही -- तो भाग वेगळा -- आपण जो आपल्या जगण्याचा स्थिर पॅटर्न हा एक प्रकारचा दंडक म्हणून धरून चालतो, तोही संशयास्पद असतो -- हे दिसलेले मांडण्यासाठी ही पोस्ट -- चरित्रांचे भक्त हा तर एक स्फोटक चर्चेचा विषय होईल ! तो नाहीय विषय !

अविनाश, या गोष्टी आहेत तशा पाहणे -- हेच आधी महत्त्वाचे --

नीती-अनीतीचे, वैचारिकतेचे असे समाजहिताचे मानदंड मानणारे खूप लोक असतात -- दुर्दैव हे की ते मानदंड त्यांच्यासह कुठेही अस्तित्वात नसतात ! पण त्या मानदंडांना धरून सगळ्यांनी वागावे, असा आग्रह मात्र असतो !

कवी म्हणजे कुणाला काही समजू नये असे लिहिण्याच्या आटोकाट प्रयत्नात असलेला माणूस, असे काहींना वाटते !

ललित गद्यसुद्धा काही प्रमाणात काव्यच असते कारण ते बोलते तेवढेच सांगत नसते.

कवीला स्वतःची कविता समजावून सांगता न येण्याची अनेक कारणे असू शकतात -- त्यांतले हे एक --

शास्त्रीय शोध मांडणारे वा व्यावहारिक माहिती देणारे गद्य आणि ललित लेखनाचे गद्य यांतल्या फरकावर तुम्ही बोलणे आवश्यक वाटते.

व्यक्तिगत मनःस्थितीचे प्रक्षेपण करणारी कविता सामान्यतः साधेपणा गमावते --

नुसतीच सौंदर्यनिर्मिती म्हणजे कचकड्याचा हिंदी सिनेमा होऊ शकतो --

दुःख व्यक्त करणे आणि दुःखाच्या प्रक्रियेचे भान व्यक्त करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत --

कविता या फॉर्मचे त्या त्या कवीचे भान असते -- त्यातून क्राफ्टिंग बऱ्याचदा आपोआपही होते --

त्यातले क्राफ्टिंग दोन कारणांसाठी असते -- अर्थसमृद्धी वाढवणे आणि कमीत कमी शब्दांत व्यक्त होणे. प्रत्येक शब्दाचे मागच्या व पुढच्या शब्दाशी नाते असते -- एखादी एकच ओळ मोठी का येते हेही अर्थपूर्ण असू शकते.

ज्या अर्थी ' आळसामुळे ' म्हटले आहे, त्या अर्थी ' आळस नसण्याचा एक क्षण ' जगण्यात येऊन गेलेला आहे -- असे पाहावे ---

अभिजित झुंजारराव याने अलिकडेच सादर केलेले माझे नाटक नेमके याच विषयावर होते --

होय ! शेवटी जो तो / जी ती आपापले आकलन पाहात राहील --

पूर्ण मान्य ! मीही निष्कर्षांचा शौकीन नाहीच !

' सरळ साधी कविता ' असे नाही माझे म्हणणे -- तुकारामाचे बरेच अभंग सरळ साधे वाटतात, पण ते तसे नाहीत -- व्यक्तिगत अनुभव कितीही बारकाव्यांनी, संपन्नपणे दिला तरी खूप मर्यादित राहतो, असे मी म्हणतोय --

नुसता माझा अनुभव देताना त्या अनुभवाचा पूर्ण फील देणे महत्त्वाचे ठरते -- आकलन देताना त्याला महत्त्व राहात नाही --

एकेका शेरचा दुसऱ्याही काही संबंध नसणे हा गझलचा फॉर्मच आहे -- यावर मी सेतू माधवराव पगडी यांचे गालिबच्या कवितांचा अनुवाद करणारे ग्रेट पुस्तक वाचले होते !

जगणे समजून घेण्याची प्रक्रिया असणाऱ्या कवितांत प्रतिमांची फार गर्दी नसते -- असे एक विधान केले तर ?

कवितेतून जगणे समजून घेण्याची प्रक्रिया देणे आणि केवळ एक इंप्रेशन / अनुभव देणे यांतल्या फरकाचा इथे काही संबंध आहे का ?

अमूर्तता ही कोणत्याही ग्रेट कलाकृतीत असतेच -- ललित कला याचा अर्थच माहिती / निवेदन यांच्या पलिकडे जाणे --

जसे अमूर्त चित्रकलेत फक्त रंगांची, आकारांची, रचनांची भाषा असते, त्याचप्रमाणे, कवितेत फक्त प्रतिमांची भाषा असू शकते का ?

ग्रेसचीच अशी एखादी प्रतिमागच्च कविता कुणी इथे उलगडून दाखवू शकले तर छान होईल --

"Man cannot discover new oceans unless he has the courage to lose sight of the shore."
— André Gide

पुढे तर -- तुम्ही बोलाल त्याला अर्थ येऊ लागतो -- अशा अर्थाचे एक संस्कृत सुभाषित आहे -- कुणाला आठवत असल्यास सांगावे --

एके ठायी चपलत्वे, सरे ऐसा नाही झरा, लागला झरा अखंड आहे, होऊनि सकळ काहीच न होसी -- तुका म्हणे यासी वेद ग्वाही -- अशा असंख्य ओळींसह विठू म्हणजे काय ते समजून घ्यावे --

कोणतेही निष्कर्ष काढताना त्यातल्या असंख्य गोष्टी सुटून जातात आणि कोणतेही निष्कर्ष ' बरोबर ' असत नाहीत -- याची मला जाणीव असते ! ही एक तात्कालिक प्रतिक्रिया असून फार खोलात न जाता, आहे तशी दिलेली आहे. यातले मुद्दे, कंगोरे समोर यावेत, एवढाच हेतू आहे.

विभूतिपूजा ठेवा पण सेन्सॉर नको -- हे होणे अवघड आहे ! विभूतिपूजा, इतिहास-पुराण पूजा, निरनिराळ्या अस्मिता, हे सगळेच बंद व्हावे -- हे मान्य असेल तरच सेन्सॉरविरुद्ध बोलण्यात अर्थ आहे !

मला सुचलेली एक कविता -- मन भेगाळ भेगाळ --

पाऊस लांबल्याची, त्याच्या प्रतीक्षेची, उलघालीची, काहिलीची -- अशा लिहू द्यात ना सध्या कविता !
' मन भेगाळ भेगाळ ' -- चालेल ना !

एकटा चालणाऱ्याला ' गट ' वा ' समाज ' हे आत्मकेंद्री, संकुचित, स्वार्थी म्हणतात -- पण तशांत एखादा इंटेलिजंट असण्याची शक्यता असते. गट आणि समाज यांच्याशीच सतत आयडेंटिफाय होणाऱ्यांत कुणी इंटेलिजंट असण्याची शक्यता ना के बराबर समझो !

-- आपको सब सिंपल लगता है तो वही जीते जाईये !

वरचे सगळे लक्षात घेऊन -- भाषेमुळे ठराविक वर्गाचे वर्चस्व कसे प्रस्थापित केले जाते -- यावर आजच्या ' सकाळ ' च्या ' सप्तरंग ' पुरवणीतले यशवंत मनोहरांचे वाचा ना !

' मीच विश्व आहे ' असे म्हणत भाषिक, प्रांतिक, धार्मिक वा भूतकाळविषयक अस्मितांचे जीवन जगणे -- याला काय म्हणावे लागेल ?

सर्व सामूहिक वा व्यक्तिगत संस्कृतींमध्ये काही ना काही आदर्श असतात जे एकाच्याही आचरणात नसतात -- त्यामुळे संस्कृती ही ढोंगयुक्तच असते !

' संस्कृती ' म्हणजे अमुक एक मानसिक साठा वा सवयी ? तसे म्हटले तर कोणता ना कोणता मानसिक साठा वा सवयी प्रत्येकाकडे असतात ( वेगवेगळ्या ) -- उच्च-नीच कशाच्या आधारे ठरवणार ? की निव्वळ अस्मिता म्हणजेच श्रेष्ठता ? अस्मितेचा आणि संस्कृतीचा असतो काही संबंध ?

तरलता आणि काठिण्य, आसक्ती आणि विरक्ती, वियोग आणि मीलन -- या विरोधी मानसिक अवस्थांच्या कमीजास्त संघर्षात सर्जकतेचा नवजात कोंब खुरटण्याची कविता ! पकडायला अवघड अनुभव !

तुम्ही फ्रेश असण्याचे कारण कळले नाही तरीही तुमचा आनंद पाहून आम्हीही फ्रेश !

सौंदर्याइतकीच स्वच्छताही प्रचंड भावतेय !

विंदांच्या एका कवितेत ' घर अमुचे आकाश ' अशी ओळ आहे -- तिचा अर्थ -- आकाश हेच आमचे घर वा घर हेच आमचे आकाश -- या दोन्ही अंगांनी लागू शकतो !

यस ! छान सुचवलेत ! ही कविता राम पटवर्धनांना अर्पण !

मला आणखी एक शंका आहे -- ती शपथ ईश्वराला स्मरून घेतली जाते -- नास्तिकासाठी तिची शब्दयोजना काय असते ? उदा एखादा कम्युनिस्ट कशी घेतो शपथ ?

फ्रेशपणाचा कंटाळा येऊ शकत नाही, हे एक बरे आहे !

मला जांभई खरे तर संस्कृतात येते -- लोक तिला मराठीच समजतात !

FACE READING !

पूर्वी प्लेगच्या साथीत खूप लोक मरत -- प्रेत उचलायला माणसेही मिळणे मुश्किल होई -- तेव्हा लोक आलेल्या डॉक्टरलाच म्हणत -- जरा हात लावा, प्लीज ! -- हे करून करून वैतागलेला एक डॉक्टर संध्याकाळी थकून घरी येऊन जरा टेकत होता -- तेवढ्यात एकजण आला -- डॉक्टर लौकर चला, म्हणत -- डॉक्टर म्हणाले -- येईन पण खांदा देणार नाही --

मित्रांनो, माणूस आंतर्विरोधात जगत असतो -- हे सत्य फक्त पुन्हा एकदा व्यक्त केलेय, एवढेच !

स्त्रियांनाही हे प्रॉब्लेम असतात याचा आनंद वाटतो !

सौंदर्य आणि टेरर एकत्र पाहून दोन्ही जास्तच तीव्र होतात !!!

आणखी खूप वर्षे तुम्हाला माझ्याकडून शुभेच्छा मिळत राहोत ! आणि मुख्य म्हणजे, आपल्या असण्याने जगाचे भले होऊ देत राहू !

असंख्य लेखक-कवींशी साक्षेपी पत्रव्यवहार केलेली व्यक्ती ! स्मृतीस अभिवादन !

ठाण्यात त्यांच्या घरी जाऊन मी त्यांना भेटून आलो होतो ! त्यांच्या स्मृतीस अभिवादन !
( राम पटवर्धन ).

मीही आत्ताच पाहिली बातमी -- त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

-- आणि मुख्य म्हणजे माझा जन्मच पार्ल्यातला आहे -- त्यामुळे हक्काने मी पार्ले टीममध्ये आहे !

५ वी ते ९ वी मी पार्ले टिळक विद्यालय -- वाला !

पाठ दुखत असताना कोणतेही व्यायामप्रकार करू नयेत, असे डॉक्टर सांगतात.

आणि परदेशातल्या हेरगिरीसाठी जो खर्च होतो तो कोणत्या रकान्यात टाकायचा ?

आपल्याला जे आवडत / जमत नाही ते करणाऱ्याला क्षुद्र समजणे, ही एक पळवाट तर नाहीय ना ?

सॉरी ! असे होत असेल तर न वाचण्याचा पर्याय खुलाच असतो ! कीव आणि राग निर्माण करणाऱ्या असंख्य गद्य पोस्टही असतात -- त्या ओलांडून जातातच ना काहीजण पुढे ?

प्रतिभा, कवितालेखन जसे कमीजास्त दर्जाचे असू शकते तसेच गद्य लेखनाचेही आहे -- आपण कविता लिहीत नाही हा फुशारकीचा विषय कसा असू शकेल ? काही नवीन असतात -- हिरमुसण्याची, नाराज होण्याची शक्यता असते -- म्हणून टवाळ्या टाळाव्यात, एवढेच --

मनःपूर्वक अभिनंदन ! ही बातमी कळल्यावर मी लगेचच तुला अभिनंदनाचा मेसेज दिला होता -- तू पाहिला नसावास. या निमित्ताने अप्पांची ( दातारशास्त्री ) आठवण झाली ! एक दिवस ते आमच्याकडे राहिलेही होते ! काही वेळा त्यांच्याशी बोलता आले हे खरोखर भाग्य समजावे अशी ती महान व्यक्ती होती ! एका रुग्णाच्या बाबतीत -- त्याच्या गर्भसंभवाच्या वेळची निसर्गस्थिती विचारात घेऊन त्यांनी कशी फलदायी औषधयोजना केली ते त्यांनी मला सांगितले होते ! असे गुरू तुला लाभले, हे खरोखरच तुझे भाग्य ! तुझे पुन्हा एकदा अभिनंदन ! ( प्रशांत सुरू ).

सतीश, हेच डावपेच आणि त्यांची दुतर्फी समज राजकारणात वापरू लागा -- मी येतो तुमच्या प्रचाराला -- वळणच लावून टाकू !

प्रतिक्रिया नको -- समजून घेण्याची प्रक्रिया हवी --

आवडले की झाले, हृदयाला जखम होणे, मन भारून जाणे -- असे बोलणारे खूप असणारच -- शिवाय ते सगळे अधिक खोलातून समजून घ्यायचा प्रयत्न करणारेही असणार -- ' मला आवडली ! संपले ! यापुढे कुणी काही बोलू नये ' -- असे तर होऊ शकत नाही --

म्हणतात अमुक लेखन कविता असते किंवा नसते -- पण मग ते लेखन कविता ' असण्याची ' लक्षणे त्यांनी सांगायला हवीत -- मोघमाचे उदात्तीकरण चर्चेत उपयोगी पडत नाही --

लाखेजी, मी इथे दिलेली पोस्ट ' अस्सल कवितेची लक्षणे ' एवढीच आहे -- ती सगळी प्रभा गणोरकरांच्या कवितेत आहेत का, याची वेगळी चर्चा होईल --

जयंतजी, आता लाख्यांनी प्रभा गणोरकरांची कविता त्यांना का महत्त्वाची वाटते, ते लिहिलेले पाहिलेत ना -- तसे ते सगळ्या कवितांबद्दल म्हणतील का ? -- हा विचार करून पाहा --

आणि ज्यांना सगळे मोघमात सोडून द्यायचे असेल त्यांना ते स्वातंत्र्य आहेच ना !

शुक्रतारा मंद वारा -- आणि -- बीज भाजून केली लाही -- दोन्ही कविता आहेत ! झाले ?

कवितेचे मूल्यमापन करताना एकेक वैशिष्ठ्य लावून पाहायचे आणि जास्त वैशिष्ठ्ये पास झाली की ती तितकी मौल्यवान कविता म्हणायचे -- अशा जॉब-टेस्टिंगसाठी ही लक्षणे दिलेली आहेत, असे वाटत नाही -- जो हेतूच नाही त्यावर आक्षेप घेण्यात अर्थ नाही -- चांगल्या कवितेत यांतली काही लक्षणे निश्चित असतात, असेच पाटलांचे म्हणणे दिसते --

जयंतजी, ही लक्षणे तांत्रिक आहेत ?

लक्षणे ठरवून कुणी कविता लिहीत नाही हे खरे असले तरी -- पाटलांना चांगल्या वाटणाऱ्या कवितांतून त्यांना ही लक्षणे दिसतात -- हा सरळ अर्थ घेऊनच त्यावर काही आक्षेप असेल तर सांगणे योग्य होईल -- त्यांना तशी कविता लिहिता आली आहे का, हा वेगळा मुद्दा आहे -- एखादा समीक्षक एखाद्या कादंबरीची समीक्षा करत असेल तर त्याला चांगली कादंबरी लिहिता आली आहे का, हा प्रश्न अप्रस्तुत आहे --

मला वाटते, चांगल्या कवितेची एकूण लक्षणे त्यांनी दिलेली आहेत -- प्रत्येक चांगल्या कवितेत ही सगळीच लक्षणे असतात, असे त्यांचे म्हणणे नसावे.

जेके त्यांचे स्वतःचेही म्हणणे पारखायला सांगतात --

शब्दप्रामाण्य फेकून देण्यासाठी जेके ' सर्व धर्मग्रंथ फेकून द्या ' असे म्हणतात -- त्यानेही माणसे दुखावली जातात !

' टीकाविजय ' !

विजय दीनानाथ चौहान !

स्वतःला एका भ्रामक ' शहाणपणा ' च्या अवस्थेत कोंडून टाकणारे हे जगणे आहे !

काही दिवसांपूर्वी कॅप्रा नामक लेखकाचे ' द हिडन कनेक्शन ' नावाचे पुस्तक वाचले होते -- त्यातून झालेले हे विश्वदर्शन !

एखादा शिक्का मारून घेतला की प्रश्न आणि शोध -- हे संपूनच जातात ! मग काय, आरामच !

-- की हे सगळे बलाढ्य, राक्षसी शक्तींनी हातात घेतलेले असून आता कला, तत्त्वज्ञान, संशोधन, अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांवर बोलणेच बंद करावे, म्हणजे ती आजच्या काळातली कालसंगत कृती होईल ? आपले म्हणणे जरा स्पष्ट करावे.

मिलिंद रानडे -- विषय हा चालला आहे की माणूस सर्वयुक्त जगत असतो -- एक मिटेपर्यंत इतर सगळे बंद -- असे होत नसते -- या बाबत आपला काही मतभेद आहे का ?

इतका स्वच्छ, छान परिसर ? तिथे भारतीयच आहेत ना राहणारे ?

चल धन्नो !

सगळे भोग भोगल्यामुळे विरक्ती येते का ? भोगाचे पूर्ण होण्याचे काही प्रमाण असते का ?

एफबी चर्चेचा इतका बहारदार नमूना आजवर कुणीही पेश केलेला नाही ! ( चर्चाबहाद्दरांनी नाराज होऊ नये ! )

भरगच्च मन हे मृत मन असते !

आमच्याकडे द्या राजीनामा -- आम्ही नामंजूर करू -- प्रॉमीस !

लिहिता लिहिता कवीने स्वतःच्या पूर्वग्रहांतून बाहेर पडणे -- हे मुख्य नावीन्य !

काहीशा वेगळ्या प्रतिमा, थोडी वेगळी मांडणी, थोडे भावनेला हात घालणे, थोडी चमत्कृती, आणि हो -- पुनःप्रत्यय ! -- हेच असते का नावीन्य ?

मला पटले तरच मी असा भरघोस पाठिंबा देतो -- कुणाच्याही खूप हेकट वा आधीच निर्णायक असणाऱ्या पोस्टस मीही शक्यतो टाळतच असतो --

लोकप्रिय राहायचे असेल तर भ्रष्ट जनतेचे मन संभाळा -- हाच दिसतो संदेश !

हा देश, शासन धर्माधारित असणार नाही हे ठीक, पण जे जे लोक धर्माधारित डावपेच करून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करतात, त्यांना सेक्युलर म्हणावे का ?

मी असे ऐकले आहे की त्या ब्रेथलेस गाण्यात तंत्रकौशल्य वापरून, ते एका श्वासात म्हटल्याचा आभास तयार केला गेला होता -- हा शंखनाद मात्र खरोखरच एका श्वासात चालला होता !

ते ग्रेटच आहे, यात वादच नाही -- पण मोदीजी पंतप्रधान झाल्यावर तरी, त्यांचा वेळ किती घ्यावा, याचे कलाकारांनी भान ठेवायला हवे !

आज सकाळीसुद्धा हा शंखनाद होता -- आधी तो सुरू झाला -- सगळे ऐकत राहिले -- बरेच सेकंद झाल्यावर, आता तो संपेल असे वाटले -- पण तो चालूच राहिला -- आणखी काही सेकंद गेल्यावर चुळबूळ सुरू झाली -- तरीही तो संपण्याचे चिन्ह दिसे ना -- आता हा अजून अर्धा ताससुद्धा चालू शकेल, असे वाटायला लागले -- तेव्हा मात्र राजनाथसिंगांनी हाताने खूण करून तो थांबवला !

नीलिमा, भारतातले सगळे लोक सगळ्या गोष्टींवर बोलतात -- पिक्चरवर बोलला तर पिक्चर काढून दाखवा, क्रिकेटवर बोलला तर क्रिकेट खेळून दाखवा, महागाईवर बोलला तर महागाई कमी करून दाखवा, कारखानदारीवर बोलला तर कारखाना चालवून दाखवा आणि पंतप्रधानावर बोलला तर पंतप्रधान होऊन दाखवा -- असे पेच घातले तर सगळ्यांचेच जगणे मुश्किल होईल !

एकूणच दर्जा खालावल्यामुळे समावेशकता गेली -- उद्दामपणा कुठेही केला तरी शेकडो किमी लांब असलेलेही दुखावतात -- चिडतात --

' विकास होईपर्यंत स्वातंत्र्य स्थगित ठेवू ' असे म्हणणे म्हणजे ' विषमता जाईपर्यंत कला, तत्त्वज्ञान स्थगित ठेवू ' असे म्हणण्यासारखेच होईल !

एग्झिट पोलवाले लोकांना दुसरे काही करमणुकीचे कार्यक्रम फुकट दाखवायची ऑफर देतील !

पत्रकार, राजकीय निरीक्षक आणि विशेष तज्ञ ' मारून ' झोपल्यामुळे, चर्चेला लोकच नाहीत अशी दुपारनंतर टीव्हीवर अवस्था येईल --

राहुलच्या शेवटच्या भाषणातल्या अमुक एका वाक्याने सगळी निवडणूक फिरली -- हे लक्षात येऊ शकेल !

You commented on your post.
भाजपाचे बाकीचे पुढारी प्रचारात फारसे दिसले नाहीत -- हे एक कारण येऊ शकेल --

मस्त मजेत राहायचे -- मधून मधून वाजले किती ते विचारायचे !

खरा सावध होणारा बोहल्यावरून पळून जातो पण सगळे बेसावध लोक त्याला पळपुटा म्हणतात !

'शक्य तितक्या मित्र-मैत्रिणींना व्यक्तीगत धन्यवाद दिले आहेत... तरी सर्वांना पुनश्च मन:पूर्वक धन्यवाद !'
मुख्य म्हणजे तुम्हाला भरपूर शुभेच्छा !

( अनेक कवी-लेखकांचे, रक्ताचा थेंबही न सांडता, हसतमुखाने मुडदे पाडू शकलेला एक विनम्र समीक्षक ! -- असे चालेल का बघा -- )

मी असेही ऐकले होते की या वेळी काठावर जिंकण्याचे प्रकार बऱ्याच ठिकाणी होण्याची शक्यता आहे -- तसे असेल तर हे पोल फोलही ठरू शकतात -- वाट पाहणे बरे --

आपापसात शत्रुत्व न मानता, हा देश इथल्या नागरिकांचे भले करणारा ठरो, हीच सदिच्छा !

तरुण पिढीत ताणतणाव खूप वाढताहेत -- त्याचे गंभीर परिणाम होताहेत -- असे लेख सारखे येताहेत सगळीकडे --

आमच्या बँकेत एक शिपाई होता -- तो नोकरीला हजर न राहता ' माझी नोकरी टिकेल का ' हे पोपटवाल्याला विचारत बसे !

मी एखादा सूर्यास्त ' सुंदर ' म्हणतो आणि एखाद्या स्त्रीला किंवा तिच्या फोटोला ' सुंदर ' म्हणतो -- दोन्ही सारखेच असते का, याबाबत मला प्रामाणिक शंका आहे --

नात्यातल्या स्त्रिया, छोट्या मुली -- असे अपवाद सोडून पुरुषाला एखादी स्त्री सुंदर वाटणे, म्हणजे काय ? तर ती आकर्षक वाटणे, तिच्याकडे पाहून सुख वाटणे -- यात लैंगिकता शून्य असू शकते ? शुद्ध म्हणजे काय ? जे मनात घडते, ते बोलले जाते, इतकेच ! -- की न बोलणे शुद्ध ?

माणसाचे मन हे किमान द्विधा असते, हे पाहिले तर पूर्ण श्रद्धा अशक्यच दिसते !
धन्यवाद ! मोसम आलाय तर पीक काढून घेतो !

'आत्ताच मराठी मधल्या एका मोठ्या शब्दकोशात [ आदर्श मराठी शब्दकोश ] " मुंबई " या शब्दाचा अर्थ वाचला आणि फारच आश्चर्य वाटले. म्हणजे मुळात, " मुंबई" हे फक्त एका गावाचे नाव नसून , तो एक वेगळा शब्दही आहे, हे कळले. त्याचा एक अर्थ, माणूस, पशू किंवा पदार्थ इ. बेपत्ता होणे आणि दूसरा अर्थ सत्यानाश किंवा पूर्ण विध्वंस असा दिलेला आहे. तज्ञांचे काय म्हणणे आहे ?'
कुणी एखादा दूरदृष्टीचा असावा ज्याने मुंबईचे हे सगळे अर्थ अचूक सांगितले !

माणसाचे मन ! कमीजास्त प्रमाणात दोन विरुद्ध गोष्टी वागवते !

असुरक्षिततेचे भय हे या हिंसेच्या मुळाशी आहे --

कोणता ना कोणता समूह / कंपू करून जगण्यातच माणसाला सुरक्षितता वाटते ! तो कंपूहीन का नाही जगू शकत ?

या ना त्या प्रकारची अलगता आणि तिची अस्मिता हीच प्रत्येकाची ओळख ( identity ) असते. तीतूनच ही सगळी हिंसा उदभवते. मला विचारसरणीची अस्मिता आहे तर मी धार्मिक अस्मितावाले किती वाईट, हे सांगतो ! महत्त्वाकांक्षा हवी, वर्चस्वाची इच्छा असणारच पण विषमता नको -- असे म्हणून काय उपयोग ? बुद्धीच्या मर्यादा न ओळखणे, मन वापरण्याच्या पद्धतीबद्दल प्रश्न न विचारणे -- हे सर्वांना मान्य आहे तोवर या भयानकतेने क्षणभर हादरणे फारसे उपयोगाचे ठरणार नाही. आपण सगळेच जगण्याच्या या पद्धतीला बढावा देत आहोत !

" निसर्गाची आवड मला लहानपणापासूनच नव्हती ! " -- असे माझ्या एका एकांकिकेतला एक तरुण म्हणतो !

निवडणुकीच्या मोसमात गच्च कमावून बसलाय तो ! तो कशाला येईल तुमच्या खोट्या पैशासाठी ?

' गतकातर ' हा शब्द भारी आहे !

असेल बाबा हे सगळे खरेही -- पण, माझा प्रॉब्लेम असा होतो की मला जरी २४ तास मोकळे सोडले असते आणि मीही मराठी घेऊनच एमए ला असतो तरीही सुवर्णपदक ? नो ! ये मेरे बसकी बात होही नही सकती थी ! त्यामुळेही, येत असतील असे विचार !

स्टेटस उपरोधिक असल्याचे वर स्पष्ट केलेले आहे --

धन्यवाद ! एकदा स्टेटस दिल्यावर, ती चर्चा खूपच भरकटू नये आणि त्या विषयाचे सगळे कोपरे-कंगोरे समोर यावेत, एवढाच माझा प्रयत्न असतो -- त्यातून अमुक एक निष्कर्ष निघावा, असा आग्रह नसतो --

एका व्यक्तीने दुसऱ्या एका व्यक्तीवर केलेले प्रेम याचा पाया सुखशोधाचे आकर्षण हा नसतो ?

' बिढार ' मधला नायक त्याला आवडणारी मुलगी बघणार पण तिने अमुक कारणाने त्याला निवडले, असे होता कामा नये ! अरे वा !

क्षणिक की दीर्घकाळ हा नाही प्रश्न -- ते एका निवडलेल्या व्यक्तीवरचे प्रेम आहे --

काहीजण म्हणतात भरकटू दे चर्चा -- पण असे ताळतंत्र नसलेल्या, बेशिस्त चर्चेचे उदात्तीकरण करणे म्हणजे फारच निराशावाद होईल -- इथे, अर्थात, इतके होत नाहीय --

मग तर ते वैश्विक प्रेम असेल -- एका आवडलेल्या व्यक्तीवरचे नव्हे --

' झेपणे ' वगैरे शब्द का वापरावे ? ते चांगले असे काही ठरवल्यामुळे ? आणि झेपणे, पेलणे, सहन होणे -- हे सगळे काय आहे ? न मिळण्याला प्रतिक्रियाच ना ?

मिळाल्यास सुख आणि न मिळाल्यास दुःख -- ही वासना नाही ?

आत्मवंचना आणि परवंचना यांचा पाया नसलेले प्रेम म्हणजे काय -- यावर कुणीही बोलावे --

प्रकृतिभिन्नता लाख असू द्या -- मूळ मुद्याचे काय ?

ते ' अय्या ' आणि चंद्रतारे सोडा -- आजचे तत्सम दुसरे काही असेल -- प्रकार तोच --

-- मला खरेच इंटरेस्ट आहे -- या विषयावर आजच्या पिढीतला संवाद कसा असेल ? मला वाटते अधिक वेडा असेल -- तरीही तुम्ही सांगा --

You commented on Chandramohan Kulkarni's post.
मी माझ्या तीन नातवंडांना घेऊन गेलो होतो -- एवढी मोठी चित्रे त्यांनी प्रथमच पाहिली -- चित्रकला म्हणजे फोटोग्राफी नव्हे, हे त्यांना समजले ! त्या आनंदात, त्यांनी पुढे डोमिनोज पिझ्झा मध्ये जायला लावले !

सखोल समज हीच डावपेच झाली की भरभराटच की ! दुतर्फी अत्यानंद !

अनिल द्रविड --

१.

किती साहशील आता चंद्रऋतूंची ही गाणी
गात्रांतून रिचवू दे तव देहाची वारुणी

फुलातून गर्भारल्या सोनलाटा अनिवार
कसा सोसवेना तुला माझ्या नजरेचा भार

गूढ रानातून पळे जागलेला वात मंद
पान पान ग हलले सोड अंगांगाचे बंध

अंधाराच्या गालावर आज तारकांची तीट

रात पिऊन जराशी हो ग राणी आता धीट

२.

कितीक नावे खोदित गेलो तरी हरवली नाती

प्राक्तनातुनी माझ्या गळते अंधाराची माती

ताल विसरल्या गाण्यांचाही केला मी प्रतिपाळ

आकाशाने वाजविले मग भग्न दिशांचे टाळ

स्वप्ने माझी शिशिरफुलांची रात्रीच्या गर्भात

कपाळावरी त्यांच्या लिहिली कुणी विषारी जात

वेदीवरती नकारांचिया कुणी सांडले रक्त

दिवाभितांच्या वस्तीवरती रातकिड्यांची गस्त

--- ००० ---

' कथा अकलेच्या कांद्याची ' -- दुसरा अंक सुरू होतो -- राम नगरकर नोकराच्या भूमिकेत -- ते तिथल्या मोलकरणीला म्हणतात, आपण आता पकडापकडी खेळायचीय -- बरीच पळापळ झाल्यावर शेवटी ती त्यांना पकडते -- धापा टाकत विचारते, " हे सगळं कशासाठी ? " राम म्हणतात, " येडी आहेस का ? रंगमंच पूर्ण वापरला जायला नको ? " -- ती म्हणते, " का ? पूर्ण कशापायी वापरायचा ? " ते म्हणतात, " पूर्ण रंगमंचाचं भाडं दिलेलं असतंय ! "

मीही या बाबतीत एक स्टेटस दिले होते -- ते असे होते --

व्यक्तिगत, सामाजिक, आर्थिक, राजकीय -- असे बरेच प्रश्न माणसाला दिसतात आणि देशोदेशी -- समूहागणिक त्यांची रूपे वेगवेगळी असतात. पण या सगळ्या प्रश्नांची मुळे माणसाच्या मानसिक प्रक्रियांमध्ये असतात, ज्या सगळीकडे एकसारख्याच असतात. या मानसिक प्रक्रियांचे भान घेणाऱ्या कलाकृती या पूर्ण मानवजातीलाच प्रस्तुत ( relevant ) असतात. त्या श्रेष्ठ कलाकृती !

पेशंट म्हणाला, इथे दाबले की दुखतेय -- डॉक्टर म्हणाला, तिथे दाबू नका !

You commented on Chandramohan Kulkarni's post.

मी पाहिले -- चित्रकलेची आवड असलेल्या नातवंडांनाही दाखवले ! उत्कृष्ट चित्रप्रदर्शन !

विषय वैचारिक आहे की संशोधनात्मक की शास्त्रीय की ललित -- यावर ते अवलंबून आहे. ललित म्हणजे कथा, कादंबरी, कविता, ललित लेख -- असे काही असेल तर कुणाची काही फिकीर करायचे कारण नाही. आपला अनुभव, व्यक्तिमत्व आणि आकलन यांतूनच ते येणार. ते तसेच यायला हवे. अशा लेखनात यश, अपयश, टाळ्या, बक्षिसे यांचा मुळीच विचार करू नये. बिनधास्त लिखते जाओ !

' सज्जन ' म्हटला की तो ' सर्वमान्य सज्जन ' असावा लागतो !

फ्राईड बाबा की जय हो !

त्याला कितीही नाकारा ,हेटाळणी करा ,त्याचे विचार वास्तववादी समाजरचनेच्या आरोग्याशी जुळत नाहीत म्हणून झिडकारा पण तो पुन्हा पुन्हा तुमच्या चर्चेत येणारच, विक्रमाच्या वेताळासारखा मानगुटीवर येऊन बसणारच ...फ्राईडबाबाकी जय ... समाजासाठी मनाविरूद्ध जाऊन ,अनेक ग्रंथी साठवत कण्हत कुचमत जगणारे आणि आपण किती आदर्श जगलो म्हणून स्वतःच किंवा इतरांकडून पाठ थोपटू...

लैंगिक सुख म्हणजे फक्त संभोग आणि पुनरुत्पादन एवढेच नसते आणि या समृद्ध स्त्री-पुरुष सुखाला वयोमर्यादा नसते -- मेंदू चालू असेपर्यंत हे सुख मिळू शकते, हे शास्त्रीय सत्य पूर्ण जगाला समजते -- अपवाद फक्त काही नीतीमार्तंड !

प्रौढांमधला परस्पर खुशीचा मामला असल्यावर बाकीच्यांचा यात काहीही संबंध नाही !

मला असे दिसते की स्वप्रतिमा दुरुस्त करण्याचे प्रयत्न पूर्णपणे सोडून देणे म्हणजेच ती टाकणे !

काळूबाळूंना मारायला एक पोलीस काठी उगारायचा तर हे शहाणे म्हणायचे -- " नको नको -- लागेल -- लागेल -- " !

मजा यायची !

बांधिलकीवाले आणि परिवर्तनवाले एकेका सुट्या सुट्या प्रश्नांपुरते असतात -- जागतिक असू शकत नाहीत --

व्यक्तिगणिक कच्चा माल आणि अभिव्यक्तिपद्धतीही वेगवेगळ्याच असणार -- त्यावर जागतिकता अवलंबून नाही -- ते सगळे माझ्याही जगण्याशी मला प्रस्तुत तेव्हाच वाटते जेव्हा ते मानसिक प्रक्रियांचे भान घेणारे असते -- एकेका सुट्या सुट्या प्रश्नावर नसते --

गेल्या जन्मात तरुणपणी वारलेल्यांना हे आठवते की आपली एक प्रेयसी होती -- ती नेमकी कोणती ते आठवत नसल्याने जरा गोंधळ उडत राहतो !

अरे, समाजाच्या चाकोरीत फिट बसणारा, अपेक्षित असलेल्या सगळ्या सवयी लावून घेणारा, स्मूथ, सज्जन माणूस एकदम डल असतो ! तू रंगभूमीवरचा एक सर्जक माणूस आहेस ना ! डोंट वरी -- तुझ्याबरोबर मीही आहे -- आणखी एक ॲब्नॉर्मल !

मराठीतला -- चोरीचा मामला.

खेड्यांतल्या काही लोकांना जनावरांच्या रोगांवरही अशी औषधे माहीत असतात --

मरू द्या काठावरचे -- मैदानात उतरून तुम्ही गाजवा ना मर्दुमकी !

-- तुला आणि मला जे समजते ते खरे तर साधे आहे पण तेवढेही न समजणारे नीतीमार्तंड सर्वत्र असतातच ! ते स्वतः भंगार असतात, हे आपण ओळखून असतो !

-- आणि सोडा ना ' संत ' हा शब्द ! संत, सज्जन की हलकट, ते पाहू नंतर, मी स्वतः हलकट आहे, त्याचे काय ?

संत भेदाभेद करीत नाही याचा अर्थ तो स्त्री-संपर्क टाळतो, असे नाही -- संताने कसे वागले पाहिजे हे आपण ठरवणारे कोण ? आपण लायकी नसताना स्वतःकडे फार अधिकार घेतो !

जग कसे चालावे हे सगळे तुम्ही कोण ठरवणारे ?

शिवराळ भाषा, बदनामी करण्याचे धाक आणि स्वतः मोठे नीतीमर्तंड असल्याचे आविर्भाव घेऊन फिरणारे क्रांतिकारक एखाद्याचे नुकसान जरूर करू शकतील पण क्रांती झ्याटाची नाही करू शकणार ! --

-- बरेच गुन्हे, हलकटपणाचे प्रकार समोर येतात तेव्हा, मी यांतून पूर्ण मुक्त नाही, हे मला समजत असते -- मी विचार करतो -- हा आरोपी मी असतो तर ? --

पायाहीन, समजहीन व्यक्तिगत हनन करण्यात मला इंटरेस्ट नाही -- मी फटाफट निष्कर्ष काढत नाही -- असे आपण करू लागलो तर सगळेच निकालात निघू --

मला योग वगैरे समजत नाही -- त्यामुळे त्या बाबतीत मी नम्रच राहणार --

आख्खं विश्वच चमत्कार आहे ! चमत्कारावर विश्वास ठेवणारे आपण कोण !

शिवाय समाजवादी, कम्युनिस्ट, भांडवलशाहीवादी, धर्मवादी यांचे प्रत्येकी २५-२५ प्रकार !

सगळेच रोग हे कोणत्या ना कोणत्या मूळ विकृतींचे व्यक्त रूपच असतात !

विरार ते चर्चगेट याप्रमाणे लोकप्रिय ते उथळ म्हटले तर लोकप्रिय ते सखोल ठरेल !

यातली गंमत अशी असते की एका क्षेत्रात आपण संकुचित असल्याचे बेमुर्वतपणे सांगणारे -- दुसऱ्या क्षेत्रात दुसऱ्यांना नीती शिकवतात ! -- हे दाखवल्यावर ते म्हणतील -- ' होय -- आहोत आम्ही ढोंगी ! '

स्त्रीच्या आणि पुरुषाच्या विचारात, आकलनाच्या पद्धतीत फरक का असतात याचे भान वाढावे यासाठी ही पोस्ट होती !

रासायनिक बदलांमुळे होणारे मानसिक बदल, मेंदूच्या वेगळ्या रचनेमुळे असणारे फरक यांचे भान असण्याने अधिक समजुतदार नाते तयार होऊ शकते -- हे पाहण्याचा आळसच असेल तर विषय असा सोडून, टोलवूनही देता येतो !

-- मने जुळणे हे जे मोघम बोलणे आहे त्याच्यामागे काय काय असते ते शास्त्रीय संशोधन आहे -- अशा गोलमाल बोलण्यानेच मुख्य प्रश्न टाळले जातात -- म्हणजे आहे तसे चालू ठेवता येते ! समजयुक्त संभाळणे म्हणजे कण्हत-कुंथत संभाळणे -- असे म्हणणे ही निव्वळ टाळाटाळी आहे !

अहो, पन्नास टक्के संख्या स्त्रियांची आहे -- त्यांच्यासाठी होऊ दे थोडी कलकल !

पूर्ण चर्चा वाचा -- याला ' कला ' का म्हटले, हा प्रश्नच आला नाही या चर्चेत -- पुरुषांनीच फरक समजून घेण्याची गरज आहे -- हाही मुद्दा नीट हायलाईट होऊ शकला नाही -- न्याय, समता -- यांच्याशी संबंधित पोस्ट आहे ही --

-- आणि आपल्याला जे समजत नाही त्याच्या टिंगल टवाळ्या करत मजेत जगायचे ! -- उदा -- ' मॉडर्न आर्ट ' !

भेद असूनही समानता -- असेच व्हावे लागेल -- भेद नैसर्गिक आहेत --

स्त्री आणि पुरुष यांच्या मनांमध्ये -- जी मेंदूमुळे कार्यरत असतात -- त्या मेंदूंचे द्रव्य, रचना आणि रसायने यांचे फरक असतात -- त्यामुळे मनांचे कार्य वेगळ्या पद्धतींनी चालते -- असे संशोधन आहे.

खरे तर हे स्टेटस स्त्रियांना न्याय्य, चांगले जगणे मिळण्याशी संबंधित होते -- ते सोडून अमुक वयानंतर कुणी कसे वागावे या बोधप्रद विषयाकडे चर्चा गेली. त्यातही, स्त्री-पुरुष सुखसाधनेत वयाचा काहीच संबंध नसतो, हे शास्त्रीय सत्यही दुर्लक्षिले गेले !

शास्त्र, तंत्रज्ञान, गणित -- हे ठीक -- मानवी संबंध आणि त्यांतले प्रश्न यांबद्दलच आपण मुख्यतः इथे बोलतो --

स्त्री आणि पुरुष यांच्या मेंदू-रचना आणि मन वापरण्याच्या त्यांच्या पद्धतींतले फरक यांवर आंतरजालावर खूप माहिती उपलब्ध आहे -- हा नुसते विनोद आणि गंमती-जंमतींचा विषय नाही !

एरवी पुरोगामी असलेले फ्रेंडस ' हार्मोनल बदलांमुळे मनःस्थिती बदलणे ' अशा, या स्टेटसमधल्या अध्याहृत अशा गंभीर गोष्टींची दखल घेऊ शकले नाहीत, हे दुर्दैव अर्थात स्टेटसच्या चुकीच्या मांडणीमुळेच घडले असावे !

स्त्रीचे मन आणि पुरुषाचे मन या वेगवेगळ्या पद्धतींनी चालणाऱ्या गोष्टी असून पुरुषप्रधानतेमुळे, पुरुषांनी ते समजून घ्यायची गरज नाही, अशी प्रचलित समजूत दिसते -- त्या दिशेने खरे तर ही चर्चा जायला हवी होती -- पण वयाच्या दाखल्यांचे कागदच चर्चेत महत्त्वाचे ठरले आणि ती भलतीकडेच गेली ! असो ! स्टेटस मांडताना चुकले असावे !

ठामपणाने चर्चा ट्रिगर होत असेल तर मला हरकत वाटत नाही -- कारण मुळात मी म्हणतो तेच सत्य, असे स्टेटस मी कधी देतच नाही -- उलट तशा प्रकारची स्टेटसच इथे खूप सापडतील !

सर्वांना पटणारे -- कुणालाही न खटकणारे -- असे स्टेटस असू शकते ?

माझा भर स्त्री आणि पुरुष यांची मने वेगवेगळी असतात, यावर आहे -- ' मर्यादा ' म्हणजे कोणतेही स्टेटस थोडेफार खटकणारे -- न पटणारे असणे !

हेही सगळे मर्यादितच आहे ! हे फक्त विषय असू शकतात ! मी स्वतः हे निष्कर्ष मानत नाही !

-- कोणतेही स्टेटस कोणत्याही भाषेत द्या -- ते मर्यादितच असते -- विषय असतो तो एक -- माझा निष्कर्षाबद्दल कधीच आग्रह नसतो --

अरे बाप रे ! असे निघाले का यातून ! काढून टाकू का ती पोस्ट ?

-- हा कलावंतांसाठी राखीव विषय चाललेला नाही -- सर्जकता कधी नव्हतीच, त्यामुळे आटण्याचा प्रश्नच नाही -- असेही असतात -- एकूणच जगण्यात ! मानवी संबंध वेगवेगळ्या अंगांनी पाहणे आहे हे ! फलाशा असू नये असे म्हणणे तर भारतभरचे प्रचंड ढोंग आहे ! कला आणि कारागिरी यांतला फरक सांगा म्हटले तर भल्याभल्यांच्या तोंडाला फेस येतो !

दान करायचे ठरवताना तो देह असतो !

एवढी पिळवणूक करून -- कमी लोकांत जास्त कामे करवून घेऊन उरलेल्या पैशांत काय घडत असते ? इतक्या बेकारांच्या देशात योग्य मनुष्यबळाने कामे केली तर कुणाचे काय नुकसान होणार आहे ? की हा देश कायमचा भिकारीच आहे ?

वेल डन विद्या ! सर्वांनीच मतदान केलं तर राजकारणाचं 'डर्टी पिक्चर' चांगलं होऊ शकेल.
ही एक जबरदस्त बुद्धिमान स्त्री आहे, हे टीव्हीवरच्या एका कार्यक्रमातून दिसून आले !

अलिकडेच -- बीजेपीची जाहिरात मोहीम -- या विषयावर भरत दाभोळकरांची मुलाखत झाली टीव्हीवर -- ती उद्बोधक होती.

कामूची ' स्ट्रेंजर ' वा ' आऊटसायडर ' आठवावी. इथे सांगण्यासारखा एक किस्सा आहे आमच्या बँकेच्या ग्रामीण शाखेत एकदा एका शिपायाची आई वारली तरीही दुसऱ्या दिवशी तो कामावर आला. ब्रँच मॅनेजर त्याच्यावर खवळला. " तुझी आई वारलीय -- काय दुःखबिःख आहे की नाही ? जा घरी गधड्या ! " म्हणाला ! साहेब म्हणताहेत म्हणून तो परत गेला ! समाज, त्याच्या सवयीच्या परंपरागत कल्पनांमुळे एखाद्यावर दुःख लादतो, ते असे ! मला असे करणे विकृत वाटते !

Sharad Bhuthadia's photo.
नमस्कार डॉ. किंग लियर !

उदात्तीकरण हा प्रश्न टाळण्याचा एक सवयीचा मार्ग आहे !

पाणी स्वच्छ दिसतेय ! कुठले आहे हे ?

म्हणजे विनापक्ष लोकशाही ? -- हे काही नवीन आहे -- अजून पुढे मांडा विचार --

प्राणप्रिय प्राणवायूच महत्त्वाचा !

नवरा जेवण झाल्यावर ढेकर देतो, ते आवडत नाही -- हे एक आणि -- नवरा घोरतो -- हे दुसरे -- अशीही कारणे ऐकिवात आली होती घटस्फोटाची !

बाईलवेडा एक वेळ ठीक पण मोबाईलवेडा नको !

साडेदहाला सुरू होणाऱ्या ऑफिसात १०-२० ला लोक आपापल्या खुर्चीत हजर असत आणीबाणीत !

किती थोडे ठरले होते --

चहा पिऊ या

एकत्र --

दिलेल्या मतांपेक्षा मिळालेल्या मतांची बेरीज जास्त !

पुणे विद्यापीठाचे ललित कला केंद्र आहे -- तिथे नाट्यप्रशिक्षणार्थी बरेच असतात. एकदा मी एकाला विचारले की तुम्ही -- आज इथे होत असलेली मराठी नाटके पाहणे, त्यावर चर्चा करणे -- असे काहीच कधी करताना दिसत नाही -- हे कसे ? तर तो म्हणाला की हा काही आमच्या अभ्यासक्रमाचा भाग नाही -- अभ्यासातच आम्ही खूप बिझी असतो !

वेबसाईट पाहिलेली आहे -- बोलून अधिक माहिती मिळेल अशी व्यक्ती हवी -- माझ्या नातीसाठी --

मी एखादा तज्ञ म्हणून इथे बोलत नसतो -- सर्व फ्रेंडसबरोबर, त्या त्या वेळचे काही शेयर करत असतो, इतकेच -- ' पाहणे ', विचार, शब्दरचना -- काहीही चुकीचे असू शकते --

मनाची सततची हावरट अवस्था म्हणजे संस्कृती ?

अब की बार अहिंसक सरकार !

अज्ञात हे कधीच पूर्णपणे बुद्धीच्या कक्षेत येऊ शकत नाही, हे समजणारे भक्तिमार्गी कट्टर नसतात.

भक्तिमार्गाच्या नावाखालीही अशा एखाद्या वैचारिक रचनेचे जे अनुयायी होतात त्यांना अर्थात बौद्धिक श्रद्धावानच समजायला हवे.

आपापल्या कलांप्रमाणे बुद्धी वापरता येत असल्याने असंख्य मार्ग निर्माण होतात आणि त्या त्या मार्गांचे पाईक हे श्रद्धावानच ठरतात. त्या त्या मार्गांशी ते कट्टरपणे बांधले जातात. त्यामुळे अधिक हिंसक होतात.

प्रत्येक परिस्थितीला, घटनेला, प्रक्रियेला हजारो, लाखो कारणे-परिणाम यांची साखळी असते. बौद्धिक प्रक्रियेची ही मर्यादाच असते की ती तो सगळा आवाका घेऊ शकत नाही. काही निवडक कारणे-परिणाम साखळ्या पाहून जणू त्यांत सर्व काही आले -- अशी बौद्धिक प्रक्रिया असते. ती कधीच परिपूर्ण असू शकत नाही आणि त्यामुळे हमखास मार खाणारीच असते. त्यामुळे अशा अत्यंत मर्यादित समजुतीला पूर्ण मानून चालणे ही श्रद्धाच ठरते.

माणसाने जगण्यातल्या प्रश्नांना सामोरे जाण्याची प्रक्रिया ही चालूच असते. त्यांतलेच भाग म्हणून वर विचारसरणींची उदाहरणे दिलेली आहेत. ही पोस्ट तंत्र शिकणे वा उपयुक्त माहिती आत्मसात करणे -- यांबाबत नसून मानवी प्रश्न समजून घेण्याबाबत आहे.

बौद्धिक श्रद्धावन ही संकल्पना वर स्पष्ट केलेली आहे. प्रत्यक्ष ज्ञान नसलेली गोष्ट सत्य मानणे म्हणजे श्रद्धा, असे थोडक्यात म्हणता येईल.

मला सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा वाटतो -- ' भौतिक आणि अध्यात्मिक -- हे खोटे द्वंद्व ' !

आपण -- भक्तीमार्गी ढोंगी होऊ शकतात आणि बुद्धिवादी क्रूर होऊ शकतात -- असा घ्यावा का अर्थ , लोहियांच्या त्या वाक्याचा? मला ढोंगी आणि क्रूर यांत डावेउजवे करता येईलसे वाटत नाही --

जरा उष्णता तयार झाली -- अशा चर्चेत ते होणारही म्हणा -- पण लोहियांच्या वाक्याचा इथला प्रस्तुत अर्थ पाहावा, असे वाटते --

-- बुद्धी ही निवडक कारणपरिणामांची साखळी घेऊन काहीतरी आकलन तयार करते. हजारो, लाखो कारणपरिणामांचा आवाका घेणे बुद्धीला अशक्य असते. त्यामुळेच कोणत्याही प्रश्नावर बुद्धी अनेक ' हमखास ' मार्ग काढते -- जे सगळेच अर्धवट असतात. हे साध्या तर्कानेही पटण्यासारखे असते. तरीही त्यांतला अमुक एक मार्ग म्हणजे अंतिम आहे, असे समजणे म्हणजे श्रद्धाच ! म्हणून त्याला बौद्धिक श्रद्धा म्हटले. भक्तिमार्गी श्रद्धेत समर्पण-भाव असतो -- बौद्धिक श्रद्धेत ' मला समजते ' ही गुर्मी म्हणा वा आत्मविश्वास म्हणा -- असतो. बौद्धिक श्रद्धावान विरोधाने हिंसक होतो.

मानवी प्रश्नांना भिडण्याच्या -- कला, तत्त्वज्ञान, अध्यात्म, धर्म, विचारसरण्या -- आणि त्याही विविधतायुक्त -- अशा हजार वाटा असतात. फक्त मलाच कळले आहे -- आणि मी म्हणतो त्याच मार्गाने प्रश्न सुटेपर्यंत बाकी सगळे बंद ठेवा -- असे

कुणी म्हणू लागले तर अर्थातच त्याच्याकडे दुर्लक्ष होणार. माणूस सर्वांगांनी जगत असतो. विषमता नष्ट होईपर्यंत पु शि रेग्यांनी कविता लिहायला नको होती -- अशा म्हणण्याला फारसा अर्थ नाही.

-- बरोबर आहे -- माझे हेच म्हणणे आहे की प्रश्नाचे मूळ काय आहे -- नेमका हा गोंधळ का आहे -- हे समजून घेतले पाहिजे. याला आध्यात्मिक म्हणून आधीच टाळू नये किंवा ' नको आता विचार ' म्हणून ' कार्य ' करत सुटू नये -- त्याचा उपयोग नाही.

-- तुम्ही आकलन-प्रक्रियेशिवाय कृतीचे पुरस्कर्ते आहात का ? सगळ्या कार्यकर्त्यांच्या मागे विचारही असावे लागतात !

-- आध्यात्मिक तर आधी त्याज्य ! पण बौद्धिक, वैचारिक कष्टांनी माणसाचे कोणते प्रश्न सोडवले आहेत ? उलट अधिकाधिक विदीर्णता, फाटाफूट चालू आहे !

सॉरी ! सगळ्या जबाबदाऱ्या दुसऱ्यांवर ढकलणे -- आपण स्वतः मान्य केलेली मन वापरण्याची पद्धतच हे सगळे घडवते, याकडे डोळेझाक करणे -- आणि असे करून बाहेरच्या बाहेर सगळे प्रश्न सुटतील, अशी श्रद्धा बाळगणे -- याला मी भाबडेपणा म्हणतो !

याला आभासी जगच म्हणतात गजू -- पण ते पूर्ण खरे नाही -- इथलीही सुखदुःखे खरीच असतात --

प्रत्यक्ष भेटी होतच नाहीत हो ! खुश करो, खुश रहो और चुपचाप मर जाओ --

आणि आपल्याला छान वाटले, हे तर खरेच आहे ना ?

स्तुती वाया गेली -- हरकत नाही -- काय वाईट घडेल ?

-- ते खरे का खोटे, याची मला कुठे चिंता आहे ? जो भी सामने है --

सुमारे ६८ साली मी इतर अनेक विद्वानांबरोबरच, ज्ञानप्रबोधिनीचे डॉ. अप्पा पेंडसे यांचीही एक मुलाखत ' सहशिक्षण ' या विषयावर घेतली होती. तो एकूण मोठा लेख ' मनोहर ' मध्ये आलाही होता. आपले इथले मित्र Datta Saraph -- यांच्या नेतृत्वाखाली मी हे काम केले होते. या लेखाला प्रभाकर काटे यांची सुंदर चित्रे होती. त्यात ते पेंडसे महोदय म्हणाले होते की

२५ व्या वर्षापर्यंत मुलामुलींनी एकमेकांकडे बघताही कामा नये. प्रत्यक्षात, अजूनही, जास्त कडक दिसते वातावरण ! एरवी अगदी पुरोगामी असलेल्यांचीही डोकी फारशी वेगळी नाहीत, असे अनेकदा दिसते ! अमुकच चांगले असे म्हणता येत नसले तरी, हे प्रश्न आहेतच.

मतदान दोन्हीकडे करा म्हणजे झाले !

थोडा खुलासा करतो -- चांगले-वाईट, बरोबर-चूक, नैतिक-अनैतिक, न्याय्य-अन्याय्य -- अशा गोष्टींबद्दल ही पोस्ट आहे.

यशवंत मनोहरांचीही एक दीर्घकविता सकाळ पुरवणीत आहे --

मला तुमचे पटले -- विवाहित जोडप्यांनी एकमेकांशी कसे वागावे -- याची समजा एक सर्वमान्य रचना आहे -- तरीही -- त्या रचनेच्या कसाला उतरणारे एकही जोडपे सापडणार नाही ! अन्यायाचे वेगवेगळे प्रकार सापडतील ! फक्त प्रकाशझोतात असलेल्यांची चर्चा होते, इतकेच !

-- या नाटकामुळे अनेकांना किमयाची आठवण होते !

मतदान हा शब्द योग्य आहे का मतनोंदणी ? की अजून काही ???
ती भाषेतली एक महत्त्वाची कसोटी आहे -- वापरात असलेले असे ठरवून मुद्दाम बदलणे अवघड असते आणि गरजही नसते त्याची --

ठीक आहे ' मतदान ' -- आणि आता रुळलाही आहे तो शब्द --

माणसाला एक समूह-ओळख लागतेच ! तो एकटा जगू शकत नाही ! हा रोग आहे !

-- तुम्ही बिगर-हास्यास्पद बोला हो ! बोला ना !

ठीक आहे -- अध्यात्मातले काही लोकही म्हणतात की सगळे मुक्तीच्या दिशेने चाललेले आहेत ! मला तरी हे फारसे सखोल वाटत नाही !

-- तुम्ही सांगा ना सखोल अर्थ -- शिकायला माझी ना नाही --

पुरोगामी म्हणजे पुरोगामी विचार आणि कृती यांत फार कमी अंतर असल्याने नेहमी फेल होणारे -- आणि तथाकथित पुरोगामी म्हणजे पुरोगामी बोलत राहून कृती त्यापासून शतयोजने लांब ठेवणारे !

मूळ पोस्ट कृपया पुन्हा एकदा वाचावी --

बीजेपीकडे पैसा नसणे की असणे ?

-- अहो, आपण परिवर्तनाच्या शोधात ओरडत असतो पण आपण जे गटारी परिवर्तन करू शकलोय ते हे आहे -- हा उपरोधाचा सूर आहे हो इथे !

झुळुकीने पाने हलताहेत असे वाटते -- हे कशामुळे वाटत असेल ?

स्वतःशीही प्रामाणिकपणे वागता येत नाही !

I remembered the end of Sartre's ' The Chips Are Down ' -- ' ..... trying to live once again ... ' ! It is great !

-- जे achieving a purpose -- म्हणताहेत, ते आंतरविरोधाचे एक प्रमुख कारण असते ! उद्दिष्ट आणि प्रत्यक्ष यांतला आंतरविरोध !

आपण उत्साहाने आंतरविरोधांचे समर्थन करत गेलो तर आपण व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात ज्या ज्या गोष्टींबद्दल सतत ओरडत असतो त्या त्या सर्व गोष्टी समर्थनीय ठरतात आणि स्वीकाराव्या लागतात !

पु शि रेग्यांची आठवण झाली ! सौंदर्याचे मायाजाल उभे करणारी छान कविता !

अंगवस्त्र म्हणजे रखेली.

In the country of the blind -- या नावाची एच जी वेल्स या लेखकाची एक दीर्घकथा आहे -- तीत अंधळ्यांच्या प्रदेशात चुकून आलेल्या डोळसाची तपासणी करून डोळे हा त्याचा दोष असल्याचे ठरवले जाते आणि ऑपरेशन करून त्याचे डोळे काढून टाकायला हवेत, असे ठरते !

Slightly different context -- Emerson said -- Traveling is a fool's paradise ! -- Pl tell me his full name if you know.

अनेक आयामांची अर्थपूर्ण पोस्ट !

अरे बाबा, कोणतेही बौद्धिक ठोस उत्तर नाही -- हेच तर मी म्हणतोय -- आणि तुम्ही मला तसे उत्तर द्यायला सांगताय !

म्हणजे, सगळी बौद्धिक निराकरणे फिजूल आहेत, हे तुमच्या लक्षात येतेय !

विचारप्रक्रियेत एक कुठलीतरी कारण-परिणाम लिंक दिली जाते -- खरे तर हजारो लिंक्स असतात -- त्या एकत्रितपणे कोणत्याही विचारप्रक्रियेत येऊच शकत नाहीत --

ते सगळे जाऊ द्या -- तुमचे आकलन सांगा -- त्यावर बोलू --

एखाद्या माणसाला आपण मानसिक रोगी किंवा गुन्हेगार म्हणू पण तो तसा का झाला याच्या बौद्धिक प्रक्रिया सांगता येतात -- तो तसा होणे भागच होते, हे दाखवता येते -- पण शिक्षा कडक द्या, ही आपली मागणी असतेच !

स्वीकारलेल्या पद्धतीतीतच गृहीत धरणे, मान्य करणे, समर्थन करणे अंतर्भूत असते !

फक्त बौद्धिक विचार आणि विश्लेषण आणि ' आता समजले ' -- या पद्धतीला मी नाकारतोय --

मानवी जगण्यातले -- स्वतःच्या जगण्यातले भयानक प्रश्न दिसले तरी -- हे असे होणारच -- असे तर असणारच -- असे पटापट आहे ते गृहीत धरत न जाणारी काही मने असतात -- ती निष्कर्षांची घाई न करता प्रश्न विचारतात, स्वतः पाहण्याचा प्रयत्न करतात -- अशी ही गंभीर प्रक्रियाच असणार -- आव्हान-प्रतिआव्हान आणि वादात जिंकणे असली पोरकट प्रक्रिया नसणार -- मला या बावळट पद्धती वाटतात --

यावर इथे अनेकदा लिहून झालेले आहे -- चांगले जगणे, मानवी हित ( म्हणजे बौद्धिक साचे असे गृहीत धरायचे नाही ) -- असे काही नसतेच हा निष्कर्ष मान्य केला की सगळेच -- जे जे आहे ते ते -- युद्धापासून अन्याय, बलात्कारापर्यंत सगळेच मान्य करावे लागते -- मुख्य म्हणजे स्वतःचे सगळे दुःख मान्य करावे लागते -- यातल्या पेचापर्यंत तर जरा विचार केला तर कुणीही पोचू शकतो -- पण निष्कर्षाला पोचणे आणि थांबणे हे आधीच घडले असेल तर विषयच संपतो --

मी जे दिले आहे ते पोस्टमॉडर्नचेच अनेकदा मांडले गेलेले वर्णन आहे.

समजा ते विधान तुम्हाला अत्यानंदाने पटते पण माझ्या आकलनात ते बसत नाही -- असे का आहे, ते दोघांनी शांतपणे, निष्कर्ष धरून न ठेवता, शोधण्याचा हा विषय आहे -- सिद्ध करून जिंकण्याचा नाही ! तुम्हीसुद्धा जे आकलन मान्य करता ते जगातले सगळ्यांचे खोटे पाडून झाल्यानंतर करत नसता -- उगीचच नायनाटाची, निराशावादी विचारसरणी हीच सत्य, असे म्हणण्यातही फारसा मतलब नसतो !

तत्त्वबित्व काही नसते, सत्यबित्य झूठ असते, वैश्विक वा श्रेयस्कर असे काही नसते, मूल्यात्मक फरक असे काही नसते, दर्जेदार आणि चीप यांत फरक नसतो -- हे असे जे सगळे आहे, ते पोस्ट मॉडर्नच तर आहे !

मी काही राजकीय निरीक्षक वा विश्लेषक वगैरे नाही ( जे तसे असतात त्यांनाही फार सखोल काही समजते, असेही नाही. )
पण मला एकूण हे कसे दिसते ते मांडतो --
बीजेपी
१. घास हाता तोंडाशी आलेला असताना राममंदिर वगैरे, विरोधकांना खुश करणारे मुद्दे जाहीरनाम्यात घालावे लागणे.
२. धार्मिक भेदभावाने त्यांना वागायचे नाही आहे, हे हिंदूंव्यतिरिक्तांना पटण्यासाठी मदरशांना मदत, यासारखे मुद्दे यात घ्यावे लागणे -- त्यामुळे कट्टर हिंदुत्ववादी दुरावण्याची शक्यता निर्माण होणे.
काँग्रेस
१. धार्मिक तेढ देशविघातक आहे असे म्हणत, ती टिकावी आणि तिचा आपल्याला सतत फायदा होत राहावा, असे प्रयत्न करावे लागणे.
२. झालेल्या विकासकामांचे कितीही गुणगान केले तरीही, इतका भ्रष्टाचार झाला नसता तर याच्या दुप्पट विकास झाला असता की नाही ? -- या प्रश्नाला समाधानकारक उत्तर नसणे.

-- भारतातल्या दोन मोठ्या पक्षांना अशा प्रचंड फाटलेल्या अवस्थेत आणून उभे करणे, ही भारतीय जनतेची जगातली, स्तिमित करणारी अशी, एक विनोदी कामगिरी आहे ! कुणीही जिंकले तरी ही जनताच जिंकल्यासारखे होणार आहे, ते खरे तर यामुळे !

विमानाच्या खिडकीतनं हात बाहेर काढू नका --

मी स्वतः काही वर्षे हस्तरेषाशास्त्राचा अभ्यास केला होता. त्याला शास्त्र म्हणा की काहीही म्हणा, खूप अभ्यासपूर्वक आणि अविरत निरीक्षणांतून तयार झालेले ते आडाखे आहेत. माझ्या तुटपुंज्या अभ्यासातूनसुद्धा खूप काही ' बरोबर ' येत असे ! यात मास्टरी असलेले अनेक लोक जगात होऊन गेलेले आहेत. ही अंधश्रद्धा मुळीच नाही.

सगळ्यांना भरलं कापरं -- आले आता चंप्र !

चित्र पाहायचे कसे हे तुम्ही जे इथे सांगत असता ते आम्हा मित्रांचे उत्तम प्रशिक्षण आहे !

नाही -- जळगाव जिल्ह्यात होतो --

.

Mind is the personality.

-- माझ्यासारख्या सौम्य प्रकृतीच्या कवी माणसाला असा कडक चेहरा देऊन निसर्गाने कोणता डाव साधला आहे ते अजून मला कळलेले नाही ! बरे, म्हणावे तर मला विनोदबुद्धीही बरी आहे !

की आपल्याला झ्याट काही कळत नाही -- हे कळायला सुरुवात झाली आहे ?

मला भेटलेले बीजेपीचे राखीव लोकसुद्धा फार हीटेड ( संतप्तपणे ) बोलताना दिसले नाहीत ! की माझ्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर सगळेच संशयास्पद होते -- त्याचा तो प्रभाव असावा ?

त्या चप्पल-जोडीची किंमत कुणाकडून का असे ना, वसूल होऊ दे ! -- हे एक पण अन्न आणि किरकोळ प्राथमिक गरजा यांबाबत स्त्रिया नक्कीच जास्त संवेदनशील असतात !

( अर्धे जर गेलेच असेल तर ) पूर्ण त्यजति पंडितः !

या बाई म्हणताहेत ते संशयास्पद आहे -- या कॅटेगरीतली बहुसंख्य माणसे कडवट -- bitter होताना दिसतात !

नदी घाण आहे, ट्रॅफिकची वाट लागलेली आहे --

मग एका बाजूला अस्तित्ववाद आणि दुसरीकडे ' आज मूडच नाहीय ' -- एवढेच उरेल !

तुम्ही इथे देत असलेले फोटो पाहून पुणे हे एक अत्यंत आदर्श आणि सुंदर शहर आहे, असे वाटू लागले आहे !

-- दिलेली टार्गेटस पूर्ण केली की थांबायचे -- हे नंतर सुरू झाले. त्या वेळी मिनिममची टार्गेटस होती -- बाकी कामाला मर्यादाच नव्हती -- त्यामुळे जनतेचा रेटा हँडल करणे, हे एक महाकठीण काम असायचे ! -- तरीही दामाजीपंतच !

-- ही ८२ च्या सुमाराची गोष्ट आहे -- आणि त्याची भावना खरी असणार, असेच मला वाटते --

वर पुस्तकाचा विषय निघाला, तशा प्रकाराची एक गंमत सांगतो. जरा अनपेक्षित ! मी ८० ते ८४ ग्रामीण विभागात काम केले. शाखाप्रमुख म्हणून. त्या वेळी, राष्ट्रीयीकरणानंतरचे बँकांचे अनेक अग्रक्रम कार्यक्रम फुल स्विंगमध्ये होते. एका शाखाप्रमुखाच्या नजरेतून हे सगळे कसे दिसत होते याची कवितासदृश अनेक पाने मी इंग्लिशमध्ये लिहिलेली होती. In Due Course या नावाने. NIBM च्या एका मोठ्या प्राध्यापकांशी ओळख झाल्यावर ते सगळे मी त्यांना दाखवले. ते म्हणाले, अरे हे फार महत्त्वाचे आहे, NIBM ने फक्त आकडेवारीचीच पुस्तके प्रकाशित करावीत, असे काही नाही. त्या पुस्तकाच्या दृष्टीने काही प्रयत्नही झाले पण त्या वेळी मी पुण्यातल्या एका बऱ्यापैकी ताणतणाव असणाऱ्या शाखेचा प्रमुख होतो आणि त्या पुस्तकासाठीच्या भेटीगाठींना अनेकदा जाणे मला महत्त्वाचे वाटे ना म्हणून मीच तो नाद सोडून दिला. तरीही, आता कुणी जर आपल्या बँकिंगचा इतिहास लिहिणार असेल तर माझ्या या लेखनाला त्यात एखादा परिच्छेद तरी मिळावा, एवढे ते नक्कीच बरे आहे !

इथे मी चंप्र आहे तसा तिथे सीपी होतो !

मी जातिवंत ढोर मेहनतवाला असल्याचे ओळखून मला मात्र पूर्ण कामसंतुष्टी होईल अशाच ठिकाणी प्रत्येक वेळी संधी मिळाली ! क्वचित काही काळ सोडून --

अशा शेकडो गोष्टी आहेत -- वर ऐकूनही घ्यावे लागायचेच -- बँकेत कामच नसते काही -- फुकट पगार मिळतो !

हजारो शेती ( व इतर ) कर्जे असलेल्या शाखेत मी काही काळ होतो -- क्लोजिंगला प्रत्येक खात्याला त्या त्या दराप्रमाणे व्याज काढून ते लावावे लागे -- आम्ही ऑफिसर्स -- चेकिंग करणारे ! काही कारकून खंब्यांची देवाणघेवाण करून आपली कामे दुसऱ्यांकडून करून घेत !

माझी तंबाखू गोळी असायची ! स्वेच्छानिवृत्तीनंतर बंद केली !

त्या अनुभवांवर आधारित एक इंटरेस्टिंग पुस्तक होऊ शकते -- काय काय करणार ?

समजा प्रत्येकी तीनशे अकौंटस असलेली पन्नास लेजर्स आहेत -- तर प्रत्यक्ष स्वहस्ते त्यांचे बॅलन्सिंग टॅली करावे लागायचे ! एखाद्या लेजरला असलेला साडेतीन रुपयांचा फरक -- शोधताना २५१४ कसा झाला आणि मग आणखी दोन टप्प्यांनी ते कसे टॅली झाले याच्या कामसंतुष्टीच्या सुरस आणि चमत्कारिक कथा असत ! असे खूप असे ! आता ते काही नाही !

जरा चिडायला लावून बोलते करण्यासाठी एक वाक्य -- न्यूनगंडग्रस्त लोक नाटकातल्या साहित्यिकतेच्या विरोधात बोलत असतात !

एक साहित्यिक नाटक आहे -- त्यातले एक वाक्य बोलले जाते आहे -- त्या वाक्याचे तीन वेगवेगळ्या पात्रांवर तीन वेगवेगळे परिणाम होत असल्याच्या प्रक्रिया तुम्हाला समोर ' दिसताहेत ' -- माझ्या मते ते नाटकच आहे !

साहित्यिक नसलेल्या एखाद्या ग्रेट नाटकाचे उदाहरण दिले आहे का त्याने ? मला खरेच इंटरेस्ट आहे -- या बोलण्याचा एक दुष्परिणाम असा दिसतोय की प्रकाश आणि पोषाख नाट्यमय हवेत ! त्या एनएसडी महोत्सवात दीडशे दिव्यांचे एक भंगार, कंटाळवाणे नाटक आम्ही पाहिले ! हा रोग पसरण्याच्या मार्गावर आहे --

तो जे ' अनफिट फॉर द स्टेज ' म्हणतो -- ते कशा नाटकांना ते जरा स्पष्ट करा --

साहित्यिक असणे हा आक्षेप होऊ शकत नाही -- नाट्यमय नसणे, हा होऊ शकतो --

टी एस एलियटचे काय ?

शेक्सपियरचे काय ?

यावर मला असा प्रश्न पडतो की सार्त्र, पिरांदेल्लो यांची नाटके आणि बेकेट, आयनेस्को यांचीही नाटके साहित्यिक आहेत की नाहीत ?

चिं त्र्यं खानोलकरांच्या नाटकातला एक संवाद आठवला -- " वकील रडले नसतील -- त्यांच्या डोळ्यांत पाणी आले असेल ! " -- अशी सवय करावी लागेल !

" मी सोडून दुसऱ्यांनाच सुधारायची तातडीची गरज आहे " अशी तळमळ असलेले खूप दिसतात !

मुळात तुमचे घर उन्हात बांधलेय -- त्यात परत बाहेर येऊन उन्हात बसलाहात ! कशासाठी ?

तुटून पडणे -- हा प्रतिक्रियेचा एक प्रकार -- समर्थन करणे, बाजू घेणे, बांधील राहणे -- हा दुसरा !

अमुक याला विरोध, असे स्वरूप नाही -- तुमच्यामाझ्यासकट सर्वांच्या सर्व दुटप्पी, ढोंगी जगण्याचे भान घेणे -- एवढेच !

अल्ताफ आणि एन एम -- आपले पुरेसे बोलून झालेले आहे -- म्हणणे समोर आले आहे -- आता वाचक, फ्रेंडस यातून त्यांचे ते समजून घेतील -- आणि काही सिद्ध वगैरे होतच नसते ! तर, चलो, हाथ मिलाओ ! सबको शुभ गुढी पाडवा !

धन्य तो आशावाद -- आपापला दांभिकपणा कायम ठेवून दुसऱ्यांना सुधारण्याचा ! तुम्ही जे सारखे कबीराचे बोलताय, ते तरी तुम्हाला योग्य वाटतेय का ? कबीर जर जगाला काजलकी कोठरी म्हणत असेल तर तोही सिनिकच का ? ' मुझसे बुरा न कोई ' असे तो म्हणतो कारण दुरुस्ती माझ्यात पाहिजे, असे तो म्हणत असतो. तुमचा आशावाद म्हणजे आहे ते सगळे तसेच चालू ठेवा -- जमल्यास अधिक बिघडवत, सडवत जा आणि जमिनीवरच्या सत्याकडे डोळेझाक करून आदर्श काही बोला आणि त्याला जीव खाऊन टाळ्या वाजवा !

जेके म्हणतात, फंक्शनवरून स्टेटसची काय गरज आहे ? कलेक्टर आणि झाडूवाला हे माणूस म्हणून समानच आहेत !

आत्मकेंद्री मन हे विषमतेचे कारक आहे. तिथे काय काम होऊ शकते ते पाहायला हवे. विषमता गेली तर सगळीकडचीच जाईल -- फक्त स्त्री-पुरुष यांतली नव्हे --

मी इकडे मादक द्रव्ये विकत असतो पण सरकारी ऑफिसातला भ्रष्टाचार कसा वाईट, हे सांगतो !

कबीर नव्हे, तुम्हीआम्ही वाट लावतोय मानवी जगण्याची -- आणि एकमेकांना शिकवतोय !

करियर म्हणजे अर्थातच व्यवसाय, नोकरी यांतले काहीहि असू शकेल. आणि विभागणी करताना अमुक कामे स्त्रियांची ही पारंपरिक समज सोडून विभागणी !

Champra Deshpande commented on his own note.

सत्य

सत्य

...

कबीराला तर ' दागी ' ही बुरे दिसणार नाहीत ! हीरोची आणि आपली ती ताकद नाही -- त्यामुळे ते कोटेशन इथे फिजूल ठरते ! आणि ' नाइलाजाने ' सगळ्याच गोष्टी समर्थनीय ठरवणे -- हे तर करतोच माणूस शेवटी ! हीरोच्या कामामुळे गुन्हेगार मालदार झाले, त्यांची ताकद वाढली तर त्याला तो काय करणार बिचारा ? !

" तुम्हाला करमणुकीचे व्यसन आहे म्हणूनच तिथे इतकी उलाढाल होते आणि अंडरवर्ल्ड फोफावते आणि गुन्हेगारी वाढते आणि डोळ्यांत खरे पाणी यावे अशा घटना घडतात ! " -- असे तो हीरो म्हणू शकतो !

याबाबत एक ज्योक आहे -- शिक्षकांनी वर्गात हे सांगितल्यावर एक पोरगे एकदम जागे होऊन विचारते -- " किती अब्ज वर्षे म्हणालात सर ? " सर म्हणतात, " पाच -- " मग पोरगे म्हणते, " हं हं, मग ठीक आहे -- मला ऐकू आले, तीन -- "

माणसे एकसंध, एकात्म नसतातच --

माणूस करप्ट नसावा, माणूस उदार असावा, त्याने कुणावरही अन्याय करू नये -- हे सगळ्यांनाच पटते रे !

' संभावित ' म्हणजे काय ? बाहेर स्वतःची एक प्रतिमा सादर करणे आणि प्रत्यक्ष वागणे वेगळे असणे, हेच ना ? असे कोण नसते ?

सगळ्यात महत्त्वाचे असते ' घंटा ' स्कूल ! म्हणजे नाटका आधी आणि इंटरव्हलनंतर, पूर्वी एकदा घंटा दिल्या होत्या -- त्या अधिकाराने झालेले परीक्षक !

थिय्याम यांचे नाटक

...

अत्यंत कमी आर्थिक धोके पत्करून निर्माण होऊ शकणारी नाटक ही एक सादरीकरण कला आहे. त्यामुळे, सर्जक धोके पत्करणे इथे अधिक शक्य आहे. हे, नाटक या माध्यमाचे बलस्थान आहे. यापासून थिय्यामांचे नाटक दुरावते. असली नाटके अर्थातच सुरक्षित निर्मितीच्या मार्गानेच जातील. ( नाटकात गरीब काम करतील पण नाटक हे माध्यम गरिबांकडून हिरावून घेतले जाईल ! )

Champra Deshpande commented on a photo.

My Art Work.....water colour .....

निसर्ग मनात मुरलेला आहे -- तुमची चित्रे पाहात राहावी अशी अप्रतिम आहेत !

Champra Deshpande commented on a status.

माझ्या माहितीत मेलेल्या उंदरातले जंतू गाडीच्या एसीतून आत येऊन शोषले गेल्याने एक व्यक्ती खूप आजारी झाली होती ! नीट काळजी घ्या !

थिय्याम यांचे नाटक

त्यामुळे, ही अशी नाटके ' आशयनिष्ठ ' असू शकतात का -- या ऐवजी, ती ' मूल्यनिष्ठ ' असू शकतात का -- अशी दुरुस्ती स्वीकारावी, असे मला वाटते.

पॉलिश आणि मार्केटिंग -- यांतला पॉलिश हा शब्द -- भुरळ पाडणारा, अनावश्यक चकचकीतपणा, या अर्थी आणि मार्केटिंग हा शब्द -- आकर्षकपणा वाढवून, त्याची प्रसिद्धी वाढवून, ती कलाकृती श्रेष्ठ म्हणून खपवणे -- या अर्थी वापरलेला आहे.

हेकटपणे नाही पण थोडे चाचपडत का असे ना, या विषयात थोडे पुढे जाण्याची गरज वाटते. पोतदार म्हणतात त्याप्रमाणे, त्यांचे नाटक असे का आहे, याची एक कारणमीमांसा आहे, समजा, हे ठीक आहे. दुसरे म्हणजे प्रत्येक कलाकृतीचा आशय वेगवेगळा असतो. म्हणजे ही कलाकृती अशी का आहे हे समजणे आणि तिच्या आशयाचा वेगळेपणा समजणे, हे महत्त्वाचे आहे. हेच थोडे वेगळ्या प्रकारे -- पुल, वपू, गोपू आणि काफ्का यांच्या कलाकृती तशा तशा का आहेत, हे समजणे आणि त्यांचे ' वेगवेगळे ' आशय समजून घेणे. इथे गाडी थांबली तर मूल्यविचार वगळला जातो. वरकरणी आशय कोणताही आणि कितीही वेगळा असला तरी सखोलता / परिपक्वता हे मूल्य असल्याशिवाय ती कलाकृती मौल्यवान होत नाही. हे मूल्य आशयाच्या वेगळेपणानिरपेक्ष श्रेष्ठ कलाकृतीत अपेक्षित असते. आणि ते वेगवेगळे नसते.

तंत्र, चमत्कृती, झगमगाट यांच्या प्रभावात आशय मरतो, हे अनेकदा जाणवणारे सत्य आहे.

माध्यम कुणाचे, महत्त्व कुणाला -- हेही खूप महत्त्वाचे नाही -- थिय्याम यांच्या सादरीकरण पद्धतीत आशयनिष्ठता असू शकते का, हा प्रश्न आहे. तबला-पेटी जुगलबंदीला किशोरी अमोणकरांच्या आवाजाची साथसंगत -- असे हे होतेय का -- हा प्रश्न आहे. खूप लोकांना हे आवडते, हे दिसतेच आहे, त्याची कारणेही उघड आहेत. ही नुसती अनुप्रास-यमकांची चमत्कृतीयुक्त कविता होते आहे का, हा प्रश्न विचारलाच पाहिजे.

-- स्टेटसला मूळ मुद्दा, बीजमुद्दा, आरंभशब्द -- काहीही म्हणा - मी हा एक नवीन वाङमयप्रकार म्हणूनच याकडे पाहतो आहे -- त्या दृष्टीने माझे बीजमुद्दे एकदा पाहा -- नाट्यलेखनासारखीच यातही मजा आहे --

माझ्या रक्तातच थोडा चावटपणा आहे -- तो वरील स्टेटसमधल्या त्या छोट्या कंसात आणि शेवटच्या वाक्यात आहे -- हे मी कबूल करतो !

माणसाचे डोके म्हणाल तर तिथे नुसते अगणित पवित्रे आणि प्रतिमाच आहेत ! मालक असा कुणी नाही !

तुमचा आवाज भसाडा असे ना का -- तुम्हाला गावेसे वाटले -- हे महत्त्वाचे नाही ?

इतरांना क्षुद्र लेखण्यासाठी एक सेट तंत्र असते -- संगीत शिकतोय ? " हे बघा चालले बडे गुलाम व्हायला ! " -- चित्रकलेत काही करतोय ? -- " हे बघा, गायतोंडे ! " -- असले बोलून दुसऱ्यांचे सहज जगणे विस्कटत राहणारे लोक असतात -- त्यांचे फार काहीच मनावर घेऊ नये -- आपले दिलसे जगावे, हेच बरे --

मला कधी कधी कुणी ' ज्येष्ठ ' नाटककार म्हणतात -- ते आपल्याबद्दल काही ' चांगले ' बोलत आहेत, असेच मी आजवर समजत आलेलो आहे !

ildc.in
भारत सरकारने मोफत देवनागरी युनिकोड उपलब्ध करून दिले आहे ना !
www.ildc.in अथवा --www.ildc.gov.in -- या साईटस पाहा --

पक्षनिष्ठेपेक्षा लोकशाही महत्त्वाची आहे !!!

बेडर कण्णप्पाने स्वतःचे डोळे स्वतःच्या हातांनी काढून देवीला अर्पण केलेले मी या माझ्या डोळ्यांनी पाहिलेले आहेत ! देवी आणि भक्त दोघेही अघोरी ! -- अशी माझी सिनेमा पाहण्याची हॉररफिल्म सुरुवात आहे ! ( कानडी सिनेमा ).

' बेडर कण्णप्पा ' -- कानडी सिनेमा ! रूपसुंदरी टॉकीज, विजापूर !

सुशिक्षित असो की अशिक्षित, आपल्या सर्वांच्या एकत्रित मनःस्थितीचा हा परिपाक आहे -- असे मला वाटते -- अमुकच दोषी, असे नाही --

शास्त्र आणि धर्म यांची अशी तुलना करताना पुस्तकी, अस्मितेचा आणि कर्मकांडाचा खोटा धर्म तुलनेला घेतला जातो -- त्यामुळे खऱ्या कृतिशील धर्माबद्दल गैरसमज पसरतात.

खरे हसणे शक्य नसेल तेव्हा जरूर खोटे हसावे ! शरीराला हसण्याचे सुपरिणाम मिळतातच ! तुम्ही जे करताहात ते पूर्णपणे ' शास्त्रीय चांगले ' आहे !

' उदास, निराश न करणारे अमूर्त चित्र ! ' -- ही पहिली प्रतिक्रिया ! -- असे का वाटले, यावर विचार करत जावे म्हणजे हे चित्र अधिकाधिक समजत जाईल, असे वाटते --

सुख, दुःख, सूडभावना, अपमानित वा पराभूत होण्याची भावना, यशस्वी होण्याचा आनंद -- यांच्या अभिव्यक्तीमुळे त्या त्या अनुभवांचा आपापल्या पद्धतीने स्मरणयुक्त अनुभव येणे म्हणजे पुनःप्रत्यय --

मानधन कोट्यवधीत पाहिजे -- तरच ते ग्लॅमरस आणि मोठे !

म्हणूनच आधी दारांच्या चौकटी उभ्या करून मग नंतर भिंती बांधायची पद्धत आहे !

मला त्यांतल्या बऱ्याच स्मायल्यांचे अर्थच कळत नाहीत ! स्माईल हा शब्द मला सुखाचा, आनंदाचा वाटतो पण दुःखाच्या आणि क्रोधाच्याही स्मायल्या असतात !

"Our sweetest songs are those that tell of saddest thought." -- P B Shelley -- हे एक आणि मध्यंतरी असे एक वाचनात आले होते की मध्यमवर्गीय जगण्यातून चांगली कलाकृती निपजू शकत नाही -- हेही संदर्भ मनात होते.

दुःखच माहीत नाही, असा माणूस असू शकत नाही -- प्रत्यक्ष दुःख भोगताना कलेची निर्मिती होते का ? दुःख समजण्याचा क्षण हा दुःखातून बाहेर पडण्याचा क्षण असतो -- एकूणच दुःखातून बाहेर पडणे. तुम्ही छोट्या दुःखातून बाहेर पडलात की मोठ्या, हा प्रश्नच नाही. कोणतेही दुःख समजणे हे एकूण मानवी दुःख समजणारेच असते. आणि तिथेच असते उत्तम कलानिर्मितीची शक्यता. हे लक्षात घेतले तर वरील सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतात, असे मला दिसते.

आपल्याला महायुद्धांच्या दुःखांचा अनुभवच नाही ना, त्यामुळे आपल्या कलाकृती खुज्या निपजतात -- असे काहींना वाटते !

दुःखाची प्रतवारी ठरवता येत असेल तर इथे अमुक जात सर्वात जास्त दुःखी किंवा जगात अमुक समाज सर्वात जास्त दुःखी आणि सर्वोत्तम कलाकृतीची शक्यता तिथूनच असून इतर सर्व कलाकृती दुय्यम, तिय्यम अशाच असणार, असे म्हणता यायला हवे.

शस्त्रास्त्रे आहेत म्हणून युद्ध करायचे आणि मग, ' बरे झाले शस्त्रास्त्रे तयार ठेवली होती ', म्हणायचे !

एक छोटी दुरुस्ती -- वंदना खरे यांच्या मुलाखतीत उल्लेखलेल्या माझ्या त्या अभिप्रेत नाटकाचे नाव ' बुद्धिबळ आणि झब्बू ' असे आहे. मुलाखत चांगली आहे.

अपौरुषेय / अस्त्रियेय म्हणतात ते हेच असावे !

-- आणि लोणावळ्याच्या सापांचा विषय नाही आला ? मी पूर्वी काही दिवस कैवल्यधाममध्ये राहिलो होतो तेव्हा तिकडे खूप साप दिसायचे !

तो असे करायच्या बेतात दिसला की लगेच ' एक मिनिट ' असे म्हणून तुम्ही तुमचे सेलफोन चॅटिंग सुरू करा -- थोड्या वेळाने तुम्हीही तशीच कृपा केल्याचा आविर्भाव आणा -- तोवर त्याचे पुन्हा चालू होईलच -- असे एक तासभर चालू द्या -- मग तोच म्हणेल, " चलतो आता -- तासभर छान गप्पा झाल्या ! "

अस्मितांचे किनारे सोडायची जगात कुणाचीच हिंमत नाही !

लाईक करून ठेवले की आपल्या ताब्यात राहते -- उद्या वाचेन --

गजू, ऐसा ही हूँ मैं ! चेहरेपे हार्डवेयर पर दिलसे सॉफ्टवेयर !

मला दिसणारेच सांगणारे एक वाक्य आताच दिसले -- ते असे --

OPINIONS HAVE CAUSED MORE TROUBLE ON THIS
EARTH THAN PLAGUES OR EARTHQUAKES .
Voltaire.--

अरे, माझे अमुक एक मत चर्चेत जिंकावे किंवा सिद्ध व्हावे, हा हेतूच नसतो माझ्या पोस्टमध्ये ! उलट, त्या विषयाची व्याप्ती लक्षात यावी आणि मतांचा अट्टहास ढिला पडून भान वाढावे -- असा असतो तो कार्यक्रम.

तुम्ही असे करा -- हे पुस्तक आपल्याला शोधायचे आहे, हा विचारच द्या सोडून -- चटकन सापडून जाईल -- अट एकच -- ते चटकन सापडावे म्हणून विचार सोडून द्यायचा, असे करायचे नाही !

सार्त्रचे ' फ्लाईज ' हे नाटक याच विषयावर आहे -- जरूर वाचावे --

अविनाश, आत्मकेंद्री असणे हीच हिंसा आहे -- ब्राम्हण, मराठा, दलित -- सगळेच हिंसेचे पुजारी आहेत !

हिंदू धर्म हा एकाने कुणी सांगितलेला असा नसल्याने, हा एकसंध धर्म आहे का मुळात ?

बौद्ध धर्माचा संक्षिप्त परिचय | mr.upakram.org

mr.upakram.org

थोडक्या शब्दांत खूपच अर्थपूर्ण माहिती ! अनेकांना, हे अधिक खोलातून समजून घेण्यास उद्युक्त करेल, अशी !

तुम्ही म्हणताय त्याच चालीवर -- माणसांच्या मृत्यूला कारणीभूत होणारी भटकी कुत्री मारायची नाहीत पण खाण्यासाठी हजारो बकऱ्या रोज कापल्या तरी चालते !

' सामसूम ' -- हे नाटक. मानवता, दया, करुणा -- ही एकाच मूल्याची वेगवेगळी नावे असावीत ! ( माझ्या एका नाटकात न्याय आणि नीती या दोन मूल्यांची टक्कर दाखवली आहे ! )

हेच जरा पुढे नेले तर -- मूल्य असे काही असलेच तर ते एकच असेल, अमर्याद असेल आणि स्थलकालपरिस्थिती-निरपेक्ष असेल -- असे दिसते !

म्हणजे फक्त मते असतात ! मग मूल्य कशाला म्हणावे ?

होय -- तर मूल्य कशाला म्हणावे ? की मूल्य असे काही नसतेच ?

सिंपल ! मी ' ड ' ला देणार मत ! त्याचे आणि माझे आडनाव डी या सेम इंग्रजी अद्याक्षराने सुरू होते !

व्यक्ती, समूह, राष्ट्र यांना सवयीमुळे योग्य वाटणारे दंडक एकूण मनुष्यप्राण्याच्या दृष्टीने मतेच असणार ! म्हणजे मूल्य हे एकूण माणसासाठीचे ' श्रेय ' म्हणावे का ?

मूल्य आणि मत यांत फरक काय मुळात ?

प्रत्येक विचारप्रणाली, प्रत्येक अस्मिता --- मते की मूल्ये ?

एखादे ' नीतीमूल्य ' घ्या -- ते मूल्य असते की त्या काळातही अनेकांपैकी एक मत ?

आत्मकेंद्री जगण्यातून येणारी विषमता नष्ट होऊ शकते !

उदाहरणार्थ आपल्याला सतत द्वंद्वात्मक काम करणारे मनच माहीत आहे -- तुकाराम एकात्म मनाबद्दल बोलतो ( हे सर्वांना समजू शकते, या क्लॅरिटीनेच तो बोलतो ) -- एकात्म मन हे तुम्ही कितीही भाषिक आपटलीत तरी द्वंद्वात्मक मनाला कळूच शकणार नाही -- एकात्म मन हे द्वंद्वात्मक मनाचे ' मत ' नसते !

हे सगळे नुसते मतांचे खेळ करण्या ऐवजी कला मौल्यवान असू शकते का आणि मूल्य म्हणजे काय, यावरच बोलायला हवे --

तुकाराम बोलतोय ते कालसापेक्ष वा मतप्रदर्शनाच्या स्तराचे मुळीच नाही !

भाषा वाढत, बदलत, विकसत जाऊ दे -- पण तिला काहीही रचना, शिस्त, पद्धत नको, असे म्हणण्याने कोणताही अर्थ व्यक्त करण्याची तिची क्षमताच खलास होईल !

-- अर्थात कीर्तनकारही नुसते तेच तेच रटणारे नसावेत -- आजचे जगणेही समजून बोलणारे असावेत -- तसे न झाल्यास ही संस्थाच कालबाह्य होईल !

विजय, अगदी बरोबर -- कीर्तनकार ही एक, समुपदेशन करणारी, आपल्यासारख्या गरिबी असलेल्या देशात, अत्यावश्यक अशी संस्था आहे, असे मला वाटते !

हे गाथा वाचताना लक्षात येत जाते -- पण त्याच्या अर्थाबरोबर जाऊन आपले मन तसे फेकून देण्याचा धोका पत्करला तरच ते दिसणार --

-- याचा अर्थच, आपण गृहीत धरलेली मनाची रचना आणि मोडस ऑपरेंडी तो फेकून देतो !

तुकारामाला जर आपण कलावंत मानत असू तर त्यातून काही ' मिळवण्या ' च्या प्रयत्नाला त्याने घाणेरड्या शिव्या दिलेल्या आहेत -- ये भी पॉईंट टु बी नोटेड है !

तुम्ही जसे निष्कर्ष काढून एक डार्क निराशावाद पत्करत आहात, तसे न करणारे. दुसरी काही शक्यता आहे का, असा प्रश्न तरी विचारायला तयार असलेले !

मन म्हणजे आत्मकेंद्र -- त्याच्या सर्व कृती हेतूपूर्णच असतात आणि काही ना काही मिळवण्यासाठीच असतात -- हे बरोबरच आहे. याचाच पुढचा भाग म्हणजे प्रत्येकाचे स्वार्थ, कुवत हे वेगवेगळ्या क्षमतेचे असल्याने यात  चांगले, मौल्यवान वगैरे, असे काही नसते. त्यामुळे मानवी जगण्याची चाललेली बोंब मान्य असणे, हा सगळ्या कृतींचा पाया असतो ! हे मान्य असल्यावर संस्कृती, मूल्ये वगैरे गप्पा मारण्यात काही अर्थ राहात नाही ! पैसा मिळो की स्तुती मिळो -- सगळेच भुक्कड, निरर्थक ठरते ! पण माणसाचे जगणे म्हणजे हेच -- दुसरी काही शक्यताच नाही -- असे गृहीत धरून बंद व्हायला तयार नसलेले काही लोक असतात. त्यांच्या दृष्टीने कलेचे कार्य तुम्ही वर दिलेल्यांतले कोणतेच नसते !

मन हा शरीराचाच भाग -- शरीराशिवाय मन नसतेच !

विकृतीची एक व्याख्या -- स्वतःला त्रस्त, असमाधानी, दुःखी अवस्थेत ठेवणारी मनःस्थिती -- अशीही होऊ शकेल --

मी नेहमी देतो ते एक उदाहरण इथेही देऊन ठेवतो -- अमिताभ बच्चन गुन्हेगार झाला असेल तर त्या बिचाऱ्याचे बालपण कसे वाईट गेले, ते दाखवायचे -- पण अमजद खान गुन्हेगार असेल तर त्याचे बालपण दाखवायचे नाही ! तो मात्र जातिवंत गुन्हेगार !

संतोष -- किंवा -- या ना त्या प्रकारे, मानसिक विकृती नावाचा प्रकार, सगळ्यांतच असतो की काय -- असाही प्रश्न विचारता येईल !

हे प्रत्येकाचे वेगवेगळे असते. विचार, दृष्टिकोण, नीतीचे, प्रामाणिकपणाचे, निष्ठेचे आकलन हे सगळे वेगवेगळे असते. त्यात जमवून घेणे, तडजोडीही असतात. हे सगळे प्रत्येक व्यक्तीचे गुंते भिन्न-भिन्न असल्याने एकाला दुसऱ्याचे काही समजत नाही. आपापल्या प्रतिमा बाळगत आणि दुसऱ्यांचे अंदाज घेत हे संबंध चालतात. ते कधीच एकाचे दुसऱ्याला कळणे शक्य नसते ! यालाच आपण मानवी संबंधांतली अतर्क्यता म्हणतो. ( सारखी वीज जात-येत असल्याने हे दोन तुकड्यांत मांडले आहे. )

जनुकीय रचना, मेंदूतल्या पेशी व रसायने, आनुवंशिकता, बालपण, घरचे वातावरण, आलेले अनुभव, पाहिलेल्या घटना, आजूबाजूच्या एकूण माहोलाचे परिणाम, मिळालेली शिकवण -- अशा असंख्य गोष्टींनी माणसाचा स्वभाव आणि त्याची प्रतिक्रिया देण्याची पद्धत नियंत्रित होते. यातून आपण अलग आहोत असे समजून तो हे सगळे कंट्रोल करणे -- स्वतःचे सुख, सुरक्षितता आणि इच्छा अबाधित ठेवायचा प्रयत्न करणे -- करत असतो.

पण मग काय, ग्रेट आर्ट असे काही असते की नसतेच ?

' अतर्क्य ' म्हणजे ? -- बुद्धीला न कळणारे, संबंध जुळले कसे, मोडले कसे, मैत्री कशी झाली आणि टोकाच्या भांडणापर्यंत कसे आले, सगळे नीट असताना खोटेपणा का झाला, लपवाछपवी का झाली, अनपेक्षितपणे विश्वासघात का झाला, वगैरे ही एका अत्यंत महत्त्वाच्या विषयावरची चर्चा इथे घडून आलेली आहे. आपल्या फ्रेंडसमध्ये माध्यमांशी, वृत्तपत्रांशी संबंधित काही व्यक्ती आहेत. त्यांपैकी एक वा अनेक कुणीही या चर्चेला प्रसिद्धी देऊ शकतील का ? त्यात इथल्या प्रत्येक सहभागी व्यक्तीची स्वतंत्र परवानगी लागेल का ? नावे न देता या चर्चेचा गोषवारा देता येईल का ? इथे कुणी स्वामित्व हक्कांचे वगैरे प्रश्न काढेल, असे वाटत नाही -- याच्याकडे, तरुणांचा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणून आस्थेने पाहता येईल. प्रतिसाद यावा.

पण अ च्या बाजूने वा ब च्या वा क्ष च्या -- कुणाच्याही बाजूने बोलले तरी उरलेले सगळे अंगावर येणार !

' आम्हाला आवडते, आम्ही पाहतो ", " म्हातारे, निवृत्त, आजारी -- यांचा वेळ चांगला जातो ", " ज्यालात्याला आपापले ठरवायचा अधिकार असतो ", " तुमच्या मतासारखे सगळे होणार नाहीत " ( पण या मालिकांनी सपाटीकरण करणे ' ग्रेट ' आहे ! ) -- या सगळ्याची खरे तर गरज नाही. तुम्ही जेव्हा काही बोलता तेव्हा तुमच्या मतासारखे सगळे व्हावेत म्हणून

बोलता का ? आपण एकत्र जगत असताना आकलनाची देवाणघेवाण होत असते -- कलेतूनही हे काम होत असते. एखादी गोष्ट लोकप्रिय असते तेव्हा आधीच तिचे उदात्तीकरण झालेले असते, आणखी करायची गरज नसते. पण कुणी वेगळे काही बोलूच नये, अशी अपेक्षा अर्थातच बालिश आणि निरर्थक ठरेल -- ती जुमानली तर जाणारच नाही !

माणसाच्या जगण्यात करमणुकीला एक महत्त्व असतेच -- एक स्थान असतेच -- ते नाकारण्याचा हेतू नाही -- माणूस कधी कधी अशा एखाद्या मानसिक संकटात सापडतो की त्यातून बाहेर पडणेच अशक्य व्हावे -- अशा वेळी विनोद, हलकेफुलकेपणा, एखादा मित्र वा मैत्रीण यांच्या कृतीने तो त्यातून बाहेर पडू शकतो -- आणि नंतर स्वतःची शक्ती एकवटणे त्याला जमू शकते ! -- या वेळी हे सगळे जणू लाईफ सेव्हिंग ड्रग असतात ! -- हे हवेच ! पण याचा अर्थ रोजच अशा ड्रग्सची गरज पडावी, असे नाही !

व्यापताप, गुंतागुंत आणि वेगवान जगणे हे जगभर आहे -- फक्त मराठी माणूसच खास अशक्त मेंदू घेऊन जन्मतो, असे काही नाही. काही किरकोळ विनोदी लेखकांनी पाडलेली ही पद्धत आहे -- मराठी माणसाला याहून जास्त काही झेपणार नाही, हे म्हणायची आणि " आपल्याला बाबा थोडी हलकीफुलकी करमणूक हवी असते ! " असे म्हणत, त्याचे उदात्तीकरण करत राहण्याची !

गणेश, अगदी खरे आहे -- हे बरेचसे वांझच ठरू शकते -- पण आपल्याला दिसते ते बोलावे -- त्यात काही सत्य असेल तर आणखी काहींना ते दिसेल --

ठीक -- जाने दो -- याचे निराकरण आहे का कुठे -- ही माहिती विचारत होतो -- पण मुद्दा रेटण्यात मला रस नसतो हे माझ्या इथल्या एकूण वावरावरून तुम्हाला माहीत असावे --

होय -- खरे आहे -- पण सगळीकडे प्रश्न हाच येतो -- हा असे म्हणतो, तो तसे म्हणतो -- संपले ! रेखा इनामदार साने यांच्या पुस्तकातही हेच आहे ! त्यांना या प्रकाराचे निराकरण मिळाले असते तर नक्कीच त्यांनी ते वापरले असते !

दुसरीकडे कुठे असेल तर जरूर सांगा -- विश्वकोश हे एक अति-महत्त्वाचे ठिकाण होते !

प्रॉब्लेम हा आहे की प्रत्येक अस्तित्ववादी तत्त्वज्ञ आपापल्या पद्धतीने बोलतो -- त्यांच्यांतून सलग विकसित होत आलेली परिभाषा वगैरे, असे काही नाही. आणि एकूणात या प्रत्येकाचे थोडक्यात, असे मिळते पण अस्तित्ववाद हा आपला आपल्यालाच समजून घ्यावा लागतो. मे पु रेग्यांना विश्वकोशात हा प्रश्न सोडवण्याची संधी होती, पण तेही धजले नसावेत !

एखादे उदाहरण द्या -- उदा ' किंग लियर ' हा मेलोड्रामा आहे का ? किंवा मराठीत एखादा आठवावा असा ?

सगळे चांगले लेखन हे थोडेफार दुर्बोध असतेच पण सगळे दुर्बोध लेखन हे चांगले असेलच, असे नाही !

टीव्ही मालिका ------
ठराविक स्वभाव, वरवरच्या क्रियाप्रतिक्रिया आणि उत्सुकता निर्माण करणारी घटनांची साखळी --- हे या मालिकांचे भांडवल असते. इंटरेस्टिंग होण्यासाठी या गोष्टी थोड्या तीव्र ठेवाव्या लागतात. पाहून पाहून याच सवयी अधिक तीव्र होत गेल्या की प्रेक्षकांत मानसिक विकृती येऊ शकते. क्रियाप्रतिक्रियांचे जगणे हेच फक्त शक्य असते, ही समज पक्की करून --- जगणे समजून घेण्याची शक्यताच नष्ट करण्याचे काम यातून होते. कोणतीही स्थितिशीलता गृहीत धरून, जगणे समजून घेण्याची प्रक्रिया अस्तित्वात येऊ शकत नाही. ' डिस्टर्ब न होता सवयीतले पाहात राहावेसे वाटणे ' म्हणजे हलकीफुलकी करमणूक. हे माणसाचा प्राण घेणारे विष असते ! कारण जगणे समजून घेण्याची उत्सुकता निर्माण करणारे प्रश्न पडणेच बंद व्हावे, असे हे सगळे असते. माणसाची संवेदनशीलता नष्ट करून त्याला हे मद्दड बनवते. मनाला अधिकाधिक कोते करून निर्बल करण्याचे असे हे अव्याहत चालणारे काम असते ! लोक सहकुटुंब बसून या विषाचे एकत्रितपणे प्राशन करत राहू इच्छितात -- यावरून या विषाची भूल किती प्रचंड खिचाववाली आहे, ते कळते ! थोडक्यात, हे कायद्यात बसणारे, समाजमान्य इच्छामरण असते !

Shirish Jugare -- माणसाचे मनच वर्चस्ववादी असणे हाच मुख्य प्रश्न असण्याकडे यशवंत मनोहर लक्ष वेधत असून मन वापरण्याची ही पद्धतच बदलण्यासाठी आत्मसंग्रामाची गरज असल्याचे सांगत आहेत. म्हणजे करायचे काय, याचे एखाद्या चळवळीच्या रूपातले घिसेपिटे उत्तर त्यांनी इथे द्यायला हवे, ही अपेक्षा चुकीची आहे. प्रश्न अबाधित ठेवून तो मिटवून दाखवा, असे म्हटल्यासारखे ते होते !

माझी एक मैत्रीण उत्तम गायिका आहे. तिची कधी भेट वगैरे झालेली नव्हती – अशीच थोडी लिखापढी होती. काही महिन्यांपूर्वी आमच्या घरापासून चालत दहा मिनिटांवर तिच्या गायनाचा कार्यक्रम होता पण दुसऱ्या काही व्यस्ततेमुळे मला जाता आले नाही. पण माझी पत्नी त्या कार्यक्रमाला गेली होती. ही एक उत्तम गायिका असल्याने, तू हा कर्यक्रम चुकवू नकोस, असे मी तिला सांगितले होते. ऐकून आल्यावर ती त्या गायिकेबद्दल छान बोलली होती. आज पुणे आकाशवाणीवर ‘ स्नेहबंध ‘ या महिलांच्या कार्यक्रमात त्या गायिकेची मुलाखत होती. माझी पत्नी तो कार्यक्रम नेहमी ऐकते. आज त्या गायिकेचे नाव ऐकल्यावर मला तिने ते सांगितले आणि मला ती मुलाखत ऐकायची आहे का, असे विचारले. म्हटले, नक्कीच ! प्रश्नच नाही ! माझ्या त्या गायिका मैत्रिणीची मुलाखत ऐकून धन्य झालो ! काल आपण जिला एक छोटी मुलगी, उभरती

गायिका म्हणत होतो, ती हे असे प्रचंड काम करतेय, हे समजून तिचा अभिमान वाटला. कोण असेल ती ? अहो, आपली साधी, सुंदर, बुद्धिमान, ग्रेट मैत्रीण -- प्राची दुबळे !

आदिवासी संगीत, त्यांची गाणी, संगीत, परंपरा, संस्कृती यांचा प्राची अभ्यास करते आहे. ती तिथे जाऊन त्यांच्याबरोबर राहते, जेवते, गप्पा मारते आणि त्यांच्याकडे असलेला संगीत-खजिना जमा करून आणते. तिची ही पूर्ण मुलाखत मुद्दाम ऐकावी अशी आहे. सगळे काही सांगत बसायची ही जागा नव्हे. पण तिने एका आदिवासी समाजातली एक प्रथा सांगितली, ते ऐकून माझे डोळे भरून आले. मुलीच्या विवाहाच्या वेळी त्या वधूला मधे बसवले जाते आणि तिथल्या स्त्रिया तिच्याभोवती फेर धरून नाचत गाणे म्हणतात. त्याला ‘ रुदन गीत ‘ म्हटले जाते. वधू मधे बसून रडत असते आणि त्या स्त्रिया जे गाणे म्हणतात त्याचा आशय असा असतो की -- मुली, यापुढे तुझ्यावर खूप सुखदुःखांचे प्रसंग येतील, त्यांना तुला खंबीरपणे सामोरे जायचे आहे, काय रडायचे ते आत्ताच रडून घे – शेवटचे ! माणसाला मुळापासून हलवणारे गाणे ! दुसरे एक गाणे प्राचीने सांगितले, ते ऐकून तर सर्व शहरवासियांची मान शरमेने खाली जावी. आता तिकडेही मोबाईल, टीव्ही असल्यामुळे त्यांच्या गाण्यांतही शहरी वा काही इंग्लिश शब्द येतात. ते रस्त्याला रोड म्हणतात, कोणत्याही कारला ‘ मारुती ‘ म्हणतात. तर ते गाणे शहराकडे चाललेल्या आपल्या माणसाला सांगते – रोडवरून नीट जा, नाही तर येईल एखादी मारुती आणि तुला उडवून निघून जाईल ! अशी त्यांना शहरवासियांची भीती असणे, लाजिरवाणेच आहे ! फ्रेंडस, प्राचीची ती छान मुलाखत जरूर मिळवून ऐका. प्राची लहानच आहे, तिला मी हक्काने शुभाशीर्वाद देऊ शकतो, कलाक्षेत्रात बरोबरीची म्हणून शुभेच्छा देऊ शकतो, आणि ती करत असलेल्या कामाचा आदर म्हणून तिचा चरणस्पर्शही करू शकतो ! तिच्या सुंदर, सखोल आवाजात तिने आदिवासी गाण्यांतल्या काही ओळी म्हणून दाखवल्या, त्या अजून माझ्या मनात फेर धरून नाचताहेत ! धन्यवाद प्राची ! तुला मनःपूर्वक शुभेच्छा !

आपण जे आहोत ते समजून घेणे अर्थपूर्ण --  उलट ते कसे असायला हवे, याला महत्त्व देणे म्हणजे अनावश्यक संघर्ष वाढवणे !

शिक्षणाचे वातावरण नाही, चांगली शाळा नाही, पुस्तके उपलब्ध नाहीत -- हे विचारात घेतले तर ' ग्रामीण ' याला वेगळा अर्थ आहे !

वाकडी रेषा, वक्र रेषा, नागमोडी रेषा -- असेही प्रकार असतात ना !

स्टेटस काय दिले आणि चर्चा कुठे गेली !

स्त्रिया तरी मला विचारवंत समजत नसाव्यात ! माझे बरे चालले आहे !

अरे, स्त्रियांचे आणि विचारांचे वावडे असते, असे सुचवतोयस तू ! असे कसे चालेल ?

अजिंक्य, तू रिस्की बोलतोयस -- भवितव्याचा विचार कर !

तू काय विचारवंत होतोयस की काय ? लांब नको जाऊस असा आमच्यापासून !

पण ' वर्ग ' कलह तरी हवा की नको ? फर्स्ट, सेकंड, डिस्टिंक्शन ?

You may use your logic but not prejudices --

--पुणेकरांबद्दल असा केमिकल लोच्या कशाला बाळगताय ? आणि प्रत्येक गोष्टीत तुम्हाला इंटरेस्ट वाटावे, अशी अपेक्षा नाहीय !

इतिहासातून आणि अनुभवातून ' शिकणे ' हे व्यक्तिगत मर्यादांवर अवलंबून असल्याने ' सत्य ' वगैरे असू शकत नाही !

अनुभव आणि इतिहास यांवरून खरे तर काहीही सिद्ध होऊ शकत नाही ! ( विस्तवाला हात लावला तर भाजते, अशी सत्ये सोडता ).

पैसे कमावण्यासाठी इंग्रजी भाषेचा उपयोग नाही ? किस दुनियामें रहते हो तुम, उमेश ?

उमेश, तू सगळे न वाचता बोलतोयस -- भीक मागून पोट भरण्याचा वा छोटेमोठे काही करण्याचा असा विषय नाहीय हा -- शिक्षणाचे माध्यम, ज्ञानभाषा -- हे वर आलेले सगळे वाच ना --

ते ठीक आहे उमेश, मराठी भाषा ही आपले स्वतःचे आणि आईचेही पोट भरायला उपयोगी नाही, असे दिसल्यावर काय, हा चाललाय विषय !

साहित्य आणि संस्कृती या क्षेत्रांत मराठीत झालेले काम जिवंत राहणे ( आणि त्या कामाचे सातत्य राहणे ), याला भाषा जिवंत राहणे म्हणावे की थोडे दैनंदिन व्यवहार आणि एसटीचे टाईमटेबल मराठीत चालू राहिले तरी भाषा जिवंत राहिली, असे म्हणावे ?

आणि आता जागतिकीकरणाचाही संदर्भ असणारच आहे !

१. मराठी शिक्षणाचे माध्यम म्हणून टिकणे अवघड आहे.
२. मराठी ज्ञानभाषा होणे अवघड आहे.
३. पैसे मिळवण्यासाठी वा उपजीविकेसाठी मराठीचा फारसा उपयोग नाही, असणारही नाही.
४. मराठीला फारशी सामाजिक प्रतिष्ठा असणार नाही.
-- हे सगळे बहुसंख्यांना मान्य दिसते. मग यापुढच्या पिढ्या मराठीचा अभ्यास कशासाठी करतील ? ज्ञानेश्वर, तुकाराम समजून घेण्यासाठी ? अभिव्यक्तीच्या क्षेत्रात मराठीने पादाक्रांत केलेला प्रदेश हातून निसटत चाललेला आहे कारण तशा अभ्यासातले इंटरेस्ट टिकेल असे वातावरणच नाही. नवीन पिढ्या जर या भाषेचा सखोल अभ्यास करणार नसतील तर असा नवा प्रदेश निर्माण होण्याची शक्यताही कमीच म्हणावी लागेल.
-- मग मराठीबाबतचा आशावाद कोणत्या आधारावर जोपासावा, हा प्रश्न येतो.

तसे अवघड आहे -- जेके बोलायला लागले की धक्के बसणारच ! जेव्हा कुणी प्रगल्भ बोलेल तेव्हा तो सवयीच्या मुळाशीच धक्का देईल -- हळूहळू लाड करत बसणार नाही -- कारण सत्य थोडे थोडे कसे सांगणार ? ते पूर्णच सांगावे लागणार !

गेल्याच वर्षी, आपले इथले मित्र मिलिंद शिंत्रे ( Milind Shintre ) यांच्या एका पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्या कार्यक्रमात बोलताना मी डॉ. दीपक पवार यांनी ' मराठी अभ्यास केंद्रा ' च्या माध्यमातून केलेल्या कामाची माहिती सांगून मराठीच्या विकासाकडे सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे सांगितले होते. त्याच वेळी डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी त्यांच्या भाषणात -- मराठीची चिंताच नको -- ती ठणठणीत आहे आणि राहील -- असे सांगितले होते ! डॉ. परबांचा लेख यावर अधिक उपयुक्त वाटतो !

मुख्य प्रश्न समजला की त्याच्या उपप्रश्नांच्या उत्तरांचे योग्य ते विचार होतील -- सगळ्या शेकडो शक्यतांची उत्तरे ठरवून जगणे होत नसते --

जाती-धर्म वगैरे जाऊ द्या -- दोन वेगळ्या व्यक्ती म्हणजे काय, हेच आधी समजून घ्यायला हवे --

असे अंदाज मुळीच कामाचे नाहीत -- आयुष्यभर एकमेकांशी न बोलणारे पति-पत्नी -- ही प्रत्यक्ष घडणारी गोष्ट आहे !

फक्त दोन माणसांचा समाजही हलकटच असेल !

ते सगळे ' कर्मण्येवाधिकारस्ते ' म्हणायचे आणि हावरटपणा अबाधित ठेवायचा, असे द्वंद्वात्मकच असते !

वैचारिक सत्य हा प्रकार अस्तित्वातच नाही -- हे माझे आकलन आहे !

दुसरे विचार दडपले जाणे म्हणजेही संघर्षच !

प्रश्न हा आहे की , मग, चांगले जगणे म्हणजे काय ? -- यावर पुन्हा अनेक मते येतात आणि त्याच हिंसाचाराच्या शक्यता निर्माण होतात ! वैचारिक पद्धतीने ' चांगले जगणे ' ही भोंगळ आणि महामूर्खपणाची कल्पना असते ! मग काय ? -- हा प्रश्न अध्यात्मिक ठरवून आपण बौद्धिक हुशारी दाखवण्यात धन्यता मानतो ! बुद्धिवादी हे ( त्यांची बुद्धीवरची श्रद्धा पाहता ) सगळ्यात वाईट अंधश्रद्धावादी असतात ! त्यामुळे अवघडच आहे !

आंतरिक दुःख हाही जगण्याबाबतच्या प्रतिक्रियांचा साठाच असतो -- इतर देतात त्याही प्रतिक्रियाच असतात -- हे पाहता -- प्रतिक्रियारूप नाही असे एक मिनिटाचे तरी जगता येईल का ? -- हा प्रश्न सर्वांसाठीच प्रस्तुत ठरू शकतो --

शेवटासारखा शेवट -- उगीच आठवले म्हणून सांगतो -- सिनेमाचे नाव, बहुतेक, द मॅन फॉर ऑल सीझन्स -- शेवटी थॉमस मूरचा शिरच्छेद आहे -- पाते झटक्यात वरून खाली येते आणि झपकन सिनेमा संपतो !

लाजिरवाणे भासणे जे तुम्ही म्हणता त्याचे नियम वा सामाजिक अपेक्षा म्हणू, सर्वांना सारख्याच असतात -- शास्त्रीय सत्ये नाकारल्यामुळे घोळ होतात, असे दिसते ! वर्षानुवर्षे गिरवत आलो आहोत म्हणून आहेत त्या मानसिक सवयी सत्य समजून चालाव्यात का, हा प्रश्न आहे !

एका ओळीचीही असू शकते कविता !

नक्कीच ! दिसणे याबरोबरच, विचार, स्वभाव, परिपक्वता यांचेही सौंदर्य जाणवून देणारे हे माध्यम आहे !

शेवटी ते डेप्युटी संतापून म्हणाले, " तुम्ही सगळे डर्टी क्रिटुरेज आहात ! "

आपल्याला टाईमपासची इतकी गरज का पडते -- हा एक साधा प्रश्नही विचारायचे धाडस नसावे ?

कितीही दुःख असू दे मालिकेत -- लाईटली घ्यायचे ! ये सोचनेकी चीजही नही है !

नाही तरी हे कथाबिथा नंतरच घडवत जातात -- अशी शीर्षके हवी असली तर मी देईन -- पण योग्य मोबदला घेऊन !

' फटाकडी सून हवी ' या नावाची काढा सीरियल -- पहिल्या दिवसापासून जबरदस्त प्रतिसाद मिळेल !

Under Indian law, the freedom of speech and of the press do not confer an absolute right to express one's thoughts freely. Lord Denning, in his well-known book Road to Justice, stated that press is the watchdog to see that every trial is conducted fairly, openly and above board, but the watchdog may sometimes break loose, pointing out facts and incidences which the authorities do not wish the public to know, and has to be punished[dubious – discuss] for 'misbehaviour'.[11] With the same token Clause (2) of Article 19 of the Indian constitution enables the legislature to impose certain restrictions on free speech under following heads:

I. security of the State,
II. friendly relations with foreign States,
III. public order,
IV. decency and morality,
V. contempt of court,
VI. defamation,
VII. incitement to an offence, and
VIII. sovereignty and integrity of India.

Reasonable restrictions on these grounds can be imposed only by a duly enacted law and not by executive action.[12]

एका मुलाला बोलताना शेवटच्या दोन अक्षरांची उलटापालट करायची सवय होती -- म्हणजे खिडकी च्या ऐवजी खिकडी, इडली च्या ऐवजी इलडी, वगैरे. पण बटाटा हा शब्द तो नीट म्हणायचा ! लोक म्हणायचे हा बरोबर म्हणतोय की इकडचा टा त्याने तिकडे केलाय ? सवय म्हणून बेसावध राहू नये, एवढेच !

त्यामुळे, तत्त्वशील माणसांचे लोकशाहीत कामच काय, असा प्रश्न येतो !

लोकशाहीचे हे गुंताडे न पाहता नैतिक आव आणून गप्पा मारणारे जनरली कंटाळवाणे आणि अप्रस्तुत होतात !

Champra Deshpande commented on his own status.

तुमच्यासाठी ज्यांनी भरपूर घाम गाळला, दिवस-रात्र एक केले -- ते म्हणणारच ना, " आपले हे अमुक एक काम कायद्यात बसवून लौकर करून द्या ! " -- नाही तर लोकशाही काय चाटायचीय ?

तुमच्या हातत सत्ता यायला काही लोकांची मदत झालेली असते -- तुम्हाला कृतज्ञता नको ? -- की फक्त न्यायाचा विचार करत बसणार ?

Having one's own beliefs, ideologies, opinions, whims, ways of controlling others, ambitions -- is all being self-enclosed.

आज २१ फ़ेब्रु २०१४ रोजी या नाट्यगृहाचे अधिकृत उदघाटन झाले ! आधी झालेले उदघाटन अनधिकृत होते, असे कळते ! हरकत नाही -- थोड्याच दिवसांत इथे नाट्यप्रयोग येऊ लागतील ! मुबलक शुभेच्छा !

इथल्या माणसांची शरीरे विषही पचवायला शिकली आहेत !

आविर्भाव, मनःस्थितीचे तरंग -- कळणारच --

-- आता, हे म्हणणारा निर्बुद्ध आणि आयुष्यभर एकाच मतासह जगणारा श्रेष्ठ, असे म्हणावे का ?

' मी बाळगत नाही माझी मते काही तासांहून जास्त काळ ' अशा प्रकारची एका कवितेतली ओळ आहे --

मत तयार होण्यात ' स्वहित ' हा भाग असतो !

प्रामाणिकपणा हे मूल्य असू शकते ?

मत हे माझे संस्कार, माझा भूतकाळ, मी ब्राम्हण आहे की दलित आहे, मी कोणती अस्मिता महत्त्वाची मानतो -- अशा गोष्टींवर ठरणार -- हे सगळे प्रामाणिकच असणार, समजा -- तर ?

हुकूमशहा असो, सत्ताधारी असो, श्रीमंत असो की उच्चवर्णीय असो -- प्रत्येकाचे वेगळे कंडिशनिंग, त्याचे वेगळे ताण असतातच ! जगी सर्व सुखी असा कोण आहे -- ते ठीक आहे --

गोंधळ होतोय -- नुसते दुःख व्यक्त करणाऱ्या कलाकृती -- सगळ्या ग्रेट ? कारण दुःखाचे साधारणीकरण होते, म्हणून ? दुःखाच्या रचनेचे, प्रक्रियेचे भान व्यक्त करणारी कलाकृती आणि नुसते व्यक्तिगत वा एका समूहाचे दुःख व्यक्त करणारी कलाकृती यांत प्रचंड फरक असतो --

नुसते विशिष्ट दुःख सांगणे -- याने कलाकृतीला ती मर्यादा पडते, असे मी म्हणतोय.

कोणते ना कोणते दुःख मांडणाऱ्या कलाकृती वैश्विक महत्त्वाच्या असतात, असे तुमचे मत दिसते ! आपल्यात या बाबतीत मतभेद आहे.

-- सत्यावर आधारित कलाकृती असली तरी एकदा ती समाजापुढे सादर झाली की स्तुती आणि टीका दोन्हींना ती खुली असणार -- त्यात मग टची राहण्यात अर्थ नाही.

अरे, हो -- मीही चर्चाच करतोय -- आणि माझी पद्धत तुम्हाला माहीत आहे -- अमुक एक निष्कर्ष निघावा, असा माझा अट्टहास नसतो --

बरे, समजा खास दिसणारे भेदभाव नाहीयत -- पण अमुक मुलाच्या प्रेमाला प्रतिसाद देण्या ऐवजी एखादी मुलगी, त्याच्या मते त्याच्याहून कमी दर्जाच्या मुलाला प्रतिसाद देऊ इच्छिते -- काय करणार ? तिची अक्कल आणि तिची मर्जी ! तुमची लाख न्याय्य आणि योग्य अपेक्षा आहे -- करणार काय ?

-- गोपूंनी कम्युनिस्टावर होणारा अन्याय म्हणून एक प्रश्न हाताळणे ( उध्वस्त धर्मशाळा ) आणि तोच प्रश्न मिलरने एक मानवी जगण्यातला प्रश्न म्हणून पाहणे ( क्रुसिबल ) -- यांतला फरक बघा, म्हणजे माझा मुद्दा लक्षात येईल --

तुकारामाला कुणी हिंदुत्ववादी म्हणायला लागला तर अवघड होईल !

ते जे धार्मिक कंडिशनिंग घेतात ऐरणीवर, त्याच्यात आणि वैचारिक / बौद्धिक कंडिशनिंगमध्ये काहीच फरक नाही. एकच ते -- मर्यादित, ओळख आणि अस्मिता निर्माण करणारे -- शत्रुत्व निर्माण करणारे.

हा प्रश्न बुद्धीच विचारते आहे ! बुद्धीला जेव्हा स्वतःचे सापळे कळतात तेव्हा ती शांत राहणे -- असा एक क्षण असू शकतो -- जो बौद्धिक नसतो !

ते कशाचे कट्टर समर्थन करोत न करोत -- ते सहेतुकतेचे, बंदिस्तपणाचे, कंडिशनिंगचे, स्वतःच्या व दुसऱ्यांच्या प्रतिमा तयार करत जगण्याचे, समर्थन करत आहेत. तुम्ही गॅसचेंबरमध्ये मरावे की विष पिऊन मरावे याची फक्त ही साधकबाधक चर्चा आहे !

नुसती मतमतांतरे याच स्तरावर सगळे आणणे -- हाच तर मानवी जगण्यातला घोळ आहे. धर्मामुळे होणारी हिंसा दिसते पण विचारसरणीमुळे होणारी हिंसा दिसत नाही -- ही दिवाळखोरी नाही तर काय आहे ? स्वतःच्या वेडेपणाबद्दल शंकाही नसणे !

धर्म ही गोष्ट माणसाने मानसिक / बौद्धिक आकलन या स्तरात बंदिस्त केलेली आहे -- त्याच तशाच धर्माबद्दल दिके बोलत आहेत, हे स्पष्ट आहे. ते माणसाला त्याचे खरे स्वरूप समजण्यातले अडथळे सांगतात पण खरे स्वरूप म्हणजे काय, ते सांगत नाहीत. सहेतुकता आणि मानसिक बंदिस्तता या गोष्टी ते अपरिहार्य मानतात -- याचा अर्थ -- खरे स्वरूप वगैरे काही असू शकतच नाही, असा होतो. धर्माच्या बंदिस्त स्वरूपामुळे जर नाश होत असेल तर वैचारिक बंदिस्ततेमुळेही तसाच नाश होईल, हे त्यांना दिसत नसावे. धर्माप्रमाणेच विचारसरणी हीही एक अफूची गोळीच असते याकडे त्यांचे लक्ष जात नाही. असे बंदिस्त जगावे लागणे हा प्रमुख प्रश्न वाटणारे खूप चिंतक होऊन गेलेले आहेत. बुद्ध, तुकाराम, ज्ञानेश्वर, ओशो, जेके --

हे त्या प्रश्नाकडे पाहणारे काही. दिकेंना ती बंदिस्तता अटळ वाटते, याचा अर्थ ते एक निराशावाद स्वीकारून मरून जायला तयार आहेत. याचा अर्थ तसाच खोटा आशावाद स्वीकारावा, असे नव्हे. दिकेंना जे समजत नाही त्यावरही ते बिनदिक्कत मते देतात, हे निव्वळ मानवी आकलनाच्या दिवाळखोरीचे लक्षण आहे .

मनाला, स्वप्ने आणि झोप दोन्ही सारखेच महत्त्वाचे वाटते तेव्हा स्वप्नांना वाव देण्यासाठी ते झोप एक तोळाभर कमी करते !

त्यांनी सवयीने स्थिर मानलेली एखादी गोष्ट, ती तशी नाही, असे कुणी म्हणू लागले तर ते घाबरतात आणि हिंसक होतात !

तुम्हाला स्वातंत्र्य नक्कीच आहे पण त्यानंतर काहीजण त्यांना नसलेले ' हिंसेचे स्वातंत्र्य ' वापरणार आहेत, इतकेच !

सारांश -- ' बाळ, तू कन्फ्यूजनला लव्ह म्हणतो आहेस ! '

आरोग्यता तुका पावला अष्टांगी ।। -- अशी ओळ आहे.

-- म्हणजे न्यूरॉलॉजी किंवा जेनेटिक सायन्स हे मनाची स्थिती बदलू शकतील -- या अर्थी म्हणताय का ? जरा थोडे स्पष्ट करा, प्लीज --

इकडचे साहेब, तिकडचे साहेब -- या सगळ्यांच्या इच्छेनेच तर चालणार सगळे !

( बुद्धिप्रामाण्यवाद थांबल्यानंतरची ) शांतता ! ( मैत्रीत जरा खोडी काढलीय -- जुने दिवस आठवून मजेत घेणे ! )

बायकांनी सत्ता मिळवली पाहिजे त्याशिवाय पुरुष शहाणे होण्याची शक्यता दिसत नाही !

कठीण आहे बाबा ! मी आर्ट ऑफ लिसनिंग -- दुसऱ्याचे लक्षपूर्वक ऐकण्याची कला -- मला येते -- हे दाखवतोय तर तुम्ही मला रागीट म्हणताय ! ऐकूच नको का कुणाचे ?

-- हम ऐसे हैं तो क्या हुवा, दिलवाले हैं !

सॉरी ! ध्वनियंत्रणा बंद आहे !

मिठीचा सत्याग्रह !

' अस्तित्ववाद ' या विषयावर लिहिताना हे अमुक अमुक चार अस्तित्ववादी -- हा असे म्हणाला, तो तसे म्हणाला -- हा रेगे सरांनी केलेला बहुश्रुतपणा वाचनात आला होता. ते ठीक, तर आता काय बाबा ' अस्तित्ववाद ' म्हणजे -- यावर त्यांनी कुठे काही लिहिले असल्यास जाणकारांनी कृपया सांगावे.

हा आहे विद्यासागर अध्यापक. कॉलेजात असताना याने, मी लिहिलेली ' साक्ष मावळत्या सूर्याची ' ही एकांकिका पुणे विद्यापीठातर्फे, पुरुषोत्तम करंडक स्पर्धेसाठी बसवली होती. ती सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली होती ! आता हा एका रेडियो केंद्राचा प्रमुख आहे ! कष्ट फळाला आले !

Champra Deshpande commented on a photo.

Vilas Adhyapak's photo.
हा विद्यासागर अध्यापक. काही वर्षांपूर्वी, नाटकांच्या तालमींसाठी महानगरपालिकेच्या शाळेत जागा मिळावी म्हणून अर्ज घेऊन ३-३, ४-४ तास आम्ही इथल्या शिक्षणमंडळाच्या अध्यक्षांच्या केबिनबाहेर असलेल्या बाकड्यावर बसलेलो आहे ! आता हा एका रेडियो केंद्राचा प्रमुख आहे ! ते त्याचे कष्ट फळाला आले !

" कल भी सब माल सेफ आया -- पुलीसको भनक तक ना लगी ! "

एक म्हणजे , लेखक हा सतत सगळ्याच्या पार असणारा देव असतो, असे काही नाही -- तोही या सगळ्यातून जात असतो आणि दुसरे म्हणजे, अर्थपूर्ण वाटणारे सगळे क्षणात निरर्थक ' दिसू ' शकते -- हेही सांगावे -- यासाठी ही पोस्ट !

जसे रागाच्या भरात एखाद्याने अपशब्द उच्चारला तर तो शब्द का उच्चारला यावरच भडकाभडकी सुरू होते आणि भांडणाचा मूळ मुद्दा गायबच होतो !

-- तुम्ही म्हणता ते सत्यच आहे -- पण मानसशास्त्राला मानसशास्त्रच म्हणतात -- शरीरशास्त्र नाही ! बोलण्यासाठी -- संपर्कासाठी असलेले भेद, एवढाच त्याचा अर्थ !

अनधिकृत पुतळेही असतीलच ना !

मनाच्या भाषेला देहबोली हे माध्यम ! ती दिसणार नाही तेव्हा शब्द लागतील !

मानसशास्त्रज्ञ आणि लेखकच कशाला, प्रत्येक व्यक्ती आपापले हेतू, सुखदुःखे, सुरक्षिततेची इच्छा -- यांच्या, आपापल्या मर्यादांतूनच जगाकडे पाहात असते. ' स्वच्छ पाहणे ' म्हणजे काय -- हा खरा प्रश्न आहे !

-- दरम्यानच्या काळात त्या मानसोपचारतज्ज्ञांचा बॅलन्स घालवू नका, म्हणजे झाले !

जगात वाचण्यासारखे किती आहे आणि टाळके किती छोटे !

वैरी होणार नाही पण मित्र म्हणून काही कमी त्रासदायक नसेन मी !

-- तोच तर विषय चाललाय -- नीतीमूल्ये एकीकडे असतात, मन वेगळेच वागत असते -- या बाबतीत लोक ज्याचे त्याला बघू द्यावे असे करत नाहीत -- दुसरे कसे वाईट आहेत, हे सांगत राहतात -- तर आपण कशा मनाला सदगुणी समजतो -- ते बोलावे, अशी अपेक्षा आहे -- आपल्या मनाशी प्रामाणिक ? -- हे प्रश्न टाळायला आपल्याला आवडते हाच तर मुख्य प्रश्न आहे !

धीर धरी रे धीरापोटी<br>
असती मोठी फळे गोमटी.

नॉर्मल या शब्दाला मराठीत निरामय म्हणावे का ? नॉर्मल मन सदगुणी असेल का ? उदाहरणार्थ परस्त्रीबद्दल आकर्षण वाटणे हे नॉर्मल असेल पण सदगुणाचे असणार नाही !

बिझिनेस असो की एकूण जगणे -- शून्य धोक्यावर तर काहीच शक्य नसते. यश हवे असेल तर धोका पत्करावाच लागेल -- आणि धोका याचा अर्थच अपयशाची शक्यता !

खरेच हा एक महत्त्वाचा विषय आहे -- एका जरी स्त्रीची उपस्थिती असली तरी पुरुषांच्या गप्पा मापातच येतात / राहतात -- मग ती पिण्याची का मैफल असे ना ! स्त्रिया तर खूपच काळजी घेतात, हे वरच्या एका कॉमेंटमध्येही आले आहे. हे बदलू शकेल का आणि का बदलत नाहीय अजून -- हा या स्टेटसचा विषय दिसतोय --

आपल्याला काय हवे असते की अमुक अमुक लोक पूर्ण सदगुणी मनांचे असावेत ! अहो, पण सदगुणी मन हा प्रकार जगात अस्तित्वातच असू शकत नाही ! मन हे दुभंगपणेच काम करते ! कर्मण्येवाधिकारस्ते -- पटतेय ना सगळ्यांना ? आहे का तसा एक तरी ? सदगुणी मन हे वदतो व्याघाताचे उदाहरण आहे !

तसेच -- बघा, शिक्षक असून -- बघा, डॉक्टर असून -- बघा, साठी ओलांडूनही -- असेही बोलले जाते. अशा दोनचारच विभागातल्या लोकांना ' विकृत चांगले ' करून मखरात बसवणे गधडेपणाचे असते. माणूस तो माणूस ! समाजमान्य असण्यानसण्याचे, तसे आपण आहोत असे ढोंग किती प्रमाणात करावे -- याचे, हे सगळे ज्याचे तो पाहून घेईल, त्याची फळेही भोगेल. मन काम करतेय ना, सुखदुःखे अनुभवाला येत आहेत ना, मग कुणीही कुणाला कोणत्याही चौकटी सक्तीच्या करण्यात अर्थ नाही. बाकीचे लोक जसे परिणाम भोगतात तसेच हेही भोगतील. हा लेखकांना सवलती देण्याघेण्याचा प्रचार नसून भ्रामक देव्हारे नकोत, एवढेच म्हणायचे आहे.

लेखकाने काय केले पाहिजे, कसे वागले / जगले पाहिजे याचे सगळे मानदंड कोण तयार करते, कुठून येते हे ?

Champra Deshpande commented on his own status.

मी जरा याकडे वेगळे पाहतो. चांगला लेखक म्हणजे सर्व मानवी भावभावना, गुणदोष, स्खलनशीलता यांपासून चोवीस तास मुक्त असला पाहिजे आणि त्याने देव्हाऱ्यात बसून राहिले पाहिजे -- ही अपेक्षाच मुळात बोधप्रद, गुळगुळीत लिहिणाऱ्या लेखकांमुळे तयार झाली असावी. ही अत्यंत फालतू आणि अनैसर्गिक अपेक्षा आहे. त्या त्या लेखकाची चिंतनशीलता असणारच, काही लेखक स्वतःच्या जगण्यात या मर्यादा ओलांडू शकत असणारच -- त्याशिवाय महान म्हणाव्यात अशा कलाकृती निर्माणच होणार नाहीत. पण याचा अर्थ लेखकाला शरीर असता कामा नये, मन असता कामा नये आणि त्याला नुसता एक पवित्र आत्माच तेवढा असला पाहिजे, असे नाही. " च्यायला बघा, लेखक असून असा -- " असले बोलणे म्हणजे बोलणारा अजून अंड्यातूनही बाहेर आलेला नाही, असे समजावे.

परिपक्वता आल्यावर म्हणू -- त्यासाठी वर्षांचे हिशोब कामाचे नाहीत -- परिपक्वता तरुण वयातही शक्य आहे आणि शंभराव्या वर्षीही ती येईलच, असे नाही !

आळस चे आळशी, तुळस पासून तुळशीवृंदावन -- कळले !

Arun Bhalerao -- दिलवर या शब्दात जरा बेकायदेशीर, अनैतिक संबंध अशाही छटा आहेत ना हो -- कारण शब्दकोशात या शब्दाचा अर्थ -- शूर, धाडशी -- असा दिलेला आहे ! आणि आता, जाता जाता, ' धाडसी ' बरोबर की ' धाडशी ' -- तेही सांगा.

स्त्रीच्या सौंदर्यामुळे पुरुषाने मोहित होणे, त्या सौंदर्याकडे पाहात राहणे हे त्याला अत्यंत सुखाचे वाटणे -- हे स्त्री-पुरुष समानतेत बसते का -- हा प्रश्न चर्चेला घेतला तर ती समानतेची चळवळ आणि हा कायदा यांचे फुटून तुकडे होण्याचा धोका दिसतो ! सर्वांच्याच विचारांत गोंधळ आहेत !

कुणी एखाद्याने मनावर घेऊन प्रकाशच्या अंतःस्फूर्तीचे असे किस्से -- अगदी प्रशांत दामले, भरत जाधव, वर्षा उसगावकर -- अशा असंख्यांना भेटून जमा केले तर एक धमाल ग्रंथ तर तयार होईलच शिवाय त्यातून नव्यांचे नाट्यप्रशिक्षणही होईल ! ( प्रकाश बुद्धिसागर ).

मराठीतल्या निवडक थोर मॅड लोकांत त्याची गणना करावी लागेल !

प्रकाशच्या मेंदूत ॲब्सर्डिटीची जाण इनबिल्टच आहे ! त्याला अचानक काय सुचू शकेल याची कल्पनाच येणार नाही !

आजारपणामुळे त्याचे दिग्दर्शन थांबलेय पण तो पुन्हा काम करेल, असे मला नक्कीच वाटते --

माझ्या नाटकात रमेश दिनकर पुरोहित नामक एक पोलीस पात्र होते -- तो आल्यावर देवरस हे पात्र आपल्या बेशुद्ध पडलेल्या पत्नीला म्हणे, " कोण आलंय, पाहिलंस का -- रद्दी आलेयत -- " मग तो पोलीस गयावया करत म्हणायचा, " रद्दी नका म्हणू हो, र दि म्हणा फक्त -- " ! ही प्रकाशची ॲडिशन होती !

माझी ' नातं ' ही एकांकिका त्याच्या दिग्दर्शनामुळे ८५ एकांकिकांमध्ये पहिली आली होती !

माझी ' संसाराणूपेंडघार ' ही एकांकिका त्याला दिग्दर्शित करायची होती तर ती समजून घेण्यासाठी हा माणूस मुंबईहून नगर जिल्ह्यातल्या वाळकी या गावी -- जिथे त्या वेळी मी नोकरीनिमित्त राहात होतो -- आला होता !

पुढे तो फार्सिकल नाटकांचा ग्रेट दिग्दर्शक झाला ! मला मित्र म्हणून त्याचा एक अभिमान असा की त्याचे पहिले व्यावसायिक नाटक माझे होते !

प्रकाशच्या त्याच मोटरसायकलवर आम्ही दादर ते चेंबूर ट्रिपल सीट प्रवास केला होता ! तो पोलिसांशी संबंधित एक सीरियल करायचा, त्यामुळे सगळे पोलीस आपल्याला ओळखतात याचा त्याला अभिमान होता ! वाटेत कुणी न अडवता आम्ही मुक्कामी पोचलो, हा भाग वेगळा !

म्हणजे असे दिसते की धर्म हीही एक विचारकृतीच झालेली आहे. त्यापेक्षा वेगळे काही नाही. तर दोन्हींचे मिळून एकच वाक्य असे केले -- " विचारकृती हे माणसाचे एकमेव श्रद्धास्थान राहिलेले आहे " -- तरी चालेल !

मी कधी या गाढवांच्या नादी लागत नव्हतो -- मला चुकीच्या वाटणऱ्या सगळ्याच गोष्टींवर मी बोलतही नाही -- या वर्षी यांनी निष्कारण मला निमंत्रण पाठवून मला क्षुद्र लेखले -- त्यामुळे बोलतोय -- प्रतिक्रियाच समजा !

यांना सरकारने त्वरित हाकलून देणे मराठीच्या हिताचे होईल --

हे मराठी नाट्यसंमेलन मुळीच नाही -- हे मराठी नाटकधंदा संमेलन आहे --

मी इथे जे जे लिहितो आहे ते ते कुणीही कुठेही उदधृत करायला माझी परवानगी आहे -- मी जबाबदारीनेच बोलतो आहे --

स्वतःच्या स्टारपदाला महत्त्व देणारे हे लोक आणि राजकारणी यांच्यांत काय फरक आहे ? मला तुलनेने राजकारणी प्रामाणिक वाटतात -- हे लोक संस्कृतीच्या बुरख्याखाली वावरणारे नीच लोक आहेत --

त्यापेक्षा मग स्टारदर्शन संमेलन भरवावे -- लोकांना हवे आहे, लोकशाही आहे -- द्या अनुदान ! पण नाव खोटे नको --

‘ गटारात फेकून देतील ' हे लाक्षणिक अर्थाने घ्यावे -- तिकडे कुठे आहेत उघडी गटारे -- असा फाटा नको फुटायला --

माझा एकच प्रश्न आहे -- जगाने विचारले की बाबा तुम्ही १५ नंबरची भाषा आहात जगातली तर तुमची ग्रेट नाटके कोणती ? या टोळ्यांनी केलेले कोणते नाटक सांगणार ? ' नटसम्राट ' ? गटारात फेकून देतील --

हे फडतूस आहे -- यात सांस्कृतिक काहीही नाही --

पुढल्या वर्षीपासून याला सरकारकडून एक कवडीही मिळू नये -- महाराष्ट्र आपल्या संस्कृतीची काळजी घेईल -- यांची मुळीच गरज नाही -- हे फालतू, खुजे, भंगार आणि रटाळ लोक आहेत --

दुसरा पर्याय -- धंदेवाईक नसलेल्यांचे संमेलन असावे -- त्याला सरकारी अनुदान जरूर द्यावे --

म्हणजेच फोफावता धंदा ! मराठी नाटकवाल्यांचा धंदा फोफावत नसेल तर मरू दे ना !

यांचे अनुदान वगैरे बंद व्हायला हवे ! अशी धंद्याला अनुदाने देण्याची पद्धत पूर्ण चुकीचीच आहे !

मला राग असला तरी मी पूर्ण विचारानेच बोलतो आहे --

यांना संस्कृतीचे कवडीचे देणेघेणे नाही --

हे धंदा करणारे लोक आहेत -- हिंदीत फिल्मफेयरला केंद्रसरकार देते का पैसे ? मग या टोळ्यांना कशाला सरकारी पैसे ? यांच्या *** त दम असेल आणि त्यांना एवढी मराठी संस्कृतीची काळाजी असेल तर स्वखर्चाने भरवावीत संमेलने !

ज्यांना सहन होईल त्यांनी ' भोसडीचे ' आणि ' भडवे ' हे शब्द टाकून घ्यावेत --

आणि हे *** चे चर्चा करतात -- साहित्य वा नाट्यसंमेलनात राजकारणी कशाला -- या विषयावर ! जणू काही हे *** काहीतरी सांस्कृतिक कार्य करताहेत !

-- मी जायचे का ठरवले ते माझ्या स्टेटसमध्ये आहे -- मी व्हीआयपी वागणुकीची अपेक्षा ठेवली असती तर मी इतका माघार घेत गेलो नसतो -- अति झाल्यावरच मी चिडलो -- या संमेलनाबाबतचे मतही मी चर्चेत मांडले आहे आणि ' सर्जकता ... ' या स्टेटसमध्येही मांडले आहे -- माझे हे आकलन बदलायचे कारणच नाहीय. मुळात मला तिथे कुणी विचारणारच नाही -- मला कशाला कोण अशी गाडी पाठवेल ? तशा व्यक्तींत मी कदापि मोडणार नाही ! आणि यांना मी मराठीतल्या सर्जकतेचे नव्हे तर रटाळपणाचेच प्रतिनिधी समजतो, त्यात बदल नाही ! त्यात बदल करायची अट न घालता

मला कोणतीही स्वर्गसुखे त्यांनी अर्पण करायचे ठरवले तर मैत्रीत मी त्यांचा अवश्य स्वीकार करेन ! ते काही माझे शत्रू नाहीत !

सेक्स वा तथाकथित धर्म -- सुटकेसाठी तिसरे काही आहेच काय ?

मौजेच्या ऑफीसमध्ये आम्ही काहीजण बसलेलो असताना ' सत्यकथे ' कडे आलेली एका ग्रामीण कवीची कविता राम पटवर्धनांनी आम्हाला वाचून दाखवली होती -- सारांश असा होता -- यवडं काय तिच्या मायला, नवीन बाईल करायची ! -- ४-६ ओळींत त्याने आख्खे महाभारत च्यूत्यात काढले होते !

आरती प्रभूंनी त्यांची ताजी लिहून झालेली एक कविता मला ऐकवली होती -- ( ती कुठे छापली आहे की नाही, मला माहीत नाही ) --
साळुंकी शुभशकून
म्हणते मलाच की निरखून
-- अशी सुरुवात होती, एवढे आठवते.

ज्या अर्थी ' जुडी ' सुद्धा अनेकार्थ आहे त्या अर्थी कोणतीही कलाकृती अनेकार्थ आहे ! म्हणजेच, अनेकार्थतेचे महत्त्व संपले ! आणि कोणताही एक अर्थ ' जास्त बरोबर ' धरायचे कारण नाही ! समजा वादासाठी हे मान्य केले, तर पुढे काय ?
' साहित्यकृतीची गरजच काय ? ' -- हा प्रश्न ?

वसंत सरवट्यांनी आपल्याला खूप आनंद दिलेला आहे. एकदा ' मौज ' दिवाळी अंकात माझी ' खडक ' नामक एकांकिका आली होती -- तीतली सर्व चित्रे सरवट्यांची होती ! त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा !

-- " हे इथे सरसकट घडत असावे " -- हेच सुचवायचे आहे. मानवी मनांच्या सर्व दुर्गुणांचे अंश प्रत्येक मनात असतात !

फक्त नव्हे -- मुख्यतः !

हम हैं तो चाँद और तारे !

म्हणजे कलाकृती ही पाया धरून मूल्यमापन करण्याची पद्धतच रद्द करणे ?

म्हणजे एखादा सर्जक वाचक कोणत्याही कलाकृतीला मौल्यवान करू शकेल -- असे काही ?

म्हणजे -- मूळ कलाकृती नसतेच -- वाचक तिची जी कॉपी काढेल तीच कलाकृती -- हीच भूमिका मांडणे आहे का हे ?

यह एक ऐसा कॅच है जो पकडतेही दो व्यक्ती आऊट हो जाते हैं !

कॅच करनेवालाही आऊट हुवा रे !

नाटकधंदा बंद करावा असे इथे म्हटलेलेच नाही -- ते मराठीतल्या सर्जक नाटकाचे प्रतिनिधी नसतात, एवढेच म्हणणे आहे -- ते निःसंशयपणे मराठीतल्या आंतरिक रटाळपणाचेच प्रतिनिधित्व करतात -- आणि नाट्यसंमेलन हे अशा असर्जक लोकांचे झालेले आहे -- ते आत्ममग्न अवस्थेत तिथे मिरवत आणि चमकत बसतात !

राजकारणी तर अपरिहार्यपणे बाजारबुणगेच असतात कारण त्यांना बाजारबुणग्यांतच यश मिळवायचे असते ! नाटकधंदा करणारे सेम तसेच असतात -- त्यांनी राजकारण्यांवर टीका करणे हे शेवटी स्वतःची गांड फाडून घेणे ठरेल !

जगणे समजून घेण्यासाठी मानसिक धोका पत्करायला तयार नसलेले घाबरट लोक सर्जकतेला दुर्बोध ठरवून मग्रूर म्हणतात -- अशा वेळी वस्तुस्थिती ही असते की ते स्वतः रटाळ असून रटाळतेचे पक्षपाती असतात !

हे लोक डबक्यातल्या सडलेल्या पाण्यात रंजक कसरती करून दाखवणारे असतात. थोडेही डिस्टर्ब व्हायला घाबरणारे लोक पैसे देऊन त्या पाहतात आणि टाळ्या पिटतात !

सर्जकता म्हणजे मुख्यतः, आत्मसात झालेल्या नैतिक, वैचारिक, सांस्कृतिक सवयींतून बाहेर पडण्याचा धोका पत्करणे. नाटकाचा धंदा करणारे क्वचितच या वाटेला जातात. त्यामुळे, बाह्य रूपात बदल दिसले तरी आतला रटाळपणा तोच असतो. म्हणूनच, मराठीत नाटकधंदा करणारे मराठीतल्या आंतरिक रटाळतेचे प्रतिनिधी असतात, मराठीतल्या सर्जकतेचे नव्हे !

नटनट्यांमध्येही पांडुरंग आहे याची जाणीव ठेवून त्या सर्वांच्या दर्शनाची तीच हाव असलेला समाज !

खरे तर काकडेकाकांनी यांना लाथ घालून तिथून निघून यायला हवे होते !

आजच्या मटात आलेय की खुद्द अध्यक्ष काकडेकाका त्यांची रूम कुठे आहे ते शोधत फिरत होते ! मग या नाट्यपरिषदवाल्यांचे सगळे कार्यकर्ते कोणत्या स्टार्सबरोबर हिंडत होते ? हे सगळे निर्लज्ज लोक आहेत ! सांस्कृतिक निर्लज्ज !

हे मराठी नाटकाचे प्रतिनिधित्व करतात का ? की मराठीतल्या नाटकधंद्याचे ? समजा जगाने विचारले की तुमची चार महत्त्वाची नाटके सांगा तर हे कोणती सांगतील ? ' नटसम्राट ' असते यांचे नंबर एकवर ! इंग्लिशमध्ये अनुवाद करून द्या एखाद्याला वाचायला -- आमच्या ' किंग लियर ' मध्ये हे कुठले घाण पाणी मिसळून आणलेत, असे विचारतील !

ही चर्चा नीट वाढली तर यांना विचारावेत असे आणखीही काही प्रश्न आहेत --

आता, हा जर कुणाला महत्त्वाचा प्रश्न वाटला तर मला ही माहिती हवी आहे की नाट्यपरिषदेमार्फत कुणाकुणाची जाण्यायेण्याची व्यवस्था कशी कशी करण्यात आली -- कुणासाठी कोणत्या कार्स होत्या -- हे कसे ठरवले -- आणि मला अशी फडतूस वागणूक का दिली गेली --

"ब्रेकिंग न्यूज" - कृष्णविवरं नाहीतच - स्टीफन हॉकिंग
aisiakshare.com
हा लेख वाचून मला एक आनंद वाटला -- या जगातले आपल्याला जे कळत नाही ते सगळे विवाद्य आहे !

अगदी खरे आहे ! उत्तम स्टेटस ! मीही बँकेतच नोकरी केलेली असल्याने यातला प्रेमाचा भाग मीही अनुभवलेला आहे ! एखादे आजोबा चिडतात, तणतणतात, तरीही त्यांचे नेमके काम काय आहे ते आपल्याला माहीत असते -- आपण न डिस्टर्ब होता, त्यांचे काम त्यांना हवे तसेच करून देण्याचा आनंद आपल्याला रिच करून जातो ! मजा येते !

अर्थात, इथे आपण एक गंमत म्हणून बोलत आहोत याची सर्वच फ्रेंडसना जाणीव आहे. अशा सौम्य गंमती मनातले त्या त्या विषयातले ताण सैल करतात. मधून मधून असे ताण सैलावणे हेल्दी असते.

मन वापरण्याची पद्धत हाच केंद्रप्रश्न !

-- नुसते बलात्कारच नव्हे -- सर्व तर्हेचे अत्याचार, अन्याय, विषमता, डावपेच, दुसऱ्यांना नामोहरम करणे, देशोधडीला लावणे, खून, युद्धे -- या सगळ्यांचे बीज या मन वापरण्याच्या पद्धतीतच असते ! त्यांतल्या निम्म्यांतून मी मुक्त झालो आहे वगैरे म्हणण्यात फारसे तथ्य नसते !

-- बाहेरून सुख मिळवणे ही मनाची कायमची पद्धत असते -- त्या पद्धतीतच बलात्काराचे, आंबटशोकाचे वगैरे सगळे बीज असते. असे सुख शून्यावर नेणे म्हणजे मनच नष्ट होणे वा मनापलिकडचे जगणे ! हे सत्य वा असत्य असू शकते ! जे बलात्कार करत नाहीत ते त्या बीजाच्या पलिकडे वगैरे गेलेले असतात, असे होऊ शकत नाही. मनाने जगणे म्हणजे दुभंग जगणे आणि ' मिळवणे ' वा ' त्यागणे ' --

इंग्लिशमधला सिंबॉल हा शब्द आपल्याकडच्या ' प्रतिमा ' या अर्थाने वापरला जातो, असे वाटते -- हाच गोंधळ क्लियर व्हावा. छान माहिती दिलीत, अरुणजी !

याच्याशी संबंधित पण थोडा वेगळा किस्सा सांगतो -- बँकेत स्टाफला वाहनकर्ज मिळते -- एका स्त्रीकर्मचाऱ्याने मोटरसायकलसाठी अर्ज केला -- साहेब म्हणाले, नामंजूर, कारण या बाई तर साडी वापरतात ! -- शेवटी युनियन मॅटर झाली -- ते म्हणाले, तुम्हाला काय करायचेय -- त्यांचा नवराच त्या ड्रायव्हर ठेवणार आहेत ! -- झाले ते शेवटी मंजूर ! पण नवरा ' ठेवावा ' लागला !

अरुणजी, तुमच्या म्हणण्याचा अर्थ असा दिसतो की कविता ही चिन्ह वा प्रतीक यांच्या मर्यादेतच असायला हवी. पण कोणतीही चांगली कलाकृती एका निश्चित अर्थात सापडत नाही -- तिची अर्थवलये अमर्याद, नित्यनूतन असू शकतात, हे तर सत्य आहे. ' याचा फायदा घेऊन ' चालणारे उद्योग हा वेगळा विषय आहे. मुळात आधी -- चिन्ह, प्रतीक आणि प्रतिमा -- या शब्दांबाबतच समज गरजेची आहे.

' अस्तित्ववाद ' या विषयावरचे लेखन पाहा मराठीतले -- कीर्केगार्ड असे म्हणाला, मग नीत्शे असे म्हणाला आणि सार्त्र असे म्हणाला -- एवढेच असते, पुढे एक शब्द नाही ! बरे हे तिघेही अस्तित्ववादी आहेत का ? मग वेगवेगळे काय चाललेय म्हणणे ? हे सगळे अभ्यासल्यावर काय अस्तित्ववाद म्हणजे ? -- हे नसते. आपल्याकडे ५-६ अस्तित्ववादी लेखक असल्याचे सांगितले जाते ! त्यांची जुळणारी वैशिष्ट्ये फुटकळ असतात. टिळक सुपारी खात होते -- मीही खातो -- अशी !

तिकडे प्रतीकवाद वा प्रतिमावाद झाले -- त्याला समांतर असे सारखे इकडे काही घडत नसते. आपल्याकडेही चिन्हे, प्रतीके, प्रतिमा आहेतच -- पण हे सगळे सारखे त्यांच्या दावणीला बांधण्याच्या प्रयत्नामुळे गोंधळ वाढतो. ते सगळे सोडून निव्वळ

आपल्याच संदर्भात आपण यावर का बोलू नये ? त्यांच्या आणि आपल्या अर्थांत काही भेद असले तर नंतर समजून घेता येतील.

Symbol --हा शब्द चर्चेत घेतलेलाच आहे. Sign -- म्हणजे चिन्ह. इंजिन हे मनसेचे चिन्ह असते पण कबुतरे शांततेचे प्रतीक असतात. गणितात निरनिराळ्या प्रक्रियांसाठी, अधिक, उणे, वगैरे चिन्हे असतात. स्पीडब्रेकरचा बोर्ड हे चिन्ह असते -- प्रतीक वा प्रतिमा नव्हे.

आम्हाला हिंदी शिकवणारे एक शिक्षक होते -- त्यांची शिकवण्याची पद्धत अशी होती -- समजा एखादा धडा शिकवणे चालू आहे, त्यात वाक्य आले, " मुझे लगा की मुझे तुरंत कोलकाता जाना पडेगा । " की हे शिकवत -- लेखक कहता है कि उसे लगा कि उसे तुरंत कोलकाता जाना पडेगा । पुढचे वाक्य, " मगर बहुत कठिनाईयाँ थी " -- असे आले कि -- लेखक कहता है कि बहुत कठिनाईयाँ थी । ( !!! ) -- अशा शिकवण्यातून काय कळणार ?

-- विषयाचे आपले स्वतःचे आकलन मांडणे ! नुसत्या स्वतःच्या ' प्रतिमा ' संभाळत बसणाऱ्या विद्वानांचा आपल्याला आपले आकलन वाढायला फारसा उपयोग होत नाही ! ( मेपूंनी विश्वकोशात ' अस्तित्ववादा ' वर लिहिताना अशाच नुसत्या तिकडच्या पाट्या इकडे टाकाव्यात आणि एकूण स्वतःचे आकलन मांडायचे धाडस करू नये -- हे नुसते खेदकारक नसून, विद्वत्ता म्हणजे हेच, असा गैरसमज पसरवणारे आहे ! )

जन्माने हिंदू असून हिंदुत्ववादी नाही म्हणजे बुद्धिप्रामाण्यवादीच असणार म्हणजे डावाच -- अशी गणिते आणि उत्तरे नेहमीच बरोबर असतील, असे नाही --

तसाच माझा अपमान बिगर-हिंदुत्ववाद्यांनीही करू नये, असे मला वाटते --

निवडणुकीच्या काळात -- " अरे वा -- देशपांडे -- तुम्हाला काही सांगायलाच नको ! " -- असे एखादा हिंदुत्ववादी उमेदवार म्हणाला तर मला ते अपमानास्पद वाटते !

आणि कोणत्याही प्रश्नाकडे तुम्ही पाहता तसेच मी पाहिले -- तरच मी विचारी !

माणसाचे मन हे सतत निश्चिततेच्या, सुरक्षिततेच्या शोधात असते -- जगणे, नाती, संबंध, परिस्थिती -- यासाठी ते सतत स्वतःला अलग समजते -- विश्वात या अलगतेला किंमत दिसत नाही --

अनिरुद्ध, निर्गुण, निराकार देवाची चेष्टामस्करी अशक्य आहे पण माणसाच्या कल्पनेतून जन्माला आलेले आणि मानवी गुणावगुणांनी युक्त असलेले ' साकार ' देवदेवता गमतीचे विषय होणार -- ते खिलाडूपणे घेतले जाते --

अनिरुद्ध, मैत्रीत सांगतो -- तुम्ही एखादा तमाशा बघा -- देवांच्या टिंगल-टवाळ्या, चेष्टामस्करी -- हे हवेच ! सतत गंभीर चेहरे ठेवायची गरज नाही ! आणि या कवितेमुळे, मूळ गीतेचे काय वाकडे होऊ शकते ?

आपल्याकडे कुणीही कुणाचीही चेष्टामस्करी करू शकतो -- त्या लेव्हलवर हे सगळे ! एरवी ज्ञानोबा तर आपले हृदयसम्राट !

माझ्या त्या काकांची विनोदबुद्धी हिमालयीन होती ! अप्रस्तुत असले तरी एक गंमत सांगतो -- ते तंबाखू खात असत -- कुठेतरी एकदा भेटले असताना बोलता बोलता असे कळले की त्यांनी तंबाखू सोडलेली आहे ! नंतर काही दिवसांनी मी त्यांच्या घरी गेलो असता, पाहतो तर तंबाखू पुडी आणि चुनापुडी समोरच ! म्हटले काय हो काका, सोडली म्हणाला होतात ना ? ते म्हणाले, बस, सांगतो. मग म्हणाले, लोक काय करतात, मी सिगरेट सोडली, मी सिगरेट सोडली, असे म्हणत म्हणत मनाने ती धरूनच ठेवतात ! माझे तसे नाही -- मी तंबाखू इतकी सोडली आहे की वाटल्यास खातोसुद्धा !

माझ्या कै. काकांनी रचलेली एक ओवी ---
खेळ खेळावा क्रिकेटू । मीच बॉल मीच फळकुटू । मीच माझियावेरी आपटू । मीच धावे भिरिभिरी ।।

अहो, मी नो एंट्रीतून आलो तेवढ्याचीच तो तोड मागतोय -- पावती फाडा म्हटले तर तो आणखी तीन कलमे लावेल -- आपले तरी कुठे काय धड आहे ? !

स्वतःला काहीच म्हणायचे नाहीय, स्वतःलाच कोणतीही क्लॅरिटी नाहीय पण खूप वैचारिकतेचा आभास तयार करायचा आहे, त्या वेळी एकूणच शाब्दिक चोंबाळे होऊन, त्या लिहिणाऱ्यापासून ते इतर कुणालाच ते कळताच कामा नये, अशी व्यवस्था तयार होते !

शंभर टक्के ! राम पटवर्धन -- ' पाडस ', मधू साबणे -- ' सोल माउंटन ' आणि ही, भा. ल. भोळे यांची ' ब्लाइंडनेस ' -- अनुवाद क्षेत्रातली ग्रेट कामे !

समझनेवाले को इशारा काफी है -- ना समझे वो अनाडी है !

बादमे खुदा वहाँ ना रुके -- प्रायव्हसी रहे !

असे भाव दगडातून चेहऱ्यावर शिल्पिता येण्यासाठी नक्कीच आधी ते शिल्पकाराला समजलेले असणार !

Sharad Bhuthadia's photo.
फ्रेंडस, मैत्रीत आम्ही गंमतीजंमती करतो -- पण, काहीजणांना माहीत नसेल म्हणून सांगतोय -- मराठीत द ग्रेट किंग लियर साकारणारा हा एकमेव, अपवादात्मक, टोलेजंग अभिनेता आहे !

एक छोटी मुलगी ः ( खालून -- ) आई, मी खेळून येईपर्यंत, नेटवर बघून झाशीच्या राणीवर पाच वाक्यं लिहून ठेव --
आई ः ( स्वयंपाकघराच्या खिडकीतून -- ) आत्ता मला वेळ नाहीय -- तू आल्यावर बघू --

संजय, प्रादेशिकच असतात नीतीकल्पना ! तिबेटात अनेक पती असणे नैतिक असते -- महाराष्ट्रात नाही --

एका भागात एक पत्नी असणे आदर्श, कुठे अनेक पत्नी असणे योग्य, कुठे एक पती, तिबेटात अनेक पती, कुठे घटस्फोट वाईट, कुठे विवाहबाह्य संबंध अगदीच असह्य -- ताबडतोब घटस्फोट, वगैरे --

लहानपणी एखाद्या चेंडूसाठी तो दुसऱ्याच्या उरावर बसतो -- मोठेपणी, तसेच खेळणे असलेल्या एखाद्या अस्मितेसाठी !

आणि पोलीस खुन्याला पकडण्याचे मुद्दाम टाळत असावेत, असे वाटण्यासारखी माझी मनःस्थिती तयार होऊ शकलेली नाही. त्या शोधाच्या प्रक्रियेचे कोणतेच तपशील आपल्याला माहिती नाहीत. जंग जंग पछाडूनही खरोखरच काही नीट सापडत नाहीय, असेही होऊ शकते.

History is a nightmare from which I am trying to escape .

James Joyce.--

गिरीश, नक्कीच वाच -- खुनाची एकच कृती बहीण-भाऊ मिळून करतात -- पण -- अप्रतिम ! हे आहे कलेचे मुख्य काम !

दर वर्षी शेकडो खून होत असताना, केवळ एकाच खूनाच्या किंवा हत्येच्या मारेकऱ्याला पकडा, असे आवाहन आपण करतो, ही समता आहे का ?
मी काही वर्षे बँकेच्या युनियनमध्ये एक कार्यकर्ता होतो. युनियन तर सर्व सभासदांना समानच लेखणार -- हेच अपेक्षित असते. तसे होत नाही. तिथेही इनर सर्कल असतेच. ' आपल्या ' लोकांचा विचार वेगळा करावाच लागतो. बौद्धिक पद्धतीने केली जाणारी समतेची कोणतीही कल्पना प्रत्यक्ष जगण्यात येऊ शकत नाही. ' त्यातल्या त्यात ' -- हे सूत्र असू शकते !

ज्ञानेश्वरांनी पुण्यात्मक पाप आणि पापात्मक पाप असे पापांचे दोन प्रकार सांगितले आहेत. तुकाराम म्हणतो ' देव अंतरे ते पाप ' -- या सगळ्याचा अर्थ विभक्त / विदीर्ण मनाने केलेली कोणतीही कृती पापच ! एकविध / एकात्म मनाने होणारी कृती फक्त पुण्य / चांगुलपणा ! याच विषयावर सार्त्रचे ' फ्लाईज ' हे नाटक आहे. हे नाटक मराठीत लिहिले गेले असते तर ते पाहायला कुत्रेही फिरकले नसते !

सुभाषित किंवा उपदेश किंवा बोध म्हणून हे पाहूच नये, असेच मलाही वाटते -- पण, आपले आपण समजून घ्यायला काही वाक्ये वा भाषणे वा कलाकृती या सूचक वा निमित्त होऊ शकतात --

Champra Deshpande commented on a status.

याचा काही उपयोग आहे का ते बघा -- After the death of his foster mother, Genet was placed with an elderly couple but remained with them less than two years. According to the wife, "he was going out nights and also seemed to be wearing makeup". On one occasion he squandered a considerable sum of money, which they had entrusted him for delivery elsewhere, on a visit to a local fair. For this and othermisdemeanors, including repeated acts of vagrancy, he was sent at the age of 15 to Mettray Penal Colony where he was detained between 2 September 1926 and 1 March 1929. In The Miracle of the Rose (1946), he gives an account of this period of detention, which ended at the age of 18 when he joined the Foreign Legion. He was eventually given a dishonorable discharge on grounds of indecency (having been caught engaged in a homosexual act) and spent a period as a vagabond, petty thief and prostitute across Europe—experiences he recounts in The Thief's Journal (1949). After returning to Paris, France in 1937, Genet was in and out of prison through a series of arrests for theft, use of false papers, vagabondage, lewd

acts and other offenses. In prison, Genet wrote his first poem, "Le condamné à mort," which he had printed at his own cost, and the novel Our Lady of the Flowers (1944). In Paris, Genet sought out and introduced himself to Jean Cocteau, who was impressed by his writing. Cocteau used his contacts to get Genet's novel published, and in 1949, when Genet was threatened with a life sentence after ten convictions, Cocteau and other prominent figures, including Jean-Paul Sartre and Pablo Picasso, successfully petitioned the French President to have the sentence set aside. Genet would never return to prison.

समाज ज्याला क्रिमिनल म्हणतो असाही माणूस चांगला लेखक असू शकतो !

माझे म्हणणे -- लक्ष द्यावे असे कुठूनही येऊ द्या ना काही -- लहान मुलाकडून, शेतमजुराकडून, क्रिकेटवीराकडून, डान्सरकडून वा एखाद्या गोऱ्याकडून ! विज्डमच्या बाबतीत तरी या भेदभावांना काही अर्थ नाही !

चिकित्सा करतो म्हणणारे फक्त वेगळ्या अस्मितांचे असतात, इतकेच ! त्यामुळे दहशत कायमच समर्थनीय ठरते !

जरा मतभेद -- हवा, पाणी, अन्न -- याइतकेच खरे तर ते जीवनावश्यक आहे ! पण व्यवहारात त्याची क्रमवारी ठरते खरी !

एखाद्याला लोखंडाची कांब वाकवता येईल पण काळ मुरगाळणे -- हे फक्त एखादा सच्चा कवीच करू शकतो !

' राशोमान ' हे नाटक वा सिनेमा आठवा !

मित्रमैत्रिणींनो, कुणाच्या म्हणण्याला महत्त्व देऊन वा ते मनावर घेऊन, निराशेने वगैरे हे स्टेटस मी दिले आहे, असे मुळीच नाही -- माझे जे काय असेल ते खरे नाणे मी मराठीत ठेवतोच आहे -- मला जे महत्त्वाचे वाटते ते समजून घेण्यासाठी मी जीव गहाणही टाकलेला आहे -- पण या नाण्याला मर्यादा आहेत -- कलेत पाहायचे काय तर कोणतेही नाणे स्वतःच्या मर्यादा ओलांडते की नाही -- त्यामुळे, हे काहीतरी ओशाळे स्टेटस आहे, असे कृपया समजू नये -- त्यातला अतिसौम्य उपरोधही पाहावा --

रसेलने मुलांना शिकवायची एक पद्धत सांगितलेली आहे -- एक घटना वा काळ घ्यायचा, त्या वेळची साताठदहा काय मिळतील ती वृत्तपत्रे घ्यायची आणि त्यांनी त्या वेळी काय काय लिहिले होते आणि आज काय वाटतेय -- हे सगळे दाखवायचे -- म्हणजे आज वर्तमानपत्रे कशी वाचायची, हे मुलांना कळेल !

एक म्हणतोय, मोदींनी खूप विकास केलाय तर दुसरा म्हणतोय, तसे काही नाहीय -- एक म्हणतोय देशाचा आज जो विकास झालेला दिसतोय तो कॉंग्रेसमुळेच तर दुसरा म्हणतोय, खाण्यात किती पैसे गेले तो काढा की हिशोब -- याच्या चौपट झाला असता विकास ! एखादी लग्नानंतर दोनतीन वर्षांत घटस्फोट होण्याची घटना घ्या -- घटना एकच पण कारणमीमांसा, अत्यंत बारकाव्यांसह दोन टोटली वेगवेगळ्या मिळतात !

इतिहासाबद्दलच्या इतिहासाचे थोडे भान सांगतो -- वाजपेयींचे सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांना असे कळले की भारताचा इतिहास छापण्याचे काम चालू असून, बंगालमधल्या कम्युनिस्ट इतिहासज्ञांनी लिहिलेला इतिहास ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसला छापायला गेला आहे. त्यांनी ते सगळे बाड परत मागवले. तर त्यात गांधीजींवर पाच पाने आणि कम्युनिस्ट पक्षावर पन्नास पाने, असा प्रकार होता. आता त्यांचे हे इतिहासाचे भान दुसऱ्या काहींना मुळीच पटणार नाही ! -- तर प्रश्न असा आहे की इतिहासाचे भान वेगवेगळे असते का आणि त्यातले सर्वात चांगले भान कोणते, हे कसे ओळखावे ?

We used to have rubber stamps in banks for various purposes -- afterwards we realized that it becomes very difficult to find the required stamp ! Then we reduced the number of stamps !

Very meaningful ! ( I studied in Ismail Yusuf College, Jogeshwari for four years ! I had many Muslim friends ! )

There is no mind without body. The bodies of males and females are different in many ways -- that is why minds also are bound to be different.

tya veli 31 paise mhanaje 5 ane hote.

I saw some pictures with ticket of 31 paise. There were only two rows for this class. I used to stand in line and see the interval of the prior show. With this passion only it was possible to get that ticket !

The three categories mentioned are not acceptable -- there are only two -- ignorant and wise !

“In every block of marble I see a statue as plain as though it stood before me, shaped and perfect in attitude and action. I have only to hew away the rough walls that imprison the lovely apparition to reveal it to the other eyes as mine see it.”
Michelangelo quote

“Every block of stone has a statue inside it and it is the task of the sculptor to discover it”
Michelangelo quote

Manat makad yeta kama naye kinva unt yeta kama naye, ase mhatale ki nemake tech yete manat !

Mi uthal asun mala deep vhayache ahe, ha uthal vichar ahe -- to sod -- baas !

If the world is changing speedily -- and the observer also is changing -- at which point the interpretation is possible ?

Asha veli problem nasane hach ek problem karayacha mhanaje bore honar nahi !

Due to PC problem Devanagari is not used.

हुशार पत्न्या, कामवाल्या नेमतानाच, त्या आकर्षक असता कामा नयेत, याची पूर्ण काळजी घेतात, असे माझे निरीक्षण

आहे !

' प्रयत्न ' करावा लागतो -- मग तो प्रामाणिक का असे ना -- याचा अर्थच मनाचा एक भाग याला तयार नाही -- तेही प्रामाणिकपणेच !

सुरुवात नम्रपणे करून शेवट आक्रमक करणे -- हे मराठी भाषकांचे वैशिष्ट्यच तर नसेल ?

जबरदस्त, चौफेर, अर्थपूर्ण आणि श्रेयस्कर !

जगण्यातली अनिश्चितता, धोके, संकटे, दुःखे यांना बौद्धिक उत्तरे नाहीत -- मग या अनाकलनीय गोष्टींसाठी करावे काय ?
बऱ्याचजणांना, या अनाकलनीय गोष्टींचीही आपण काळजी घेतो आहोत, असे वाटणे गरजेचे असते !

कामगार कल्याण मंडळ राज्य नाट्य स्पर्धेत उद्या स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृह , विक्रोळी येथे सायंकाळी ७.०० वा .
आपली उपस्थिती प्रार्थनीय – ( ऐ आपण चहा घ्यायचा ? )
शुभेच्छा !

रावेर तर बागायतदारांचे श्रीमंत गाव आहे !

याच गावाजवळ ना धो महानोरांचे पळासखेडा आहे --

पाचोरा तालूका --

नीट सांगा -- मी लोहारा या गावात होतो --

ते जाऊ दे -- शेंदुर्णी तुम्हाला कसे माहीत ? त्या गावाजवळच्याच एका गावात मी साडेतीन वर्षे होतो --

भारत-पाक युद्धाच्या वेळी ब्लॅक-आऊट असायचे तर त्यानंतर नऊ महिन्यांनी धडामकन लोकसंख्या वाढली !

Welcome year 2014 ! ................................ " Be Positive, is not just a Blood Group ... " <
जन्मल्यानंतर माझा Blood Group समजल्यावर, माझ्या जन्मदात्यांनी माझ्या कानात, आयुष्याचा हा " मूलमंत्र "
सांगितला.. Be Positive (y) :) Happy New Year Friends ....
माझा ब्लड ग्रुपच तो आहे !